# अर्थसंवाद

जुलै-सप्टेंबर 1989, खं. 13, अंक 2


**कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारी**
रवीन्द्र दोशी
पृष्ठ - 57

**शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी श्रमदानातूनबांधलेला बंधारा**
आ. गो. पुजारी
पृष्ठ - 81

**सुवर्णाची देशी व विदेशी किंमत**
एस. आर. चिरमाडे
पृष्ठ - 92

**विदर्भातील जिल्हा परिषदांची वित्तीय संरचना**
सुलोचना मानकर
पृष्ठ - 98

**कृषी विपणनाची कार्यक्षमता**
मुक्ता दि. जहागिरदार
पृष्ठ - 102

**चर्चा**
पृष्ठ - 110

**सांख्यिकीय पुरवणी-5**

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जुलै-सप्टेंबर 1989
खंड 13 अंक 2

**प्रमुख संपादक** : भ. ग. बापट
**साहाय्यक संपादक** : प्रदीप आपटे

**सल्लागार मंडळ :**
आनंद नाडकर्णी, श्री. वि. खांदेवाले,
शि. सो. कल्याणकर, ज. फा. पाटील

**संपादकीय पत्रव्यवहार :**
भ. ग. बापट
गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणे - 411 004

**व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :**
( वर्गणी पाठविणे, अंक न मिळणे
याबाबत चौकशी इ. साठी )
व्यं. सु. पाटणकर
कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,
' संपदा '
प्राध्यापक वसाहत,
देवपूर, धुळे - 424 002

**वर्गणीचे दर :**
**अ) परिषदेचे सभासद :**
आजीव : रु. 400 (एक रकमी)
साधारण : रु. 60 ( वार्षिक )
संस्था सभासद :
शैक्षणिक रु. 60 ( वार्षिक )
**व्यावसायिक : रु. 150 ( वार्षिक )**
(परिषदेच्या सभासदांना अर्थसंवाद
त्यांच्या वर्गणीतच दिले जाते. )
**ब) अर्थसंवाद वर्गणीदार :**
ग्रंथालये : रु. 60 (वार्षिक)
**वर्षगणना 1 एप्रिल ते 1 मार्च**

**आभार :**
**म. राज्य, साहित्य संस्कृती मंडळ व
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान
परिषद, प. विभागीय केंद्र, यांनी
अर्थसंवादसाठी दिलेल्या अनुदानाबाबत**

# अनुक्रमणिका

खंड 13 अंक 2

☞ **कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारी**
रवीन्द्र दोशी
पृष्ठ - 57

☞ **शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी श्रमदानातून बांधलेला बंधारा**
आ. गो. पुजारी
पृष्ठ - 81

☞ **सुवर्णाची देशी व विदेशी किंमत**
एस. आर. चिरमाडे
पृष्ठ - 92

☞ **विदर्भातील जिल्हा परिषदांची वित्तीय संरचना**
सुलोचना मानकर
पृष्ठ - 98

☞ **कृषी विपणनाची कार्यक्षमता**
मुक्ता दि. जहागिरदार
पृष्ठ - 102

☞ **चर्चा**
पृष्ठ - 110
सांख्यिकीय पुरवणी - 5

# कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारी

रवीन्द्र दोशी *

—1—

### प्रास्ताविक

अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथील सहकारी साखर कारखान्याने भारतात सहकारी साखर कारखानदारीची मुहूर्तमेढ रोवली. त्यातून अवघ्या महाराष्ट्रात शक्य असेल वा नसेल तिथे स्थानिक नेतृत्वाने पुढाकार घेऊन सहकारी साखर कारखाने उभे करण्याची जणू काही चळवळ सुरू झाली. तथापि, ऊस लागवडीसाठी प्राकृतिक आणि नैसर्गिक परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रात विशेष अनुकूल असल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील नवी साखर कारखानदारी विशेषत्वाने याच प्रदेशात केंद्रित झाली. सध्याची परिस्थिती पाहिल्यास, महाराष्ट्रातील ऊस लागवडीच्या एकंदर क्षेत्रापैकी जवळजवळ 70 टक्के क्षेत्र पुणे विभागातील अहमदनगर, पुणे व सोलापूर आणि कोल्हापूर विभागातील सातारा, सांगली आणि कोल्हापूर या सहा जिल्ह्यात केंद्रित झालेले आहे. यातही 35 ते 40 टक्के क्षेत्र केवळ अहमदनगर व कोल्हापूर जिल्ह्यात आहे. 1984-85 पर्यंत एकूण ऊस उत्पादनात महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हा आघाडीवर होता व कोल्हापूर जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर होता. मात्र 1985-86 पासून कोल्हापूर जिल्हा पहिल्या क्रमांकावर असून अहमदनगर जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. ऊस उत्पादनाची 1980-81 ते 1987-88 या आठ वर्षांची सरासरी घेतल्यास ती अहमदनगर (18.81 टक्के) आणि कोल्हापूर (18.49 टक्के) जिल्ह्यांची जवळजवळ सारखीच भरते. अमरावती आणि नागपूर विभाग हे खऱ्या अर्थाने उसाचे प्रदेश नव्हेतच. नाशिक विभागात नाशिक, धुळे व जळगाव जिल्ह्यापैकी नाशिक जिल्हा हाच जास्त ऊस पिकविणारा आहे तर मराठवाड्यात औरंगाबाद, जालना, बीड आणि उस्मानाबाद हे जिल्हेच नजरेत भरतात. पुणे आणि कोल्हापूर विभागांतर्गत उपरोक्त 6 जिल्ह्यातील उसाच्या विस्तृत क्षेत्रामुळे याच प्रदेशात 1987-88 मध्ये राज्यातील 91 पैकी 49 सहकारी आणि 10 पैकी 9 खाजगी असे 101 पैकी एकूण 58 (58 टक्के) साखर

* प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कारखाने केंद्रित झालेले आहेत. अहमदनगर जिल्ह्यात 18 (13 सहकारी व 5 खाजगी) आणि कोल्हापूर जिल्ह्यात 11 (सर्व सहकारी) कारखाने आहेत.

उसातील साखरेच्या उताऱ्याच्या आधारावर महाराष्ट्राचे तीन साखर विभाग पाडले जातात ते खालीलप्रमाणे :–

| साखर विभाग | शर्करांश टक्केवारी | जिल्हे | साखर कारखाने (1987-88) |
|---|---|---|---|
| 1. दक्षिण | जास्त | कोल्हापूर, सांगली, द. सातारा | 23 |
| 2. उत्तर | मध्यम | उ. सातारा, सोलापूर, पुणे | 42 |
| 3. उत्तर-पूर्व | कमी | धुळे, जळगाव आणि विदर्भ व. मराठवाड्यातील सर्व जिल्हे | 36 |

वरील संदर्भात, सर्व जिल्ह्यात कोल्हापूर अग्रेसर असून महाराष्ट्रातच नव्हे तर आखिल भारतात सर्वाधिक शर्करांश टक्केवारी मिळविण्यात कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखाने सातत्याने आघाडीवर आहेत.

1988-89 मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात 11 साखर कारखाने प्रत्यक्ष उत्पादन करीत असून सर्व कारखाने सहकारी क्षेत्रात आहेत. 1934 पासून कोल्हापूर शहरात असणाऱ्या एकमेव खासगी कारखान्याचेही नुकतेच सहकारीकरण होऊन 1985-86 साली सहकारी साखर कारखाना म्हणून या कारखान्याने उत्पादन सुरू केले. पूर्णतया सहकारी क्षेत्रामध्ये चालणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यातील साखर उद्योगाची सहकारिता कशा प्रकारची आहे हे तपासून पाहण्याचा प्रयत्न या निबंधात केला आहे. त्यासाठी या कारखान्यांची सभासद संख्या, भागांची संख्या, सभासदांचे भांडवल आणि लोकशाही व्यवस्थापन या निकषांचा आधार घेतला आहे. अभ्यासाचा कालावधी प्रत्येक कारखान्याच्या चाचणी हंगामाच्या वर्षापासून (काही ठिकाणी तत्पूर्वीपासून) ते 1986-87 पर्यंतचा आहे. पंचगंगा कारखान्याच्या बाबतीत मात्र काही तांत्रिक कारणाने 1986-87 चा वार्षिक अहवाल अद्यापि बाहेर न पडल्याने 1985-86 हे अखेरचे वर्ष आहे.

–2–

**जिल्ह्यातील साखर उद्योगाचे सिंहावलोकन**

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर उद्योगाची ठळक माहिती तक्ता 1 मध्ये दिली आहे. त्यावरून पुढील गोष्टी सांगता येतील.

(1) जिल्ह्यातील 11 कारखान्यांमध्ये पंचगंगा कारखाना सर्वात मोठा (5,000 मे. टन / दिवस) असून छत्रपती शाहू आणि दत्त (आसुर्ले) हे दोन कारखाने सर्वात लहान (1,250 मे. टन / दिवस) आहेत. सर्वांची मिळून प्रतिदिन गाळपक्षमता 1987-88 मध्ये 28,200 मे. टन इतकी होती.

(2) सर्व कारखान्यांचे त्यांच्या चाचणी हंगाम वर्षानंतरच्या सर्व वर्षातील कामाचे दिवस विचारात घेता ते 105 ते 233 या मर्यादेत आढळतात. तथापि, कारखान्यांचे सरासरी दिवस लक्षात घेता –

(तक्ता क्र. 1 पुढील पानावर)

तक्ता 1

कोल्हापूर जिल्ह्यातील साखर उद्योगाची माहिती

| कारखान्याचे नाव व ठिकाण | चाचणी हंगाम वर्ष | गाळप शक्ती (मे. टन / दिवस) | | | शर्करांश टक्केवारी | ऊस गाळपाचे दिवस (चाचणी हंगाम वगळून) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. पंचगंगा (इचलकरंजी— तालुका हातकणंगले) | 1958-59 | 1958-59<br>1971-72<br>1977-78 | :<br>:<br>: | 1,250<br>3,500<br>5,000 | 11.04 ते 12.39 (11.62) | 140 ते 222* (182) |
| 2. भोगावती (परिते — तालुका करवीर) | 1958-59 | 1958-59<br>1966-67<br>1971-72 | :<br>:<br>: | 1,000<br>1,250<br>2,000 | 11.06 ते 12.45 11.92 | 120 ते 217 (170) |
| 3. वारणा (वारणानगर— (तालुका पन्हाळा) | 1959-60 | 1959-60<br>1968-69<br>1981-82 | :<br>:<br>: | 1,000<br>2,000<br>3,000 | 11.09 ते 13.58 (12.27) | 125 ते 221 (164) |
| 4. दूधगंगा वेदगंगा (बिद्री—तालुका कागल) | 1962-63 | 1962-63<br>1972-73<br>1977-78 | :<br>:<br>: | 1,000<br>1,750<br>3,500 | 10.42 ते 12.50 (11.58) | 118 ते 181 (149) |
| 5. कुंभी-कासारी (कुडित्रे—तालुका करवीर) | 1963-64 | 1963-64<br>1971-72<br>1982-83 | :<br>:<br>: | 1,000<br>1,750<br>3,000 | 11.14 ते12.19 (11.77) | 132 ते 218 (175) |
| 6. दत्त (शिरोळ—तालुका शिरोळ) | 1972-73 | 1972-73<br>1980-81<br>1986-87 | :<br>:<br>: | 1,250<br>2,000<br>2,500 | 10.63 ते 12.35 (11.83) | 128 ते 233 (172) |
| 7. दौलत (हलकर्णी— तालुका चंदगड) | 1977-78 | 1977-78<br>1987-88 | :<br>: | 1,250<br>2,000 | 11.33 ते 12.07 (11.62) | 106 ते 188 (149) |
| 8. गडहिंग्लज तालुका (गडहिंग्लज— तालुका गडहिंग्लज) | 1979-80 | 1979-80<br>1987-88 | :<br>: | 1,250<br>2,500 | 10.77 ते 11.69 (11.16) | 111 ते 186 ( 153 ) |
| 9. छत्रपती शाहू तालुका कागल— (तालुका कागल) | 1980-81 | 1980-81 | : | 1,250 | 11.38 ते 11.83 (11.56) | 107 ते 175 (139) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | दत्त (आसुर्ले पोर्ले तालुका पन्हाळा) | 1985-86 | 1985-86 | : | 1,250 | 10.89 ते 11.00 (10.95) | 110 ते 159 (135) |
| 11 | छत्रपती राजाराम (कोल्हापूर– तालुका करवीर) | 1985-86 | 1985-86 | : | 2,200 | 10.84 ते 11.15 (10.88) | 105 ते 167 (143) |

**टीप** :–(1) छत्रपती राजाराम कारखाना 1985 - 1986 पूर्वी खासगी क्षेत्रात होता. म्हणून त्याचा 1985-86 पूर्वीचा विचार या संदर्भात केलेला नाही.

(2) शेवटच्या दोन रकान्यातील आकडे हे पहिल्या नियमित हंगामापासून ते 1987-88 या कालखंडातील किमान-कमाल मर्यादा दाखवतात आणि कंसातील आकडे या कालखंडाची सरासरी दाखवितात. (* पंचगंगा : 1967-68 ते 1987-88).

(3) ऊस गाळपाचे दिवस हे स्थूल दिवस आहेत.

(4) साखर कारखान्यांचे वर्ष ऑक्टोबर ते सप्टेंबर असते.

**आधार** :–(1) कारखान्यांचे वार्षिक अहवाल

(2) प्रादेशिक उपसंचालक (साखर) कार्यालय, कोल्हापूर.

हे कारखाने 135 ते 175 दिवस ऊस गाळपाचे काम करतात; म्हणजेच हा कालावधी साडेचार ते सहा महिन्यांचा आहे. पंचगंगा, भोगावती, वारणा, कुंभी-कासारी, दत्त (शिरोळ) आणि गडहिंग्लज तालुका हे सहा कारखाने सरासरी 150 पेक्षा अधिक दिवस चालतात तर दूधगंगा व वेदगंगा, दौलत, छ. शाहू, दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम हे पाच कारखाने पुरेशा उसाअभावी सरासरी 150 पेक्षा कमी दिवस चालतात.

(3) शर्करांश उताऱ्याच्या बाबतीत कोल्हापूर जिल्हा भारतात आघाडीवर आहे. सर्व कारखान्यांच्या 1987-88 पर्यंतच्या कालखंडात 10.88 ते 12.27 टक्के यांच्या सरासरीत जिल्ह्याचा शर्करांश उतारा सरासरी 11.56 टक्के मिळतो. ध्यानात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम हे नवे कारखाने वगळता इतर सर्व कारखान्यांची शर्करांश उताऱ्याची सरासरी टक्केवारी 11.50 च्या पुढे आहे. नजरेत भरण्यासारखी कामगिरी वारणा आणि भोगावती कारखान्यांची आहे. वारणा कारखान्याचा शर्करांश उतारा 28 पैकी 22 वर्षांत 12 टक्के वा त्याहून अधिक होता. यापैकी 3 वर्षे त्याने 13 टक्क्यांची मर्यादा ओलांडून राष्ट्रीय उच्चांक प्रस्थापित केला होता. त्या पाठोपाठ भोगावतीने 29 वर्षांपैकी 17 वर्षांत शर्करांश उतारा 12 टक्के वा अधिक मिळविला व अनेकदा प्रथम क्रमांक मिळवला. जिल्ह्यात हेच दोन कारखाने सातत्याने आघाडीवर आहेत.

(4) जिल्ह्यातील छ. शाहू, दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम हे तीन कारखाने वगळता इतर 8 कारखान्यांची उप-उत्पादने आहेत. त्या सर्वांकडे अर्कशाळा आहे तर वारणा आणि दत्त (शिरोळ) यांच्याकडे त्या जोडीला कागद कारखाना आहे. छ. शाहूचे अर्कशाळा उभारणीचे काम चालू आहे.

(5) पंचगंगा आणि दत्त (शिरोळ) यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात संयुक्तपणे आहे. त्यामुळे ते कारखाने केंद्र सरकारच्या आंतर-राज्य सहकारी कायद्यानुसार नोंदले गेले आहेत. महाराष्ट्रात असे तीनच कारखाने आहेत. तिसरा शहादा (जिल्हा-धुळे) येथील सातपुडा तापी कारखाना आहे.

**–3–**

## ऊस गाळप आणि उसाची अंतिम किंमत

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या उत्पादन कार्यविषयीचा तपशील तक्ता 2 मध्ये दिला आहे. या कारखान्यांनी 1986-87 मध्ये एकूण 44,51,005 मे. टन ऊस गाळला. त्याचे महाराष्ट्रातील सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या एकूण गळिताशी प्रमाण 21.57 टक्के आहे तर महाराष्ट्रातील सर्वच (सहकारी व खासगी) कारखान्यांच्या एकूण गळिताशी प्रमाण 20.46 टक्के आहे त्यानंतरच्या वर्षी (1987-88) ऊस गाळप 50,44,218 टनांचे झाले. त्याचे (महाराष्ट्रातील सहकारी कारखाने आणि एकूण कारखाने यांच्या) एकंदर गाळपाशी प्रमाण अनुक्रमे 20.32 टक्के आणि 19.52 टक्के होते. 1987-88 मध्ये जिल्ह्यातील कारखान्यांचे ऊस गाळप 1986-87 च्या तुलनेने 13.33 टक्क्यांनी अधिक झाले.

तक्ता 2

**कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे उत्पादनकार्य (1986-87)**

| कारखाना | ऊस गळित (मे. टन) | साखर उत्पादन (क्विंटल) | वापरलेली क्षमता (टक्केवारी) | उसाचा अंतिम दर (रु./ मे. टन ) |
|---|---|---|---|---|
| 1. पंचगंगा | 9,46,565 | 10,67,270 | 106 (1985-86) | उ. ना. |
| 2. भोगावती | 4,60,687 | 5,64,180 | 152 | 374 (364) |
| 3. वारणा | 5,66,229 | 6,79,929 | 120 | 363 (353) |
| 4. दूधगंगा वेदगंगा | 3,40,064 | 3,70,400 | 100 | 288 |
| 5. कुंभी-कासारी | 5,03,823 | 6,05,325 | 117 | 350 |
| 6. दत्त (शिरोळ) | 4,69,101 | 5,60,865 | 109 | 350 |
| 7. दौलत | 2,39,364 | 2,80,185 | 145 | 325 |
| 8. गडहिंग्लज | 2,59,581 | 2,75,500 | 149 | 320 (310) |
| 9. छ. शाहू | 2,09,265 | 2,37,541 | 134 | 326 |
| 10. दत्त (आसुर्ले) | 1,53,593 | 1,68,965 | 122 | 325 |
| 11. छ. राजाराम | 3,02,733 | 3,22,290 | 104 | 325 |
| एकूण / सरासरी | 44,51,005 | 51,32,450 | 120 | 337 |

**टीप :** -- (1) काही तांत्रिक कारणाने पंचगंगेचा 1986-87 चा वार्षिक अहवाल तयार होऊ शकला नाही आणि त्यांची वार्षिक साधारण सभा झाली नाही. त्यामुळे त्यांचा 1986-87 चा अंतिम अधिकृत दर उपलब्ध नाही. (उ. ना.)

(2) ऊस दराची जिल्हा सरासरी रु. 337 प्रति मे. टन काढताना पंचगंगा कारखान्याचा दर रु. 360 अंदाजला आहे. कारण गतवर्षी (1985-86) कारखान्याने रु. 358 दर दिला होता. इतर सर्व कारखान्यांचे 1986-87 चे दर गतवर्षापेक्षा अशाच प्रकारे थोडे अधिक होते.

(3) 'उसाचा अंतिम दर ' हा शेतवरचा दर (**Ex-Farm**) आहे. कारखान्यांच्या सभासदांना ऊस तोडणी व कारखान्यापर्यंत वाहतूक हा खर्च करावा लागत नाही; तो खर्च कारखाना करतो.

(4) उसाचा अंतिम दर ठरवताना' खोडकी' खर्च देण्याबाबत कारखान्यांचे धोरण सारखे नाही.1

(5) $$\left( \text{वापरलेली क्षमता (टक्केवारी)} \right) = \frac{\text{सरासरी दैनंदिन गाळप (बंद तास सोडून)}}{\text{स्थापित गाळपक्षमता}} \times 100$$

**आधार :** (1) कारखान्यांचे वार्षिक अहवाल

(2) प्रादेशिक उपसंचालक (साखर) कार्यालय, कोल्हापूर

जिल्ह्यातील साखर उत्पादन 1986-87 मध्ये 51,32,450 क्विंटल होते. त्याचे महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यातील उत्पादनाशी प्रमाण 21.49 टक्के तर फक्त सहकारी साखर कारखान्याशी 22.61 टक्के होते. त्यापुढील वर्षी (1987-88) जिल्ह्याचे उत्पादन 58,91,215 क्विंटल असून त्याचे उपरिनिर्दिष्ट प्रमाण अनुक्रमे 20.08 टक्के आणि 21.89 टक्के

होते. 1987.88 मध्ये 1986-87 च्या तुलनेने साखर उत्पादनात 14.79 टक्क्यांनी वाढ झाली. 1983-84 ते 1987-88 या पाच वर्षातील ऊस गाळप आणि साखर उत्पादन यांचा संबंध लावल्यास सरासरी 1 मेट्रिक टन ऊस गाळपामागे 1.17 क्विंटल साखर जिल्ह्यातील कारखान्यांनी तयार केली. हा सरासरी साखर उतारा केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतात सर्वाधिक आहे. ही गोष्ट कोल्हापूर जिल्ह्यातील साखर उद्योगाला खचितच भूषणावह आहे. ऊस उत्पादनाला असलेली भौगोलिक अनुकूलता याच्या मुळाशी आहे.

या कारखान्यांच्या कामाचे एक वैशिष्ट्य म्हणजे बहुतांश कारखाने सामान्यतः आपल्या स्थापित गाळपक्षमतेपेक्षा बऱ्याच अधिक क्षमतेने गळिताचे काम करतात. तक्ता 2 पाहिल्यास दूधगंगा वेदगंगा कारखाना हा सर्वात कमी कार्यक्षम असून तो आपली कार्यक्षमता सहसा पूर्णपणे वापरत नाही असे म्हणावे लागते.[2] पंचगंगा आणि छ. राजाराम हे दोन कारखाने आपली पूर्ण कार्यक्षमता वापरण्यावरच समाधान मानतात. इतर आठ कारखाने मात्र 1986-87 मध्ये स्थापित क्षमतेचा वापर 109 ते 152 टक्केपर्यंत करत होते. 1982-83 ते 1986-87 या पाच वर्षांचा आढावा घेतला तर क्षमता वापर करण्यात पाच वर्षांच्या सरासरीनुसार कारखान्यांची घटती क्रमवारी पुढीलप्रमाणे आढळते : भोगावती (147.67 टक्के), गडहिंग्लज (146.30 टक्के), दौलत (137.76 टक्के), छ. शाहू (131.46 टक्के), दत्त (शिरोळ) (127.10 टक्के), वारणा (120.27 टक्के) पंचगंगा (4 वर्षे - 107.15 टक्के), कुंभी कासारी (100.43 टक्के) आणि दूधगंगा वेदगंगा (73.38 टक्के). दत्त (आसुर्ले)आणि छ. राजाराम हे 1985-86 पासूनचे असल्याने इथे वगळले आहेत.

शेतकऱ्यांना ऊसासाठी दिलेली अंतिम किंमत केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणित किंमतीपेक्षा अधिक असते. जिल्ह्यातील सर्व कारखान्यांची मिळून सरासरी किंमत 1985-86 मध्ये प्रति टनास रु. 333 तर 1986-87 मध्ये रु. 337 होती. या दोन्ही वर्षात सर्वात जास्त किंमत (अनुक्रमे रु. 368 आणि रु. 374) भोगावती कारखान्याने दिली. त्या खालोखाल पंचगंगा, दत्त (शिरोळ) आणि वारणा यांचा क्रम लागतो. सर्वात कमी दर दूधगंगा वेदगंगा कारखान्याने (रु. 288) या दोन वर्षात दिला. या दराचा काही अंशी संबंध साखर उताऱ्याच्या टक्केवारीशी लागतो. 1985-86 आणि 1986-87 या दोन वर्षात साखर उताऱ्यात भोगावती कारखाना अग्रेसर होता. (12.45 टक्के व 12.25 टक्के). याच कारखान्याचा दर सर्वाधिक होता. तसेच दूधगंगा वेदगंगा कारखान्याचा साखर उतारा सर्वात कमी (11.51 टक्के व 10.90 टक्के) होता. या कारखान्याचा दर सर्वात कमी होता. मात्र इतर कारखान्यांच्या बाबतीत साखर उतारा आणि अंतिम दर यात एकवाक्यता नव्हती. उदाहरणार्थ, 1985-86 मध्ये दत्त (शिरोळ) चा साखर उतारा 12.35 टक्के आणि पंचगंगेचा 11.76 टक्के असूनही दोघांनीही रु. 358 चा दर दिला तर वारणेचा उतारा 12.19 टक्के असूनही त्या कारखान्याने रु. 336 चा दर दिला. याचे कारण म्हणजे, अंतिम दर ठरवताना केंद्र शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे शर्करांश टक्केवारीनुसार मूलभूत दर ठरवला जातो. त्यानंतर कारखान्याला त्या वर्षभरात जे निव्वळ उत्पन्न मिळालेले असते त्याचा काही भाग उसाची किंमत वाढवून शेतकऱ्यांपर्यंत पोचवला जातो. त्यामुळे शर्करांश उतारा सारखा असला तरी कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीतील फरकामुळे उसाच्या अंतिम किमतीत फरक आढळतो. त्याचप्रमाणे, कारखाने पुढच्या हंगामाला गळितासाठी विशेषतः बिगर-सभासदांकडून पुरेसा ऊस मिळवण्याच्या इराद्याने जाणीवपूर्वक शेजारील कारखान्याच्या दराच्या जवळपास दर देण्याचा खटाटोप करतात. त्यासाठी उत्पन्नातील नक्त वाढावा अपुरा असल्यास केव्हा केव्हा स्वभांडवलातूनही काही रक्कम वापरतात. ती वापरण्यासाठी साखर संचालकांना हमी दिली जाते की वापरलेल्या भांडवलाच्या रकमेची भरपाई पुढील दोन तीन वर्षातील उत्पन्नातून केली जाईल. प्रत्यक्षात ते होतेच असे नाही!

- 4 -

**गाळपासाठी उसाचा स्रोत**

गाळप करण्यासाठी जिल्ह्यातील साखर कारखान्यांना येणारा ऊस मुख्यत्वेकरून संबंधित कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सभासद व बिगर-सभासदांकडून येतो. हा ऊस कमी पडल्यास भरपाईसाठी कारखान्याच्या कार्यक्षेत्राबाहेरून (राज्यातील तसेच राज्याबाहेरील) ऊस मिळवला जातो. सर्वच कारखाने सहकारी असल्यामुळे सभासदांच्या उसाला प्राधान्य मिळणे हे साहजिकच आहे. तथापि, प्रत्येक कारखान्याच्या पहिल्या गळीत हंगामापासून ते 1986-87 पर्यंतच्या उसाच्या आवकेचा आढावा घेतला (तक्ता 3) तर सभासदांकडून येणाऱ्या उसाची टक्केवारी कालौघात घटलेली आढळते. कुंभी-कासारी, भोगावती, वारणा, दत्त, (शिरोळ), दूधगंगा वेदगंगा आणि पंचगंगा या जुन्या व मोठ्या कारखान्यात सभासदांच्या उसाची टक्केवारी 58 ते 79 पर्यंत घसरली आहे. पर्यायाने बिगर सभासदांच्या उसाची टक्केवारी वाढली आहे. दौलत, गडहिंग्लज, छ. शाहू, दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम या नव्या कारखान्यातही हीच प्रवृत्ती आढळते. असे का व्हावे? याचा संबंध या कारखान्यांच्या सभासद नोंदणीच्या धोरणाशी लागतो काय? कारखान्याच्याच कार्यक्षेत्रात असणाऱ्या शेतकऱ्यांकडून ऊस घेतला जातो परंतु त्यांना सभासदत्व मिळालेले नसते. याचा विचार सभासद संख्येच्या संदर्भात करता येईल.

तक्ता 3

**साखर कारखान्यांनी गाळलेल्या उसाचे स्त्रोत (टक्केवारी)**

| कारखाना | वर्ष | सभासद | कार्यक्षेत्रातील बिगर सभासद | कारखान्याचा मळा | कार्यक्षेत्राबाहेरून महाराष्ट्र | कर्नाटक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. पंचगंगा | 1959-60 | 89.52 | 10.48 | - | - | - |
| | 1985-86 | 64.83 | 27.05 | - | 1.42 | 6.69 |
| 2. भोगावती | 1959-60 | 100.00 | - | - | - | - |
| | 1986-87 | 79.10 | 14.83 | 0.01 | 6.06 | - |
| 3. वारणा | 1960-61 | 88.02 | 11.98 | - | - | - |
| | 1986-87 | 65.72 | 25.71 | - | 8.57 | - |
| 4. दूधगंगा-वेदगंगा | 1963-64 | 100.00 | - | - | - | - |
| | 1985-86 | 58.68 | 22.02 | - | 8.50 | 10.80 |
| 5. कुंभी-कासारी | 1964-65 | 97.94 | 2.02 | 0.04 | - | - |
| | 1986-87 | 75.44 | 5.56 | - | 19.40 | - |
| 6. दत्त (शिरोळ) | 1973-74 | 67.99 | 32.01 | - | - | - |
| | 1986-87 | 64.00 | 28.57 | - | 0.25 | 7.17 |
| 7. दौलत | 1978-79 | 77.05 | 20.13 | - | 2.82 | - |
| | 1986-87 | 73.00 | 21.73 | - | 0.42 | 4.84 |
| 8. गडहिंग्लज | 1980-81 | 56.41 | 20.30 | - | 16.73 | 6.56 |
| | 1986-87 | 44.74 | 25.04 | - | 8.82 | 21.40 |
| 9. छ. शाहू | 1981-82 | 14.36 | 10.72 | - | 61.38 | 13.54 |
| | 1986-87 | 21.25 | 27.62 | - | 42.67 | 8.46 |
| 10. दत्त (आसुर्ले) | 1985-86 | 46.84 | 14.47 | - | 38.69 | - |
| | 1986-87 | 37.81 | 34.15 | - | 27.39 | 0.50 |
| 11. छ. राजाराम | 1985-86 | - | 39.49 | - | 58.54 | 2.17 |
| | 1986-87 | 13.78 | 48.92 | - | 31.68 | 5.62 |

टीप : (1) सर्व कारखान्यांचे आरंभीचे वर्ष हे चाचणी हंगाम वर्षाच्या पुढचे वर्ष घेतले आहे. दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम कारखान्यांचे मात्र चाचणी गळीत हंगामाचेच वर्ष 1985-86 असल्याने ते आरंभीचे वर्ष म्हणून घेतले आहे.

(2) पंचगंगा कारखान्याचा 1986-87 चा वार्षिक अहवाल अजून बाहेर यायचा आहे.

आधार: (1) कारखान्यांचे वार्षिक अहवाल

(2) प्रादेशिक उपसंचालक (साखर) कार्यालय, कोल्हापूर.

या कारखान्यांचा स्वतःच्या मळ्यातील ऊस अत्यल्पच असतो. राज्यातीलच कार्यक्षेत्राच्या बाहेरून येणाऱ्या उसावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहणारे गडहिंग्लज, छ. शाहू, दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम हे नवे चार कारखाने आणि वेळप्रसंगी वारणा, कुंभी-कासारी आणि दूधगंगा-वेदगंगा हे जुने कारखाने आहेत. दूधगंगा-वेदगंगा, गडहिंग्लज, दत्त (शिरोळ), पंचगंगा आणि छ. शाहू हे कारखाने कर्नाटक राज्याच्या सीमेलगत असल्याने ते कर्नाटकातून काही ऊस मिळवून आपली गरज भागवतात. यापैकी दत्त (शिरोळ) आणि पंचगंगा यांचे कार्यक्षेत्र सरहद्दीलगतच्या कर्नाटक राज्यातील काही खेड्यातही पसरले

आहे. अशा रीतीने कार्यक्षेत्राबाहेरील उसावर बऱ्याच प्रमाणावर विसंबून राहणाऱ्या पंचगंगा व दत्त (शिरोळ) सहित सर्व कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात पिकणारा ऊस त्यांच्या गरजेपेक्षा कमी आहे हाच याचा अर्थ. दैनिक 1,250 मे. टन गाळपशक्तीचे कारखाने स्थापन करताना मुळातच अपुरा ऊस पुरवठा अनेक कारखान्यांच्या स्वतःच्या कार्यक्षेत्रात होता. तो पुरवठा पुरेशा प्रमाणात यथावकाश वाढेल अथवा वाढवता येईल असे आडाखे बांधून कारखान्यांची मुहूर्तमेढ रोवली जाते. परंतु अपेक्षित वाढ होण्याची शक्यता मर्यादित असल्याने या कारखान्यांना आणखी बरीच वर्षे तरी कार्यक्षेत्राबाहेरच्या उसावर बऱ्याच अंशी अवलंबून रहावे लागणार आहे अशी चिन्हे दिसताहेत. गडहिंग्लज कारखान्यावर आणखी एक मर्यादा येण्याची शक्यता आहे. याच कारखान्याच्या जवळच्या परिसरात आजरा तालुक्यात साखर कारखाना मिळवण्याचे प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून चालू आहेत. राजकीय रेट्याखाली लवकरच हा कारखाना उदयाला येईल अशा घडामोडी वरच्या पातळीवर घडत आहेत.[3] त्यामुळे गडहिंग्लज कारखान्याचे क्षेत्र संकुचित होण्याचा संभव आहे. असे झाल्यास त्या कारखान्याला कर्नाटकावर अधिकाधिक अवलंबून रहावे लागणार आहे. कर्नाटकाचे धोरण नेहमीच उदार राहील याचा भरवसा नाही हे ध्यानात ठेवावे लागेल.[4] म्हणून नवे कारखाने स्थापन करताना तसेच जुन्या कारखान्यांची गाळपशक्ती वाढवताना आपल्याच कार्यक्षेत्रातून पुरेसा ऊस मिळण्याच्या शक्यतेवर अधिक भर दिला पाहिजे. शासनाने याकडे डोळेझाक करता कामा नये. तसे केल्यास कारखान्यांच्या आजारीपणाला जन्म देण्याचे पातक शासनाच्या माथी बसेल. महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यातला अनुभव या दृष्टीने नजरेआड होऊ नये.[5]

-5-

### सभासद नोंदणी

सहकारी ऊपक्रम हे सभासदांच्या हितासाठी उभारले जातात. ते उभारताना त्या उपक्रमात जास्तीत जास्त व्यक्तींना सभासद म्हणून समाविष्ट करून घेण्याकडे दृष्टी ठेवायची असते. याकरिताच मुक्त सभासदत्वाचे तत्त्व सहकारी उपक्रमात पायाभूत मानले जाते. या तत्त्वाचा आदर कितीसा आणि कशा प्रकारे ठेवण्याचा प्रयत्न कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांनी केला आहे त्याची मीमांसा तक्ता 4 मधील तपशीलाच्या आधारे करता येईल. त्यासाठी सभासद संख्या आणि त्यामध्ये वेळोवेळी झालेली वाढ यांचा विचार कारखान्याच्या गाळपशक्तीच्या संदर्भात केलेला आहे. कारण, गाळपशक्तीतील वाढीचा सभासद संख्येच्या वाढीशी धन संबंध असतो आणि आहे.

कारखाना सुरू करताना कारखान्याच्या नियोजित गाळपशक्तीच्या खर्चाच्या किमान 10 टक्के तरी भागभांडवल ऊसकरी सभासदांचे असावे लागते. सभासद होण्यासाठी प्रथमतः किमान 1 एकर ऊस क्षेत्र असावे अशी आवश्यकता होती. परंतु 1973 पासून ती अर्धा एकरावर आणली आहे. आता तर ती त्याहीपेक्षा कमी चालते. उत्पादक भाग भांडवलदार हे 'अ' वर्ग सभासद असे संबोधले जातात. सभासद नोंदणीच्या बाबतीत सहकारी साखर कारखान्यांचा दृष्टिकोन वैशिष्ट्यपूर्ण जाणवतो.

(1) एकदा सभासद नोंदणी केल्यानंतर गाळपक्षमतेच्या वाढीचा विचार पक्का होईपर्यंतच्या काळात कारखान्यांच्या सभासद संख्येत भरीव वाढ होत नाही. गाळपक्षमता वाढवावयाचे ठरले की त्या दरम्यानच्या दोन तीन वर्षात सभासद संख्या एकदम फुगते आणि त्यानंतर पुन्हा वाढीचा वेग मंदावतो. पंचगंगा, भोगावती, वारणा, दूधगंगा, वेदगंगा, कुंभी-कासारी आणि दत्त (शिरोळ) या सहा जुन्या कारखान्यांनी वेळोवेळी आपली गाळपक्षमता वाढवली. त्या त्या वेळी सभासद संख्येत कसा बदल झाला ते तक्ता 4 मध्ये दाखवले आहे. कुंभी-कासारी कारखान्याची सभासद संख्या 1963-64 ते 1971-72 या काळात 378 ने वाढली. गाळपक्षमता 1971-72 मध्ये 1,750 मे. टनपर्यंत वाढवली आणि 1972-73 मध्ये सभासद संख्या एकदम 6,403 वर गेली. त्यानंतर 1981-82 पर्यंतच्या 10 वर्षात ती अवघी 360 ने वाढली. 1982-83 मध्ये गाळपक्षमता 3,000 मे. टन झाली आणि त्याच वर्षी सभासद संख्या 11,527 पर्यंत पोचली. 1986-87 पर्यंत त्यात 1.399 ने वाढ झाली.

भोगावती कारखान्याची सभासद संख्या 1958-59 ते 1964-65 या काळात 1,633 वरून 2,597 पर्यंत वाढली. गाळपक्षमता 1,250 टनापर्यंत वाढवायचे ठरले आणि 1966-67 मध्ये संख्या 2,704 झाली. 1,969-70 मध्ये गाळपक्षमता, 2,000 करायचे ठरले आणि त्याच वर्षी सभासद संख्या एकदम 4,663 वर गेली. 1975-76 ते 1986-87 या अखेरच्या 12 वर्षात सभासद संख्या 7,116 वरून 8,087 पर्यंत (म्हणजे 971 ने) वाढली.

वारणा कारखान्याची सभासद संख्या 1960-61 ते 1965-66 या वर्षात 2,148 पासून 2,525 एवढीच वाढली. गाळपक्षमता 2,000 करण्याचा निर्णय होताच 1966-67 मध्ये संख्या एकदम 3,233 झाली आणि 1969-70 पर्यंत ती 4,838 वर गेली. त्यानंतर मात्र 1970-71 ते 1976-77 या सात वर्षात ती संख्या अवघी 335 ने वाढली. पुन्हा 1981-82 मध्ये गाळपक्षमता 3,000 पर्यंत वाढवली व त्या कारणाने सभासद संख्या 8,811 पर्यंत वाढवली. त्यापुढे 1986-87 पर्यंतच्या काळात वाढ 1,796 नी झाली.

दत्त (शिरोळ) कारखान्याने सुरुवात चांगली करून 1972-73 पर्यंत 4,148 सभासद नोंदवले. परंतु त्यानंतर हे काम सुस्त बनून 1979-80 पर्यंत त्यात फक्त 463 सभासदांची भर पडली.

तक्ता 4

जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या उत्पादक सभासदांच्या संख्येतील वाढीचे स्वरूप

| कारखाना | कालखंड | गाळपक्षमता (मे. टनप्रतिदिन) | उत्पादक सभासदांच्या संख्येतील वाढ | सभासदांची गाळपक्षमतेशी सरासरी (सभा-सद प्रति मे. टन) |
|---|---|---|---|---|
| 1. पंचगंगा | 1958-59 ते 1970-71 | 1,250 | 1,568 ते 2,820 | 2.26 |
| | 1971-72 ते 1976-77 | 3,500 | 4,859 ते 8,949 | 2.56 |
| | 1977-78 ते 1985-86 | 5,000 | 9,125 ते 13,426 | 2.69 |
| 2. भोगावती | 1958-59 ते 1965-66 | 1,000 | 1,633 ते 2,664 | 2.66 |
| | 1966-67 ते 1970-71 | 1,250 | 2,704 ते 4,814 | 3.85 |
| | 1971-72 ते 1986-87 | 2,000 | 5,495 ते 8,087 | 4.04 |
| 3. वारणा | 1960-61 ते 1967-68 | 1,000 | 2,148 ते 3,612 | 3.61 |
| | 1968-69 ते 1980-81 | 2,000 | 4,220 ते 8,232 | 4.11 |
| | 1981-82 ते 1986-87 | 3,000 | 8,811 ते 10,607 | 3.54 |
| 4. दूधगंगा-वेदगंगा | 1962-63 ते 1971-72 | 1,000 | 2,034 ते 8.856 | 8.86 |
| | 1972-73 ते 1976-77 | 1,750 | 9,330 ते 10,776 | 6.16 |
| | 1977-78 ते 1986-87 | 3,500 | 11,879 ते 17,132 | 4.89 |
| 5. कुंभी-कासारी | 1963-64 ते 1970-71 | 1,000 | 3,251 ते 3,606 | 3.61 |
| | 1971-72 | 1,750 | 3,629 | 2.07 |
| | 1972-73 ते 1981-82 | 1,750 | 6,403 ते 6,763 | 3.98 |
| | 1982-83 ते 1986-87 | 3,000 | 11,527 ते 12,926 | 4.31 |
| 6. दत्त (शिरोळ) | 1972-73 ते 1979-80 | 1,250 | 4,184 ते 4,647 | 3.72 |
| | 1980-81 ते 1985-86 | 2,000 | 9,195 ते 10,686 | 5.34 |
| | 1986-87 | 2,500 | 12,054 | 4.82 |
| 7. दौलत | 1976-77 ते 1986-87 | 1,250 | 5,182 ते 9,474 | 7.60 |
| 8. गडहिंग्लज | 1979-80 ते 1986-87 | 1,250 | 4,503 ते 6,345 | 5.08 |
| 9. छ. शाहू | 1980-81 ते 1986-87 | 1,250 | 1,909 ते 5,023 | 4.02 |
| 10. दत्त (आसुर्ले) | 1986-87 | 1,250 | 6,757 | 5.41 |
| 11. छ. राजाराम | 1986-87 | 2,200 | 2,039 | 0.93 |

टीप : (1) छ. राजाराम कारखाना सहकारी कारखाना म्हणून प्रथमतःच 1985-86 मध्ये उत्पादन करू लागला. त्या वेळी अजूनही खासगी मालकीतून सहकारीकरणाची सर्व प्रक्रिया पूर्ण व्हायची होती. त्यामुळे या कारखान्याची सभासद संख्या मर्यादित राहिली आहे.

(2) $\left(\text{सभासदांची गाळपक्षमतेशी टक्केवारी}\right) = \frac{\text{कालखंडाच्या अखेरच्या वर्षातील सभासद संख्या}}{\text{कालखंडातील गाळपक्षमता}}$

1980-81 साली गाळपक्षमता 2,000 केली आणि सभासद संख्या एकदम आदल्या वर्षीच्या 4,647 वरून त्या साली 9,195 पर्यंत फुगली. त्यानंतर 1985-86 पर्यंत ती 1,491 ने वाढली. 1986-87 मध्ये गाळपक्षमता 2,500 केली आणि सभासद संख्या 1,368 ने वाढून 12,054 वर गेली.

पंचगंगा कारखान्याची सभासद नोंदणी सर्वाधिक मंद गतीने वाढली. 1958-59 ते 1970-71 या प्रारंभीच्या 13 वर्षात सभासद संख्येत 1,262 ने वाढ झाली. 1971-72 मध्ये गाळपक्षमता 3,500 टनापर्यंत वाढली व त्या वर्षी सभासद संख्या आदल्या वर्षीच्या 2,820 वरून एकदम 4,859 वर गेली. 1975-76 पर्यंत ती 2,981 नी वाढली. याच वेळी गाळपक्षमता 5,000 पर्यंत वाढवण्याचा निर्णय झाला आणि परिणामी 1979-80 साली सभासद संख्या 10,009 झाली. त्यापुढे 1985-86 पर्यंत या संख्येत 3,417 ची भर पडली.

(2) सभासद नोंदणी बाबतच्या सर्वच कारखान्यांच्या प्रयत्नांची तुलना समान आधारावर करण्यासाठी त्यांच्या गाळपक्षमतेच्या प्रत्येक कालखंडातील सभासद संख्येची गाळपक्षमतेशी सरासरी काढली आहे. त्यासाठी त्या कालखंडातील अखेरच्या वर्षातील सभासद संख्या विचारात घेऊन दर मेट्रिक टन ऊस गाळपक्षमतेमागे सरासरी सभासद संख्या किती होती हे तक्ता 4 मधील शेवटच्या स्तंभात दाखवले आहे.[6] त्यावरून पुढील निष्कर्ष निघतात --

(अ) 1986-87 मध्ये सभासद संख्येची सर्वात जास्त सरासरी दौलत कारखान्याची (7.60) होती. त्यानंतर घटत्या क्रमाने दत्त (आसुर्ले) (5.41), गडहिंग्लज (5.08), दूधगंगा-वेदगंगा (4.89), दत्त (शिरोळ) (4.82), कुंभी-कासारी (4.31), भोगावती (4.04), छ. शाहू (4.02), वारणा (3.54), पंचगंगा (2.69) आणि छ. राजाराम (0.93) हे कारखाने येतात. यातील विशेष म्हणजे जुने कारखाने खालच्या क्रमांकावर आहेत. भोगावती व वारणा हे शर्करांश उताऱ्यात वरच्या क्रमांकावर असणारे कारखाने इथे अनुक्रमे सातव्या आणि नवव्या क्रमांकावर आहेत तर सर्वात जुना आणि सर्वात मोठा पंचगंगा कारखाना दहाव्या क्रमांकावर आहे. नव्या कारखान्यांना कारखाना उभारणीचा खर्च पूर्वीच्या 20-25 वर्षांच्या तुलनेने खूप जास्त करावा लागत असल्याने शेतकऱ्यांच्या किमान भागभांडवलाची अट पूर्ण करण्यासाठी जास्त सभासद करून घेणे अनिवार्य ठरते. याउलट, जुन्या कारखान्यांना गाळपक्षमतेच्या विस्तार करताना खर्च फुगवणीला जरी तोंड द्यावे लागत असले तरी त्यासाठी भागभांडवलातून थोडी रक्कम उभी करून बाकी रक्कम वित्तीय संस्थांकडील कर्जे आणि स्वतःचे निधी यातून उभी करणे शक्य असते. यामुळे सभासद संख्या वाढविण्यात त्यांना स्वतःचे राखीव धोरण अनुसरता येते.

(ब) कालौघात, कारखान्यांची गाळपक्षमता जशी वाढली त्यानुसार दर टनी सभासद संख्येची सरासरी वाढल्यास ती एक अनुकूल घटना मानता येईल. या दृष्टीने चांगला बदल भोगावती, कुंभी-कासारी व काही काळ दत्त (शिरोळ) या तीन जुन्या कारखान्यांत आढळतो. पंचगंगा कारखाना मुळातच तळाशी आहे. त्याची सरासरी वाढ जेमतेम 2.26 वरून 2.69 इतकीच आहे. वारणा आणि दूधगंगा, वेदगंगा हे कारखाने घटती सरासरी दाखवतात.

एकंदरीत, सभासद संख्या वाढवण्यात सहकारी साखर कारखाने निवडीचे तत्त्व अनुसरताना आढळतात. स्थानिक राजकारणाला पोषक होईल त्यानुसार ऊसकऱ्यांना सभासद करून घेण्याची त्यांची प्रवृत्ती प्रकर्षाने जाणवते.[7] बिगर-सभासदांकडून घेतल्या जाणाऱ्या उसाची टक्केवारी वाढलेली आहे हे ध्यानात घेता, साखर कारखान्यांना नवीन सभासद करून घेण्याला अजून बराच वाव आहे. मुक्त सभासदत्वाचे सहकाराचे आद्य तत्त्व हे कारखाने पूर्ण मोकळेपणाने अनुसरत नाहीत; सभासदत्व कोणाला द्यायचे याचा निर्णय बव्हंशी कारखान्यांच्या सूत्रधारांच्या हाती असतो. सहकारी साखर कारखान्यांनी या बंधनातून मुक्त होऊन कार्यक्षेत्रातील सर्व इच्छुक ऊसकऱ्यांना कारखान्याचे 'अ' वर्ग सभासद होण्याचा मार्ग खुला राखला पाहिजे एवढेच नव्हे तर सर्वच उत्पादकांना सभासद करून घेण्याची मोहीमच आखली पाहिजे.

या प्रश्नाला दुसरीही एक बाजू आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील काही ऊसकरी कारखान्याचे सभासदत्व मिळत असताही जाणूनबुजून सभासद होण्याचे टाळतात. कारण, त्यामुळे त्यांच्यावर आपला ऊस त्याच कारखान्याला देण्याचे बंधन राहात नाही. कित्येक कारखान्यांना स्वतःच्या कार्यक्षेत्रातील सभासद व बिगर-सभासदांचा ऊस अपुरा पडतो. त्यामुळे ते इतर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील बिगर-सभासदांचा ऊस खरेदी करतात. तो मिळावा म्हणून आपली ऊस खरेदीची किंमत शक्य तेवढी आकर्षक ठेवण्याचा खटाटोप करतात. कित्येक ऊसकरी या संधीचा फायदा घेण्यासाठी सभासदत्वाच्या बेडीत अडकण्याचे नाकारतात. त्याचप्रमाणे, सभासदांना कारखाना ठरवील त्याप्रमाणे ऊस तोडणीचे वेळापत्रक पाळावे लागते व त्यासाठी महिना दोन महिने वाटही पाहावी लागते. तोपर्यंत उसासाठी पाण्याचा व मजुरीचा खर्च करावा लागतो. बिगर-सभासदांच्या दुसऱ्या कारखान्यांनी खरेदी केलेल्या उसाची तोडणी तातडतोब होते आणि पैसेही लगोलग मिळतात. वैयक्तिक उत्पादकाच्या दृष्टीने यात काही फायदे असले तरी त्याचे प्रतिकूल परिणाम साखर कारखान्यांच्या कार्यावर होतात. शासनाने प्रत्येक

कारखान्याचे कार्यक्षेत्र ठरवून दिले आहे. याचा अर्थ, त्या कार्यक्षेत्रातील साखरेसाठीचा सर्व ऊस संबंधित कारखान्याला मिळून तो उसाच्या बाबतीत शक्य तो स्वयंपूर्ण व्हावा असा दृष्टिकोन आहे. त्याचप्रमाणे कारखान्या-कारखान्यामध्ये परस्परांच्या हद्दीतील ऊस पळवण्याचे भांडण लागू नये तसेच अवाजवी किंमत - स्पर्धेला तोंड फुटू नये हाही त्यामागे विचार आहे. ही उद्दिष्टे पूर्णतया साध्य करायची असतील तर साखर कारखान्यांनीच आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पात्र ऊसकऱ्यांना आपले सभासद करून घेण्याचे लक्ष्य ठरवले पाहिजे आणि त्या दृष्टीने कार्यवाही केली पाहिजे. यासाठी साखर संचालकांनीच एक सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सभासदांच्या उसाला उसाच्या अंतिम दराबरोबरच 'खोडकी' खर्चासाठी अर्थसाहाय्य **(subsidy)** रूपाने प्रती टन जादा पैसे द्यावेत असा सर्व सहकारी साखर कारखान्यांना त्यांनी आदेश दिलेला आहे. प्रत्यक्षात याची अंमलबजावणी करण्यात बहुतेक कारखान्यांनी सोईस्कर बगल दिली आहे. साखर संचालकांनीच आता याचा गांभीर्याने विचार करायला हवा.

-6-

**भागांची संख्या**

सहकारी संस्थांचे भाग जास्तीत जास्त सभासदांमध्ये विभागणे हे सहकाराच्या विचारप्रणालीत महत्त्वाचे असते. एक सभासद - एक भाग ही यातील आदर्श परिस्थिती म्हणता येईल.[8] वास्तवात या आदर्शाप्रत पोचणे शक्य नसते. तरीही वास्तवातील परिस्थिती या आदर्शाच्या जेवढी जवळपास असेल तितकी ती अधिक चांगली म्हणता येईल. त्या परिस्थितीत भागांचे वाटप समतेच्या कसोटीला जास्तीत जास्त उतरले असे सांगता येईल. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारी या बाबतीत कितपत 'सहकारी' आहे? जिल्ह्यातील सर्व कारखान्यांनी 1986-87 अखेरपर्यंत एकंदर 1,23,709 भाग 1,03,870 उत्पादकांना विकले होते. म्हणजे, दर सभासदामागे सरासरी 1.19 भाग विकले गेले. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत या काळात रु. 1,000 होती. यावरून दर सभासदामागे सरासरी भांडवल गुंतवणूक रु. 1,190 होती. कारखान्यांची स्वतंत्रपणे स्थिती मात्र काहीशी वेगळी दिसते.

तक्ता 5 चे अवलोकन केल्यास दौलत, गडहिंग्लज, दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम या नव्या कारखान्यांनी आपले भाग, भांडवल शक्य तेवढ्या जास्त सभासदांमध्ये विभागण्याचा प्रयत्न सातत्याने राखल्यामुळे दर सभासदामागे भागांची संख्या सतत 1.06 ते 1.10 एवढी राहिली आहे. ही स्थिती 1:1 या आदर्शाच्या बरीच जवळ आहे. भविष्यात हे प्रमाण वाढणार नाही याची खबरदारी या सभासदांनी जाणीवपूर्वक घ्यावी. जर ते प्रमाण कमी करता आले तर उत्तमच.

जुन्या 6 कारखान्यांची प्रगती पाहिल्यास नव्या कारखान्यांच्या

**तक्ता 5**

**साखर कारखान्यांची दर सभासदामागे भागांची संख्या**

| कारखाना | पहिल्या गाळप वर्षाच्या संदर्भात 1986-87 मधील निर्देशांक | | दर सभासदामागे भागांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | भाग संख्या | पहिले गाळप वर्ष | 1986-87 |
| 1. पंचगंगा (85-86) | 856 | 817 | 1.84 | 1.76 |
| 2. भोगावती | 495 | 335 | 1.79 | 1.21 |
| 3. वारणा | 494 | 406 | 1.47 | 1.21 |
| 4. दूधगंगा-वेदगंगा | 842 | 665 | 1.36 | 1.05 |
| 5. कुंभी-कासारी | 398 | 312 | 1.40 | 1.10 |
| 6. दत्त (शिरोळ) | 288 | 283 | 1.13 | 1.11 |
| 7. दौलत | 183 | 184 | 1.06 | 1.06 |
| 8. गडहिंग्लज | 141 | 136 | 1.09 | 1.07 |
| 9. छ. शाहू | 263 | 258 | 1.09 | 1.06 |
| 10. दत्त (आसुर्ले) | 100 | 100 | 1.10 | 1.10 |
| 11. छ. राजाराम | 100 | 100 | - | 1.09 |

तुलनेने तिथे केंद्रीकरण अधिक आहे. त्यातही दोन उपगट होतात. पहिला गट आहे दूधगंगा-वेदगंगा, कुंभी-कासारी आणि दत्त (शिरोळ) या कारखान्यांचा. या कारखान्यांना आपल्या आयुष्यात आपली सभासद संख्या भागांच्या संख्येपेक्षा अधिक वेगाने वाढवल्याने सरासरी भाग संख्या घटवण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. कुंभी-कासारीने ती 1.40 वरून 1.10 पर्यंत खाली आणली आणि दूधगंगा वेदगंगाने 1.36 वरून 1.05 वर घटवली. दत्त (शिरोळ) चा बदल मात्र 1.13 पासून 1.11 इतका नगण्य होता. हे तीनही कारखाने, विशेषतः दूधगंगा-वेदगंगा कारखाना, 1:1 या आदर्शाच्या बरेच जवळ पोचले आहेत.

दुसरा उपगट आहे पंचगंगा, भोगावती आणि वारणा या तीन लौकिकपात्र कारखान्यांचा. त्यांची मुळातली सरासरी बरीच जास्त होती. यथावकाश ती घटवली असली तरी त्यातून अजूनही जास्त प्रमाणात भागांचे केंद्रीकरण झाल्याची जाणीव होते. तपशिलात जाऊन पाहिल्यास, मधल्या 7 वर्षांचे अपवाद वगळल्यास, भोगावतीने सरासरी घटवण्याचा प्रयत्न केला आहे; ती सरासरी आरंभीच्या 1.79 वरून 1986-87 मध्ये 1.21 वर घसरली आहे. वारणेच्या बाबतीत आरंभापासून ते 1965-66 पर्यंत ही सरासरी वाढत होती व त्यानंतर घटू लागली तरी 1971-72 पर्यंत ती आरंभीच्या सरासरीहून जास्त होती. त्यानंतर मात्र ती घटून अखेरीस 1986-87 मध्ये 1.21 झाली. पंचगंगा कारखाना हा सातत्याने सर्व वर्षात सर्वात जास्त केंद्रीकरण दाखवणारा आहे. या कारखान्याची सरासरी आरंभीच 1.84 इतकी सर्वात जास्त होती एवढेच नव्हे तर 1985-86 मध्ये ती 1.76 पर्यंतच उतरली आणि त्यातही कारखान्याचा उच्चांक होता. विशेष म्हणजे भागांची सरासरी 1966-67 पर्यंत घटत राहून 1.50 वर आली. ती 1967-68 साली, म्हणजे पुढच्याच वर्षी, एकदम 2.83 वर गेली. नंतरच्या वर्षात पुन्हा ती उतरत चालली तरी 1982-83 पर्यंत ती सतत आरंभीच्या वर्षातील 1.84 या सरासरीच्या वरच राहिली. 1985-86 मध्ये ती 1.76 झाली. इतर कारखान्यांच्या पार्श्वभूमीवर पंचगंगेतील केंद्रीकरण नजरेत भरते. 1985-86 मध्ये पंचगंगेचा 1 भाग घेणारे 59.64 टक्के, 2 भाग घेणारे 19.09 टक्के, 3 भाग घेणारे 7.89 टक्के आणि 4 ते 25 भाग घेणारे 13.38 टक्के सभासद होते.

थोडक्यात, भागभांडवल धारणेत काही अंशी केंद्रीकरणाची प्रवृत्ती आढळते. कालौघात केंद्रीकरणाचा प्रभाव घटला असला तरी तो आणखी घटवायला बराच वाव आहे. ही लोकशाहीकरणाचीच एक प्रक्रिया असल्याने साखर कारखाने या बाबतीत कोणती पावले उचलतात यावर भविष्यात या कारखान्यांकडून सहकारी तत्त्वांचा कितपत आदर राखला जातो हे समजून येईल.

-7-

## भागभांडवल उभारणी

सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत प्रामुख्याने ऊसकरी शेतकऱ्यांकडून भागांच्या विक्रीतून जास्तीत जास्त भागभांडवल उभे करावे अशी अपेक्षा असते. प्रारंभीच्या काळात कारखाना उभा करण्याचा भांडवली खर्च खूप मोठा असल्याने शेतकऱ्यांचे भागभांडवल अगदीच तोकडे पडते. त्याला जोड कार्यक्षेत्रातील सहकारी संस्था आणि व्यक्ती यांच्या भागभांडवलाची दिली गेली तरीही त्यातून एकूण भांडवलात फार थोडी भर पडते. याकरिता आवश्यक रकमेची भरती करण्यासाठी महाराष्ट्र शासन काही भाग परतीच्या करारावर खरेदी करते आणि बरीच मोठी रक्कम कर्जरूपानेभारतीय औद्योगिक वित्तपुरवठा महामंडळ, भारतीय औद्योगिक पत आणि गुंतवणूक महामंडळ, भारतीय औद्योगिक विकास बँक, आयुर्विमा महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक वगैरे वित्तीय संस्थांकडून उभी करावी लागते. कारखान्याला यथावकाश आपले स्वतःचे भांडवल वाढवून आणि नफा मिळवून त्यातून सरकारचे भागभांडवल आणि वित्तसंस्थांची कर्जे परत करावी लागतात. या संदर्भात सहकारी साखर कारखान्यांनी आपले निर्धारित अधिकृत भागभांडवल स्वतःच्या साधनांमधून पूर्णतया भरून काढण्याचा कितपत प्रयत्न केला आहे ते पाहणे उचित ठरेल. या अनुषंगाने पुढील गोष्टी प्रथम ध्यानात घ्याव्या लागतील.

(अ) कारखान्याची आर्थिक गरज ध्यानात घेऊन वेळोवेळी अधिकृत भांडवलाची मर्यादा कारखान्यांनी वाढवून घेतली आहे. विशेषतः गाळपक्षमतेची वाढ जेव्हा जेव्हा केली गेली तेव्हा तेव्हा अधिकृत भांडवल वाढवले गेले आहे.

(ब) अधिकृत भांडवलात वाढ करताना त्याचबरोबर विक्रीस काढलेल्या भांडवलातही वाढ केली आहे. विक्रीस काढलेले भांडवल अधिकृत भांडवलाइतके वा थोडे कमी असते. 1986-87 मध्ये दत्त (शिरोळ), दूधगंगा-वेदगंगा, दत्त (आसुर्ले), छ. शाहू, भोगावती, दौलत आणि पंचगंगा या कारखान्यांनी आपले सर्व अधिकृत भांडवल विक्रीस काढले होते; इतर चार - वारणा, कुंभी-कासारी, गडहिंग्लज आणि छ. राजाराम - कारखान्यांनी कमी भांडवल विक्रीस काढले होते.

(क) सहसंचालक (साखर) यांनी सर्व सहकारी साखर कारखान्यांना त्यांच्या प्रचलित पोटनियमात दुरुस्ती करून प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु. 1,000 वरून रु. 2,000 करण्याबाबत कळवले आहे.[10] कोल्हापूर जिल्ह्यात याची अंमलबजावणी गडहिंग्लज (1983-84), दौलत (1984-85), भोगावती (1985-86), दत्त (आसुर्ले) (1985-86) आणि छ. राजाराम (1985-86) या भोगावती वगळता सर्व गेल्या दशकभरात स्थापन

झालेल्या कारखान्यांनी केली आहे. जुन्या कारखान्यांनी निदान 1986-87 पर्यंत तरी कायदेशीर बदल केलेला नाही. तसेच ज्या कारखान्यांनी कायदेशीर बदल केला त्यांनी त्या बदलाची अंमलबजावणी त्यानंतर केलेली नाही. ती केल्यास त्यांना आपल्या सभासदांकडून त्यांच्याकडील प्रत्येक भागापोटी आणखी रु. 1,000 भरणा करण्याची मागणी करावी लागेल.

उपरोक्त तपशील ध्यानात ठेवून जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांनी आपल्या अधिकृत भांडवलाचा किती हिस्सा सभासदांच्या भागभांडवलातून वसूल केला आहे ते पाहायला हवे. प्रत्येक कारखान्याची परिस्थिती तक्ता 6 वरून समजून येईल. पंचगंगा कारखान्याची या बाबतीत प्रगती सर्वात चांगली आहे. आपले अधिकृत भांडवल सभासदांच्या भागभांडवलातून भरून काढण्याच्या जवळपास हा कारखाना पोचला आहे. त्या पाठोपाठ दूधगंगा वेदगंगा कारखाना नजरेत भरतो. त्याने सुमारे चार-पंचमांश भांडवलाची उभारणी सभासदांकडून केलेली आहे. त्याखाली क्रमाने येतात दत्त (शिरोळ), वारणा आणि कुंभी-कासारी हे तीन जुने कारखाने. त्यांची वसुली 60 ते 66 टक्के आहे. दौलत, गडहिंग्लज, छ. शाहू, दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम या नव्या कारखान्यांची टक्केवारी, दौलतचा अपवाद केल्यास, 40 टक्क्यांपेक्षा बरीच खाली आहे. यामध्ये छ. राजाराम कारखान्याची बाब इतरांपेक्षा वेगळी आहे. त्याचे नुकतेच सहकारीकरण झाल्यामुळे तो अजून स्थित्यंतराच्या अवस्थेत आहे. विशेष खटकण्यासारखी गोष्ट म्हणजे सर्वात जुन्या भोगावती कारखान्याने आतापर्यंत केवळ एक तृतीयांश भांडवल 'अ' वर्ग सभासदांकडून मिळवले आहे.

**तक्ता 6**

**'अ' वर्ग सभासदांनी प्रत्यक्ष भरणा केलेले भागभांडवल आणि साखर कारखान्यांकडे जमा झालेल्या बिनपरतीच्या ठेवी**

**(1986-87)** **(रुपये लाखात)**

| कारखाना | अधिकृत भांडवल | 'अ' वर्ग सभासदांनी भरणा केलेले भागभांडवल | भरणा भांडवलाची अधिकृत भांडवलाशी टक्केवारी | बिनपरतीच्या ठेवी (सभासदांकडून) |
|---|---|---|---|---|
| 1. पंचगंगा (85-86) | 250 | 229.81 | 91.92 | 499.25 |
| 2. भोगावती | 300 | 97.96 | 32.65 | 367.77 |
| 3. वारणा | 200 | 127.54 | 63.77 | 413.57 |
| 4. दूधगंगा वेदगंगा | 200 | 165.00 | 82.50 | 300.80 |
| 5. कुंभी-कासारी | 224 | 134.76 | 60.16 | 269.37 |
| 6. दत्त (शिरोळ) | 200 | 132.02 | 66.01 | 246.52 |
| 7. दौलत | 410 | 152.45 | 37.18 | 104.43 |
| 8. गडहिंग्लज | 465 | 117.92 | 25.40 | 114.57 |
| 9. छ. शाहू | 266 | 51.09 | 19.21 | 22.26 |
| 10. दत्त (आसुर्ले) | 500 | 82.36 | 16.47 | 8.92 |
| 11. छ. राजाराम | 630 | 41.92 | 6.65 | 4.13 |

'अ' वर्ग सभासद = शेतकरी सभासद

यातून एक गोष्ट प्रकर्षाने स्पष्ट होते. सर्व साखर कारखाने कायद्यानुसार ऊसकरी शेतकऱ्यांच्या मालकी हक्काचे 'सहकारी' कारखाने आहेत. मात्र प्रत्यक्षात कारखान्यांचा भांडवलाचा मोठा हिस्सा महाराष्ट्र शासनाकडून भागभांडवलातील सहभाग म्हणून आणि वित्तीय संस्थांकडील मुदत कर्जाच्या रूपाने जमा झालेला आहे. या कारणाने हे कारखाने पूर्णतया 'सहकारी' भांडवलावर उभारलेले नाहीत असे म्हणावे लागते. नव्याने उदयाला आलेल्या कारखान्याला ही अवस्था गाठायला काही अवधी लागतो हे मान्य आहे. परंतु जे कारखाने 20 वर्षांहून अधिक काळ चालताहेत त्यांनीही दोन ते तीन दशकांच्या काळात भांडवलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ नये काय? असे न होण्यास काहीतरी वेगळी धोरणे असली पाहिजेत असा दाट संशय निर्माण होण्याला इथे जागा आहे. खरे तर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांना आपली 'अ' वर्ग सभासद संख्या वाढवून, प्रत्येक सभासदाच्या भागाची दर्शनी

किंमत रु.1,000 वरून रु. 2,000 करून आणि ती फरकाची रक्कम वसूल करून स्वभांडवलात वाढ करण्यास बराच वाव आहे. त्यामुळे कारखान्यांना त्यांच्या भांडवली गरजासाठी वित्तीय संस्थांच्या कर्जावर कमी अवलंबून राहावे लागेल. तसे झाल्यास, कारखान्यांवरील व्याजाचा बोजा कमी होऊन ती बचत ऊस दरात भरीव वाढ करून पर्यायाने ऊसकरी सभासदांपर्यंत पोचवता येईल. साखर कारखान्यांनी या भूमिकेतून आपले आर्थिक व्यवस्थापन करायला हवे.

याच अनुषंगाने बिनपरतीच्या ठेवींचा विचार करू या. कायद्यानुसार जोपर्यंत साखर कारखान्यावर वित्तीय संस्थांच्या दीर्घ मुदतीच्या कर्जाचा बोजा असतो तोपर्यंत कारखाना 'अ' वर्ग सभासदांना द्यावयाच्या उसाच्या मोबदल्यातून दर वर्षी प्रती टन ठराविक दराने बिनपरतीची ठेव वसूल करायला बांधलेला आहे.[11] या ठेवीवर ठराविक दराने व्याज दिले जाते.[12] भांडवली खर्चासाठी घेतलेल्या दीर्घ मुदतीच्या कर्जाची संपूर्ण परतफेड झाल्यानंतर आवश्यक तर संबंधित सभासदांना द्यावयाच्या भागांमध्ये या ठेवीच्या रकमेचे रूपांतर संचालक मंडळास करता येते. तक्ता 6 मधील नोंदी पाहिल्यास, साखर कारखान्यांकडे मोठ्या प्रमाणात बिनपरतीच्या ठेवी जमा झालेल्या आहेत. सर्वांची मिळून एकत्रित रक्कम 1986-87 मध्ये 23.52 कोटी रुपये होती. या ठेवी अशाच साठवण्यात काय स्वारस्य आहे ? दीर्घ मुदतीच्या भांडवली कर्जाची परतफेड लवकरात लवकर व्हावी यासाठी काही वेगळा विचार साखर संचालकांच्या पातळीवरच व्हायला पाहिजे. दोन ते तीन दशकात कारखाने कर्जमुक्त होत नाहीत हे कसे काय? या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन जरूर त्या सुधारणा कराव्या लागतील. बिनपरतीच्या ठेवींचे रूपांतर भागभांडवलात लवकरात लवकर कसे होईल याचा विचार व्हायला हवा. प्रत्यक्षात मात्र ही गोष्ट दूरगामी अशीच दिसते. कारण, कारखान्याला स्थापना काळात दीर्घ मुदतीचे कर्ज काढावे लागते. नंतर उत्पादन सुरू होऊन आठ दहा वर्षे होतात न होतात तोपर्यंत गाळपशक्तीच्या वाढीचा प्रयत्न होतो. त्या पाठोपाठ अर्कशाळा, कागद कारखाना, इत्यादी प्रकल्प पुढे येतात. त्यातून बाहेर पडले की गाळपशक्तीच्या वाढीचा आणखी एक टप्पा पुढे येतो. थोड्याच वर्षांत आणखी वाढीचा प्रस्ताव साकारतो. या साखळीमध्ये कारखाना सतत कर्जाच्या ओझ्याखालीच राहणार आणि ऊसकरी शेतकरी वर्षानुवर्षे नव्हे तर किमान दोन तीन पिढ्या तरी बिनपरतीच्या ठेवी देत राहणार.[13] आजवरचा सर्वच जुन्या कारखान्यांचा अनुभव यापेक्षा वेगळा नाही. नवे कारखाने याच पठडीतून जाऊ लागले आहेत अथवा यथावकाश जातील. परिणामी, 'सहकारी' म्हणवला जाणारा साखर कारखाना पूर्णतया सहकारी भांडवलातून चालणारा उपक्रम अशा रीतीने कोणाच्याही नजरेसमोर उभा राहणे ही गोष्ट विरळाच म्हणावी लागेल प्रामुख्याने सरकारी भांडवलावर चालणारी कारखानदारी असेच या उद्योगाचे आजचे स्वरूप आढळते. आपल्याला याच पध्दतीची 'सहकारी' साखर कारखानदारी चालवायची आहे काय याचा शासनाने एकदा राजकारण निरपेक्ष दृष्टीने पुनर्विचार करायला हवा. हे घडेल याचीही खात्री नाही.

## —8—

## ' चिरेबंदी ' व्यवस्थापन

मूलतः ऊसकरी शेतकऱ्यांच्या भागभांडवलातून सहकारी साखर कारखाना अस्तित्वात येतो. कारखान्याच्या व्यवस्थापनासाठी ऊसकरी सभासद वेळोवेळी संचालक मंडळ निवडतात. सहकार कायदा व पोटनियमातील तरतुदीनुसार आणि साखर संचालकांच्या नियंत्रणाखाली संचालक मंडळाचे नित्याचे कामकाज चालते. अशा रीतीने सहकाराच्या तत्वात अनुस्यूत असलेले लोकशाहीचे तत्त्व या प्रक्रियेतून सांभाळले जाते. परंतु प्रत्यक्षातील अनुभव लोकशाहीच्या आकृतिबंधाशी कितपत जुळणारा आहे ? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. साखर कारखान्याच्या व्यवस्थापनात आणि अधिकारपदात जास्तीत जास्त लोकांना सहभागी होता येत असेल तर ती प्रक्रिया लोकशाही व्यवस्थापनाला पोषक आहे असे म्हणता येईल. जिल्ह्यातील साखर कारखान्यात हा अनुभव अपवादानेच आढळतो. कसे ते पाहूया.

### (8.1) कारखान्याचा अध्यक्ष

सहकारी साखर कारखान्यांच्या जगतात कारखान्याचा अध्यक्ष ही सर्वात महत्त्वाची व्यक्ती असते. त्या व्यक्तीचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील स्थान हे त्याच्या अध्यक्षपदाला आधारभूत असते एवढेच नव्हे तर त्या स्थानानुरूप त्या व्यक्तीची कारखाना व आनुषंगिक उपक्रमांवर असणारी पकड आणि अधिकारपदातील सातत्य अवलंबून असतात. सामान्यतः साखर कारखान्याच्या उभारणीत त्या त्या भागातील राजकीयदृष्ट्या वजनदार व्यक्तींचे नेतृत्व आणि परिश्रम कारणीभूत असतात. ओघानेच साखर कारखाना हे स्थानिक राजकारण व अर्थकारण यावर अधिकार गाजवण्याचे एक प्रभावी साधन म्हणून अशा वजनदार व्यक्तींना उपलब्ध होते. दुसऱ्या शब्दात, साखर कारखाना हे एक आर्थिक व राजकीय सत्ताकेंद्र बनते. हे सत्ताकेंद्र वर्षानुवर्षे स्वतःकडे राखण्याची नैसर्गिक अभिलाषा त्यामुळे या वजनदार व्यक्तींमध्ये निर्माण होते. किंबहुना त्याच दृष्टिकोनातून साखर कारखान्याचा उपक्रम हाती घेतला जातो आणि राबवला जातो. साखर कारखान्याच्या व्यवस्थापन पध्दतीवर या हेतूचा जबरदस्त प्रभाव आढळतो. संचालक मंडळाच्या वेळोवेळी झालेल्या जडणघडणीचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास याची प्रचीती येईल. अध्यक्षांविषयी माहिती तक्ता 7 मध्ये दिली आहे.

तक्ता 7

**जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या अध्यक्षांची कारकीर्द**

| कारखाना | कालखंड | एकूण वर्षे | कालखंडातील अध्यक्षांची संख्या | एकाच व्यक्तीचा महत्तम कालावधी (वर्षे) | दुसऱ्या क्रमांकाच्या व्यक्तीचा कालावधी (वर्षे) |
|---|---|---|---|---|---|
| 1. पंचगंगा | 1956-57 ते 1985-86 | 30 | 2 | 28 | 2 |
| 2. भोगावती | 1955-56 ते 1986-87 | 32 | 4 | 13 | 11 |
| 3. वारणा | 1955-56 ते 1986-87 | 31 | 2 | 30 1/2 | 1/2 |
| 4. दूधगंगा-वेदगंगा | 1960-61 ते 1986-87 | 27 | 5 | 15 | 5 |
| 5. कुंभी-कासारी | 1963-64 ते 1986-87 | 24 | 7 | 15 | 3 |
| 6. दत्त (शिरोळ) | 1968-69 ते 1986-87 | 19 | 3 | 11 | 7 |
| 7. दौलत | 1973-74 ते 1986-87 | 14 | 1 | 14 | — |
| 8. गडहिंग्लज | 1977-78 ते 1986-87 | 10 | 1 | 10 | — |
| 9. छ. शाहू | 1978-79 ते 1986-87 | 9 | 2 | 7 | 2 |

**टीप :—** (1) दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम हे अगदीच नवे कारखाने असल्याने त्यांचा इथे विचार केला नाही.
(2) कारखान्यांच्या चाचणी हंगाम वर्षापूर्वीपासूनच्या वर्षांचाही समावेश उपरोक्त कालखंडात केला आहे. मात्र पूर्वीच्या जेवढ्या वर्षांचे वार्षिक अहवाल उपलब्ध झाले तेवढेच इथे विचारात घेतले आहेत.

**आधार :—** कारखान्यांचे वार्षिक अहवाल.

साखर कारखाना उभारणीच्या उपक्रमात पुढाकार घेऊन आणि मुख्य प्रवर्तक म्हणून जबाबदारी स्वीकारून ज्यांनी प्रकल्प साकार केला त्याच अध्वर्यूंनी जास्तीत जास्त वर्षे अध्यक्षपदी राहून कारखान्याची सर्व सूत्रे स्वतःकडे राखली असे स्पष्टपणे आढळते. तक्ता 7 चा आधार घेतल्यास भोगावती, दूधगंगा-वेदगंगा आणि कुंभी-कासारी हे तीन कारखाने वगळता इतर सहा कारखान्यात जवळपास संपूर्ण कारकीर्द एका व्यक्तीचीच राहिली आहे. पंचगंगा कारखान्याचे अध्यक्ष अल्प काळ महाराष्ट्र शासनात मंत्री बनल्याने तेवढा काळच फक्त खंडित झाला आहे. वारणेचे अध्यक्षपद केवळ काही महिने वगळता तीन दशके एकाच व्यक्तीकडे आहे. दौलत आणि गडहिंग्लज कारखान्यांची धुरा निर्देशित कालखंडात पूर्णतया एकाकडेच राहिली. गडहिंग्लज कारखान्याने मात्र 1987-88 च्या पंचवार्षिक निवडणुकीत ती परंपरा मोडून नव्या व्यक्तीला अध्यक्षपदी आणले आहे. छ. शाहू कारखान्याने केवळ स्थानिक तडजोडीखातर दोन वर्षे अध्यक्षपदात खांदेपालट केला. आणि पुन्हा मुख्य प्रवर्तकाकडे सूत्रे सोपविली आहेत. दत्त (शिरोळ) मध्ये मुख्य प्रवर्तक निवर्तल्यामुळे अध्यक्षपदाची धुरा तेव्हाच्या उपाध्यक्षांनी स्वीकारून तशीच ती अखंड पुढे चालविली आहे. भोगावती कारखान्यात प्रामुख्याने दोन व्यक्तींनी परस्परातील समजुतीने आलटूनपालटून अध्यक्षपद सांभाळले आहे. थोडक्यात दीर्घकाळ अध्यक्षपद स्वतःकडे ठेवून स्थानिक क्षेत्रातील वजनदार व्यक्ती कारखान्याच्या कारभाराची 'अनियंत्रित शासक बनली' आहेत. कारखान्याच्या बाबतीत ते करतील ती पूर्व अशी स्थिती आहे. तेच सर्वेसर्वा असल्याने त्यांचा प्रचंड दबाव कारखान्याशी संबंधित कर्मचारी आणि सभासद यांच्यावर असतो.

### (8.2) उपाध्यक्ष

जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे उपाध्यक्ष बनण्याची संधी किती सभासदांना किती काळ मिळू शकली हे तक्ता 8 वरून पाहता येईल.

तक्ता 8
जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या उपाध्यक्षांची कारकीर्द

| कारखाना | कालखंड | वर्षे | कालखंडातील उपाध्यक्षांची संख्या | एकाच व्यक्तीचा महत्तम कालावधी (वर्षे) | दुसऱ्या क्रमांकाच्या व्यक्तीचा कालावधी (वर्षे) | इतरांचा एकत्रित कालावधी (वर्षे) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. पंचगंगा | 1956-57 ते 1985-86 | 30 | 4 | 15 | 6 | 6 |
| 2. भोगावती | 1955-56 ते 1986-87 | 32 | 8 | 6 (3 व्यक्ती) | 5 | 9 |
| 3. वारणा | 1956-57 ते 1986-87 | 31 | 4 | 22 | 3 (3 व्यक्ती) | — |
| 4. दूधगंगा-वेदगंगा | 1960-61 ते 1986-87 | 27 | 10 | 5 | 3 (3 व्यक्ती) | 8 |
| 5. कुंभी-कासारी | 1963-64 ते 1986-87 | 24 | 13 | 3 (3 व्यक्ती) | 2 (3 व्यक्ती) | 7 |
| 6. दत्त (शिरोळ) | 1968-69 ते 1986-87 | 19 | 4 | 9 | 4 (2 व्यक्ती) | 1 |
| 7. दौलत | 1973-74 ते 1986-87 | 14 | 2 | 5 (2 व्यक्ती) | — | — |
| 8. गडहिंग्लज | 1977-78 ते 1986-87 | 10 | 2 | 5 | 2 | — |
| 9. छ. शाहू | 1978-79 ते 1986-87 | 9 | 1 | 5 | — | — |

टीप : सर्वच साखर कारखान्यांनी सुरुवातीपासूनच उपाध्यक्षपद निर्माण केले असे नाही; काहींनी कालांतराने ते पद निर्माण केले आहे.

आधार : कारखान्यांचे वार्षिक अहवाल.

उपाध्यक्षपदाबाबतही कुंभी-कासारी, दूधगंगा-वेदगंगा आणि भोगावती कारखान्यांचा दृष्टिकोन काहीसा उदार आढळतो. या कारखान्यांनी शक्य तेवढ्या जास्त सभासदांना या पदाची संधी देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या तुलनेने पंचगंगा, वारणा आणि दत्त (शिरोळ) या जुन्या कारखान्यांनी मात्र विशिष्ट व्यक्तींनाच जास्तीत जास्त काळ उपाध्यक्षपदी ठेवण्याचे धोरण अनुसरले आहे. दौलत, गडहिंग्लज आणि छ. शाहू या नव्या कारखान्यांनीदेखील या पदासाठी विशिष्ट व्यक्तींवरच लक्ष केंद्रित केले आहे. सर्वच कारखान्यांबाबत एका बाबतीत साधर्म्य आढळले, उपाध्यक्षपदी आलेली प्रत्येक व्यक्ती अध्यक्षांच्या पूर्ण मर्जीतील आणि विश्वासातील अशीच निवडली गेली. अशा व्यक्तींना एक तर दीर्घ काळ अथवा काही कारखान्यात अनेक व्यक्तींना वर्ष दोन वर्षांसाठी ही जागा देऊन 'बांधून' ठेवले जाते. यातून या अधिकारपदाबाबत केंद्रीकरणाची प्रवृत्ती अधिक स्पष्टपणे आढळते. उपाध्यक्षपदाची जागा दीर्घ काळ सांभाळणाऱ्या व्यक्ती गरजेनुसार अध्यक्षपद स्वीकारायला पुढे आलेल्या आहेत. पंचगंगा, भोगावती, वारणा, कुंभी-कासारी व दत्त (शिरोळ) या पाच जुन्या कारखान्यांत असे घडले आहे.

## (8.3) संचालक मंडळ

साखर कारखान्याची सर्वसाधारण सूत्रे संचालक मंडळाच्या हातात असतात. त्यामुळे या मंडळावर निवडून येण्याची अनेक सभासदांची इच्छा असणे स्वाभाविक आहे. सर्वांनाच ते शक्य होते असे नाही. याचे कारण, निवडणुकीला कुणी उभे राहायचे याचा निर्णय बव्हंशी कारखान्याची सूत्रधार व्यक्ती करत असते. त्यांच्या इच्छेविरुद्ध निवडणूक लढण्याचे धारिष्ट्य फार थोड्या व्यक्ती करू शकतात आणि कधीकधी करतातही. अर्थात हे कामही त्यांना संघटितपणेच करावे लागते. तरीही प्रस्थापितांशी परिणामकारकपणे तोंड देणे त्यांना सहज शक्य नसते. त्यासाठी विरोधी आघाडी तुल्यबळच नव्हे तर काकणभर सरसच बनवावी लागते. हे घडू शकले तर प्रस्थापित संचालक मंडळ उखडून टाकता येते याचे प्रत्यंतर गडहिंग्लज कारखान्याच्या 1987-88 च्या पंचवार्षिक निवडणुकीत आले आहे. या कारखान्यात जे घडले ते इतर 10 कारखान्यात सहजपणे घडले असे वाटत नाही. याला अपवाद पंचगंगा कारखान्याचा करावा लागेल. त्या कारखान्यात एक प्रभावी विरोधी आघाडी उभी राहिली आहे. चालू वर्षाच्या मध्याला कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक व्हायची आहे. ती अटीतटीची होणार असे दिसते. इतर कारखान्यातील विरोधी आघाडी पुरेशी बलवान नाही. तरीही भोगावती, वारणा, दूधगंगा-वेदगंगा, कुंभी-कासारी आणि दत्त (शिरोळ) या कारखान्यात असंतोषाची खदखद अधूनमधून डोके वर काढते.

आता संचालक मंडळाची जडणघडण कशी झाली होती ते तक्ता 9 च्या आधारे पाहू या. सुमारे 30 वर्षांच्या कालखंडात

## तक्ता 9

### जिल्ह्यातील साखर संचालक मंडळावरील सभासदांचे प्रतिनिधित्व

| तपशील | पंचगंगा | भोगावती | वारणा | दूधगंगा-वेदगंगा | कुंभी-कासारी | दत्त (शिरोळ) | दौलत | गडहिंग्लज | छ. शाहू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(अ) सभासद काल (वर्षे)** | **व्यक्तींची संख्या** | | | | | | | | |
| 1 ते 3 | 2 | 12 | 5 | 18 | 11 | 1 | 2 | 8 | — |
| 4 ते 6 | 4 | 35 | 14 | 40 | 18 | 11 | 17 | 1 | 6 |
| 7 ते 9 | 8 | 5 | 12 | 5 | 2 | 4 | 2 | 10 | 9 |
| 10 ते 12 | 6 | 6 | 3 | 1 | 6 | 8 | 4 | 1 | — |
| 13 ते 15 | 5 | 3 | 5 | — | 2 | 2 | 2 | — | — |
| 16 ते 18 | 1 | 1 | 3 | 1 | 3 | 1 | — | — | — |
| 19 ते 21 | 1 | — | 1 | — | 1 | 1 | — | — | — |
| 22 ते 24 | 1 | 1 | 3 | — | 1 | — | — | — | — |
| 25 ते 27 | — | 1 | — | — | — | — | — | — | — |
| 28 ते 30 | 2 | — | — | — | — | — | — | — | — |
| 31 ते 33 | — | — | 2 | — | — | — | — | — | — |
| **एकूण व्यक्ती** | 30 | 64 | 48 | 65 | 44 | 28 | 27 | 20 | 15 |
| **(ब) कारखान्याचा कालखंड(वर्षे)** | 30 | 32 | 31 | 27 | 24 | 19 | 14 | 10 | 9 |
| **(क) एका सभासदाचा महत्तम कालावधी (वर्षे)** | 30 | 25 | 31 (दोन व्यक्ती) | 16 | 24 | 19 | 14 | 10 | 9 |
| **(ड) संचालक व्यक्तींची प्रतिवर्ष सरासरी** | 1 | 2 | 1.55 | 2.41 | 1.83 | 1.47 | 1.93 | 2 | 1.67 |
| **(इ) कार्यक्षेत्रातील गावांची संख्या (1986-87)** | 102 | 53 | 66 | 189 | 109 | 98 | 231 | 101 | 70 |
| **(फ) प्रतिनिधित्व मिळालेल्या गावांची संख्या** | 21 | 20 | 25 | 37 | 21 | 28 | 20 | 15 | 15 |
| **गावांची टक्केवारी** | 21 | 38 | 38 | 20 | 19 | 29 | 9 | 15 | 21 |

**टीप :** दत्त (शिरोळ) आणि छ. शाहू कारखान्यांच्या वार्षिक अहवालात संचालकांची गावे दिलेली नाहीत त्यामुळे गावांची नेमकी संख्या काढता आली नाही. याकरिता जेवढ्या व्यक्ती संचालक झाल्या तेवढी जास्तीत जास्त गावे असण्याची शक्यता मानून ती ती संख्या 'प्रतिनिधित्व मिळालेल्या गावांची संख्या' मानली आहे. ही संख्या प्रत्यक्षात कमीच असणार आहे.

पंचगंगा, भोगावती आणि वारणा या तीन कारखान्यांपैकी भोगावती कारखान्याने सर्वात अधिक व्यक्तींना संचालक मंडळात सहभागी करून घेतले तर पंचगंगा कारखान्याने सर्वात कमी व्यक्तींना संधी दिली. दूधगंगा वेदगंगा कारखान्याने 27 वर्षांत सर्वात जास्त (65) व्यक्तींना संचालक बनविले. सर्व कारखान्यात संख्येचा हा उच्चांक आहे. कुंभी-कासारी या तुलनेत खाली राहतो आणि दत्त (शिरोळ) त्याहीपेक्षा खाली राहतो. दौलत, गडहिंग्लज आणि छ. शाहू हे तीन कारखाने त्यांच्या कालखंडाचा विचार करता सामान्यतः समपातळीत येतात. सर्वच कारखान्यांचा तुलनात्मक विचार करण्यासाठी संचालक व्यक्तींची प्रतिवर्षी सरासरी लक्षात घेता येईल. त्यावरून, दूधगंगा वेदगंगा कारखाना पहिल्या क्रमांकावर येतो. त्या पाठोपाठ भोगावती आणि गडहिंग्लज या दोन कारखान्यांचा क्रम लागतो. त्यांच्यानंतर घटत्या क्रमाने दौलत, कुंभी-कासारी, छ. शाहू, वारणा, दत्त (शिरोळ) आणि पंचगंगा हे कारखाने येतात. पंचगंगासारखा सर्वात जुना आणि सर्वात मोठा कारखाना तळाशी आहे ही गोष्ट आवर्जून ध्यानात घ्यावी लागेल. वरील क्रमवारीत कारखाना जेवढा खालच्या क्रमांकावर तेवढे संचालक मंडळावरील व्यक्तींचे केंद्रीकरण अधिक असे म्हणता येईल.

संचालकांचे कालावधीनुसार विवरण पाहिले तरी देखील केंद्रीकरणाची सर्वसाधारण प्रवृत्ती ध्यानात येईल. संचालक मंडळाचा कालावधी सुरुवातीला 3 वर्षांचा होता तो 1977-78 पासून 5 वर्षांचा करण्यात आला. आता तक्ता 9 पाहिल्यास सर्वच कारखान्यांच्या बहुसंख्य संचालकांचा कालावधी 1 ते 9 वर्षांचा होता असे दिसून येते. त्यांची एकूणातील टक्केवारी पुढीलप्रमाणे होती :– छ. शाहू–100 टक्के, दूधगंगा-वेदगंगा–97 टक्के, गडहिंग्लज–95 टक्के, भोगावती–81 टक्के, दौलत–78 टक्के, कुंभी-कासारी–70 टक्के, वारणा–65 टक्के, पंचगंगा–47 टक्के आणि दत्त (शिरोळ)–37 टक्के. या ठिकाणी छ. शाहू आणि गडहिंग्लज हे दहा वर्षे वयाचे कारखाने असल्याने थोडे बाजूला ठेवू. इतर कारखान्यात पुन्हा एकदा दूधगंगा वेदगंगा कारखाना सर्वाधिक व्यक्तींना संधी देणारा म्हणून या संदर्भातही पुढे येतो. वारणा, पंचगंगा आणि दत्त (शिरोळ) हे कमी संधी देणारे कारखाने आहेत. दुसऱ्या बाजूने पाहिल्यास, प्रत्येक कारखान्यात कारखान्याचा संपूर्ण कालखंड अथवा जास्तीत जास्त कालखंड संचालक पदावर राहणाऱ्या व्यक्तीही आढळतात. 10 ते 21 वर्षे आणि 22 ते 33 वर्षे असे दोन कालावधी विचारात घेतले तर ज्येष्ठ सहा कारखान्यातील संचालकांची अनुक्रमे संख्या अशी होती : पंचगंगा–13, आणि 3 भोगावती 10 आणि 2, वारणा–12 आणि 5, दूधगंगा-वेदगंगा –2 आणि 0, कुंभी-कासारी–12 आणि 1 आणि दत्त (शिरोळ)–12 आणि 0. दीर्घकाल संचालक राहणाऱ्या अशा मोजक्या व्यक्तींचा एक गटच खऱ्या अर्थाने कारखान्यावर वर्चस्व ठेवून असतो. इतर संचालक या गटाच्या मर्जीनुसार जात-येत असतात. आपल्या मर्जीतील एखाद्या संचालकांचा मृत्यू झाल्यास त्या जागी त्याची पत्नी, भाऊ, अथवा मुलगा यांना निवडून घेण्याचे राजकीय क्षेत्रात आढळणारे प्रकार सहकारी साखर कारखान्यातही अधूनमधून आढळतात.

व्यक्तींप्रमाणेच कार्यक्षेत्रातील गावांना मिळणारे प्रतिनिधित्वदेखील केंद्रीकरणाची प्रवृत्ती दाखवते, संचालक निवडीसाठी कार्यक्षेत्रातील गावांचे गट पाडले जातात. प्रत्येक गटातून निवडणूक लढविणारे उमेदवार ठरवताना कारखान्याची श्रेष्ठी मंडळी विशिष्ट गावांना अधिक महत्त्व देताना आढळतात. कारण, ती गावे व्यक्तिसापेक्ष असतात. जिल्ह्यातील कारखान्यात आतापर्यंत 15 ते 37 गावांनाच प्रतिनिधित्व मिळू शकले आहे. गडहिंग्लज आणि छ. शाहू कारखान्यात 15 गावांना जागा मिळाली तर सर्वात अधिक 37 गावांना दूधगंगा-वेदगंगा कारखान्यात प्रतिनिधित्व मिळाले. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे पंचगंगा कारखान्यात 30 वर्षांत 21 गावातून संचालकपदी सभासदांना संधी मिळाली तर कुंभी-कासारीमध्ये तेवढ्याच गावातील व्यक्ती 24 वर्षांत आल्या. भोगावतीने 20 गावांना 32 वर्षांत तर दौलतने तेवढ्याच गावांना 14 वर्षांत सामावून घेतले.

थोडक्यात ठराविक व्यक्तींनाच आणि ठराविक गावातूनच प्रामुख्याने आपल्या विशेष मर्जीतील सभासदांना संचालक मंडळावर निवडून घेण्याचा कारखान्याच्या सूत्रधारांचा प्रयत्न असतो. त्यामुळे संचालक मंडळावरील बहुतेक सभासद अध्यक्षाच्या मर्जीनुसार काम करणारे असतात. अध्यक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या संचालकांची कारखान्याच्या उप-समित्यांवरवर्णी लागते. अशा व्यक्तींनाही संचालक पदातून काही स्वार्थ साधून घेता येतात.[14] कमीत कमी व्यक्ती आणि कमीत कमी गावांना प्रतिनिधित्व मिळाल्याने व्यापक प्रतिनिधित्वाचे सहकाराचे मूलभूत तत्त्व न पाळण्यातच कारखान्यांना धन्यता वाटते.

### (8.4) वार्षिक साधारण सभा

कारखान्याच्या कामकाजाविषयी आणि प्रगतीविषयी सर्व सभासदांना माहिती मिळवण्याचे प्रमुख माध्यम म्हणजे वार्षिक सर्वसाधारण सभा होय. या सभेचे कामकाज कितपत लोकशाही पद्धतीने चालते यावर कारखान्यात सहकारी तत्त्वप्रणाली कितपत रुजली आहे हे समजू शकते. संचालक मंडळाने दिलेल्या वार्षिक अहवालावर सभासदांना मुक्तपणे मतप्रदर्शन करता आले पाहिजे तसेच त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे संचालक मंडळाकडून मिळाली पाहिजेत ही रास्त अपेक्षा असते. प्रत्यक्षात मात्र या गोष्टी अपवादानेच घडतात असा अनुभव आहे. कारण, साखर कारखान्यांच्या वार्षिक साधारण सभा अलिकडच्या काही वर्षात तर प्रचंड तणावाखालीच चालतात. प्रस्थापितांना

प्रचंड तणावाखालीच चालतात. प्रस्थापितांना कायदेशीर उपचार म्हणून साधारण सभा बोलवावी लागते. सभेचे कामकाज अध्यक्ष व त्यांचे पाठीराखे यांच्या दबावाखाली चालते प्रतिपक्षाने उपस्थित केलेल्या प्रश्नांना एक तर पद्धतशीरपणे बगल दिली जाते अथवा प्रश्न विचारणेच अशक्य करून टाकले जाते. वार्षिक सभात आरोप प्रत्यारोपांचा गदारोळ माजतो, क्वचित प्रसंगी प्रकरण हातघाईवर येते. सभा व्यवस्थित पार पडावी यासाठी प्रचंड पोलिस बंदोबस्ताची आवश्यकता असते, आणि एवढे करूनही केवळ काही मिनिटांच्या अवधीत सभेपुढील कामकाज आटोपते घेऊन वार्षिक साधारण सभा बरखास्त केली जाते! 1980 नंतरच्या आजपर्यंतच्या काळात जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांचे, विशेषतः जुन्या कारखान्यांचे, वार्षिक साधारण सभेचे चित्र थोड्याफार फरकाने अशा प्रकारे बरबटलेले आहे.[15] सभासदांच्या लोकशाही हक्काची पायमल्लीच यातून होते आहे. हे म्हणजे सहकाराचे अत्यंत विकृत स्वरूप आहे असेच म्हणावे लागेल.

### (8.5) व्यवस्थापन : दोन चेहेरे

जिल्ह्यातील 'सहकारी' म्हणवल्या जाणाऱ्या साखर कारखान्यांचे एकंदर व्यवस्थापन अशा रीतीने विशिष्ट व्यक्तीच्या एकतंत्री कारभारातून व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रचंड दबावाखाली चाललेले आहे. संबंधित सूत्रधारांनी कारखाना ही जणू काही वैयक्तिक बाब आहे असे मानून त्याचा वैयक्तिक हितसंबंधाच्या पोषणासाठी वापर केला आणि करीत आहेत असा त्यांच्यावर आरोप केला जातो.[16] उसाच्या बिलातून सभासदांच्या संमतीविना होणाऱ्या कपाती आणि त्यातून उपलब्ध होणाऱ्या लाखो रुपयांच्या रकमेचा स्वार्थी वृत्तीने होणारा विनियोग यामध्ये सहकाराच्या बंधनाचे उल्लंघन तर होतेच आहे परंतु त्याचबरोबर शेतकऱ्यांचे वर्षानुवर्षे आर्थिक नुकसानही होते. शेतकऱ्यांच्या पदरात त्यांच्याच कारखान्यातून पुरे माप पडत नाही हे त्यांचे दुर्दैव! 'सहकारी' साखर कारखानदारी शोषणमुक्त नाही हाच याचा अर्थ !!

या प्रश्नाला दुसरी एक बाजू आहे. एकतंत्री सत्ता निर्माण करून दीर्घकाळ स्वार्थी हेतूने प्रेरित होऊन कारखाना 'ताब्यात' ठेवणाऱ्या सूत्रधारांची जनमानसातील प्रतिमा उत्तरोत्तर मलीन होत चालली आहे. तथापि हे कारखाने आणि त्या भोवतालचे संकुल उभे करण्यात भूतकाळात याच सूत्रधारांनी परिश्रम घेतलेले आहेत ही गोष्ट नजरेआड करता येणार नाही. आजच्या चित्रावरून व्यक्तींचे भूतकालीन कार्य कमी लेखता येणार नाही. कारखाना उभारणीची व तो वाढविण्याची उपक्रमशीलता अशा व्यक्तींनी दाखविली आहे. त्यांच्या माध्यमातून एका परीने ग्रामीण उद्योजकतेचा आविष्कार घडला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे आणि राजकीय प्रभावामुळे कारखान्याचे संकुल आकार घेऊ शकले. त्यामुळे अशा संकुलाची धुरा त्यांनी आपल्या प्रभावाखाली आजन्म वाहिली तर त्यात गैर काय आहे ? उलट, त्यांच्या नेतृत्वातून संकुलाच्या भावी प्रगतीचा मार्ग सुकर होणार नाही काय ? एकमुखी नेतृत्वाशिवाय हे कसे शक्य होईल ? या प्रश्नावर प्रतिक्रिया अशी आहे. या सूत्रधारांनी कारखान्याच्या संकुलाच्या उभारणीत आणि जडणघडणीत जे योगदान दिले त्याबद्दल कुणाचेही दुमत होऊ नये. मात्र हे करताना कालांतराने त्यांनी जी अनियंत्रित राज्यकर्त्यांची भूमिका घेतली, घराणेशाहीला वाव दिला, कारखान्याच्या पैशाचा मनमानी पध्दतीने विनियोग चालवला आणि सभासदांच्या लोकशाही हक्कांची सातत्याने अवहेलना सुरू केली या गोष्टींनी जनमानसात त्यांच्याविषयी अनादर वाढत गेला आहे. नव्या नव्या लोकांना कारखान्याच्या व्यवस्थापनात सामील करून घेऊन, अधिकारपदाच्या जबाबदाऱ्या सोपवून, स्वतः सल्लागाराची भूमिका घेऊन त्यांना लोकशाही व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण करता आला असता. परंतु इथे सत्ता आणि संपत्ती दोन्हीही हाताशी असल्यामुळे 'अत्युच्चपदी थोरही बिघडतो' असा अनुभव येऊ लागला आहे. कारखाना अजून बाल्यावस्थेत असतो तोपर्यंत सारे काही सुरळीत चालल्यासारखे वाटते; कारखान्याचे वय वाढेल तशा स्वार्थी प्रवृत्ती प्रकर्षाने उचल खातात.

—9—

## समारोप

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारी सहकारी कायद्याच्या चौकटीत उभी आहे आणि कार्यरत आहे खरी. प्रत्यक्षात मात्र बऱ्याच बाबतीत तिचे कार्य सहकारी तत्त्वप्रणालीला छेदणारे आहे. सभासदांना मुक्त प्रवेश, मतस्वातंत्र्य, भांडवलाचे विकेंद्रीकरण आणि कारभाराचे लोकशाहीकरण या बाबतीत अजून बरेच काही करायला हवे. सहकाराच्या आकृतिबंधात बनवलेला, प्रामुख्याने सरकारी भांडवलावर पोसलेला, विशिष्ट व्यक्तींची मिरासदारी बनलेला आणि प्रत्यक्षात सहकारी मूल्यांचा अनेक प्रकारे अनादर करणारा उपक्रम असे या कारखानदारीचे वर्णन केले तर ते गैर ठरणार नाही. खरे तर, कोल्हापूर जिल्ह्याचे हे चित्र सामान्यतः संपूर्ण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचे थोड्याफार फरकाने प्रातिनिधिक असेच आहे हे राज्यात इतरत्र घडणाऱ्या नित्य नैमित्तिक घटनांच्या वारंवार येणाऱ्या बातमीपत्रावरून म्हणता येईल.

### टीपा आणि संदर्भ

1. ऊस तोडल्यानंतर खोडाचा शिल्लक राहणारा भाग म्हणजे 'खोडकी' किंवा 'खोडवा' त्याचा मोबदला 'खोडकी खर्चाच्या रूपाने ऊस दरात वाढ करून

दिला जातो. प्रत्यक्षात साखर संचालक (महाराष्ट्र) यांचा आदेश आहे की, कारखान्यांनी 'खोडकी' साठी ऊस विकास अर्थसाहाय्य (subsidy) म्हणून द्यायची रक्कम फक्त सभासदांनाच द्यावी. 1984-85 पासून याची अंमलबजावणी करायची होती. वार्षिक लेखा परीक्षणात या संदर्भात कारखान्यावर ठपका ठेवणाऱ्या नोंदी प्रतिवर्षी होत राहतात. परंतु साखर कारखाने आणि साखर संचालक या दोघांकडूनही याकडे कानाडोळा केला जातो आहे.

ऊस 'खोडकी' साठीचा खर्च म्हणून कारखान्याने ठरवले तर ज्यांनी ऊस गाळपासाठी दिला त्यांना 1985-86 पर्यंत मेट्रिक टनामागे रु. 7 आणि 1986-87 पासून रु. 10 उसाच्या किंमतीत वाढवून दिले जातात. 1985-86 आणि 1986-87 या अलिकडच्या दोन वर्षांचा संदर्भ घेतल्यास, भोगावती कारखाना 1984-85 पासूनच साखर संचालकांच्या आदेशाप्रमाणे केवळ सभासदांनाच 'खोडकी' खर्च देतो आहे. तर वारणा आणि गडहिंग्लज कारखान्यांनी 1986-87 साली हा खर्च फक्त सभासदांना दिला. म्हणून तक्ता 2 मध्ये कंसातील उसाचा दर बिगर-सभासदांचा आहे. याउलट दत्त, (शिरोळ), दूधगंगा-वेदगंगा आणि दौलत हे तीन कारखाने कोणालाच 'खोडकी' चा खर्च देत नाहीत. छत्रपती राजाराम ने 1985-86 मध्ये कोणालाच दिला नाही तर 1986-87 मध्ये सर्वांना दिला. पंचगंगा, कुंभी-कासारी, छ. शाहू आणि दत्त (आसुर्ले) हे कारखाने सर्वांनाच 'खोडकी' देतात. प्रत्येक कारखान्याने उसाला दिलेला अंतिम दर या संदर्भात लक्षात घ्यावा लागेल.

2. दूधगंगा-वेदगंगा कारखान्याने अलिकडच्या 5 वर्षांत 1986-87 याच वर्षी 100 टक्के गाळपक्षमता वापरली आहे. तत्पूर्वी 1982-83 मध्ये 87 टक्के, 1983-84 मध्ये 77 टक्के, 1984-85 मध्ये 52 टक्के तर 1985-86 मध्ये 50 टक्के गाळपक्षमता वापरली आहे. उसाचा अपुरा पुरवठा हे त्याचे महत्त्वाचे कारण आहे. असे असूनही हा कारखाना अजून तरी 'आजारी' झाला नाही हे त्याचे सुदैवच मानायचे !

3. आंबोली येथील नियोजित आजरा शेतकरी सहकारी कारखान्याला केंद्र शासनाच्या छाननी समितीने मंजुरी दिली आहे. आता हे प्रकरण औद्योगिक परवाना खात्याकडे पाठवण्यात आले आहे. या खात्याकडून कारखान्याला लवकरच औद्योगिक परवाना मिळेल. कारखान्याची गाळपशक्ती 2,500 मे. टन असावी व 40 किलो मीटरच्या परिसरात दुसरा कारखाना असू नये या दोन्ही अटी या कारखान्याच्या प्रस्तावात पूर्ण होत आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली या ठिकाणी होणाऱ्या या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात आजरा, सावंतवाडी व कुडाळ हे तालुके येतात. केंद्र शासनाने 5 एप्रिल 1989 रोजी लोकसभेत जाहीर केलेल्या सुधारित धोरणानुसार ('कॅबिनेट कमिटी फॉर इकॉनॉमिक अफेअर्स'ने ठरवल्याप्रमाणे) मागास भागात सहकारी साखर कारखाना काढण्यासाठी आरंभीची गाळपक्षमता 1,750 मे. टन आणि प्रक्षेत्राचे अंतर 25 कि.मी. ठरवले असून पाच वर्षात गाळपक्षमता 2,500 मे. टनावर वाढवण्याचे बंधन राहील. कदाचित, आजरा कारखाना या बदलातून जाऊ शकेल. पहा : 'सकाळ' (कोल्हापूर), शनिवार 25 मार्च 1989, पृ. 5 आणि **"Sugar lobby does it again", Financial Express, April** 4 1989 पृ. 1.

4. 1987-88 च्या गळित हंगामात कर्नाटकातून बराच अतिरिक्त ऊस महाराष्ट्रातील कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील सीमेलगतच्या कारखान्यात गळितासाठी आणण्याची धडपड कर्नाटकातील ऊसकऱ्यांनी जेव्हा सुरू केली तेव्हा कर्नाटकात शासनाने प्रथम त्यावर बंदी घातली. जेव्हा शेतकऱ्यांचे दडपण वाढले तेव्हा बंदी उठवली आणि राज्याबाहेर जाणाऱ्या उसावर कर लादून त्यातून चांगलेच उत्पन्न मिळवले. यातून सीमावर्ती कारखान्यांना बरेच शिकण्यासारखे आहे.

5. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीत आजारी कारखान्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. ती 1980-81 साली अवघी 5 होती, ती 1985-86 सालात 25 वर गेली आणि 1988-89 मध्ये 50 वर पोचली. - 'महाराष्ट्र टाईम्स', गुरुवार, 30 मार्च, 1989.

6. 1986-87 मध्ये सर्व सहकारी साखर कारखान्यांची एकत्रित गाळपक्षमता 25,700 मे. टन आणि एकंदर सभासद संख्या (पंचगंगा - 1985 -86 ची संख्या धरून) 1,03,870 होती. यावरून, त्या वर्षी एकंदर सभासदांची प्रती टन गाळपक्षमतेस एकत्रित सरासरी 4.04 होती.

7. पंचगंगा कारखान्यातील विद्यमान सूत्रधारांनी पुढील निवडणुकीवर लक्ष ठेवून पाच हजार बेकायदेशीर सभासद करून घेतल्याचा आरोप आहे. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. वारणा कारखान्याने ऊस शेती नाही अशा शेतकऱ्यांना सभासद करून घेतले आहे या तक्रारीची छाननी सध्या साखर संचालकांकडून केली जात आहे. कोल्हापूर जिल्ह्याबाहेरील दोन उदाहरणे या संदर्भात उद्धृत करणे उपयुक्त ठरेल. पाटण तालुक्यातील (जिल्हा सातारा) बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याच्या विद्यमान संचालक मंडळाने सर्व पात्रता असूनही आणि आवश्यक ती पूर्तता करूनही 2,100 शेतकऱ्यांचे सभासदत्वाचे अर्ज नाकारले. अखेरीस त्यांना सभासदत्व देण्याचा निर्णय प्रादेशिक उपसंचालक (साखर), पुणे विभाग यांच्या न्यायालयाने दिला. दुसरी घटना निवडणुकीतील मतदानाच्या हक्कासंबंधीची आहे. रेठरे बुद्रुक (तालुका कराड, जिल्हा सातारा) येथील कृष्णा कारखान्याने उपनियम 32 (ए) (4) (2) अन्वये 10 गुंठ्यापेक्षा कमी क्षेत्रावर ऊस पिकवणाऱ्या 26 हजार भागधारक शेतकऱ्यांना कारखान्याच्या आगामी निवडणुकीत अपात्र ठरविण्याचा निर्णय केला होता. ही बाब न्यायालयात गेली आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानुसार या सर्व शेतकरी सभासदांना मतदानास पात्र ठरवण्यात आले.

8. सहकारी कायद्यानुसार सामान्यतः अर्धा ते 1 एकर ऊसधारकाला 1 भाग मिळतो. अधिक उसासाठी त्या प्रमाणात अधिक भाग मिळू शकतात. मात्र कोणालाही 25 भागांपेक्षा अधिक भाग धारण करता येणार नाहीत. संचालक मंडळाने ठरवल्यास अर्धा एकरपेक्षा कमी ऊसक्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यालाही 1 भाग मिळू शकतो.

9. पंचगंगा कारखान्याचे 1985-86 चे आकडे यामध्ये समाविष्ट आहेत.

10. परिपत्रक जावक क्र. सा. सं - विकास 1 - भाग धारण - सी आर - 611, दिनांक 20-12-1983.

11. जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी 1982-83 ते 1986-87 या पाच वर्षांच्या कालावधीत प्रति टन रु. 1 ते 22 या मर्यादित बिनपरतीची ठेव जमा केली. सामान्यतः हा दर रु. 1 ते 10 या मर्यादितच बहुतेक वेळा राहिलेला आहे.

12. सन 1986-87 मध्ये या ठेवींवर 12 टक्के दराने व्याज दिले.

13. दत्त (शिरोळ) कारखान्याचे एक संचालक श्री. प्रकाश खंजिरे यांनी वृत्तपत्राला दिलेले एक निवेदन या संदर्भात बोलके ठरेल. ते म्हणतात, " सध्या दत्त कारखान्याची 2,700 टन गाळपशक्ती आहे. ती 2,300 टनांनी वाढवून 5,000 टनापर्यंत करण्याची योजना आखली आहे. या योजनेखाली नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडून 14 कोटी 92 लाख रुपये कर्ज 12.75 टक्के व्याजाने घेण्यात येणार आहे. केंद्र शासनाकडून 6 टक्के व्याजाने 1 कोटी 76 लाख रुपये घेतले आहेत. या सर्व कर्जावर पहिल्या वर्षी 2 कोटी 93 लाख 56 हजार रुपये एवढे व्याज द्यावे लागणार आहे. सध्या कारखान्याकडे 50 लाख रुपयांचा नॉन रिफंडेबल फंड (बिनपरतीची ठेव) जमा आहे. तसेच कारखाना सभासदांकडून 8 कोटी 25 लाख रुपये शेअर कॅपिटल जमा करणार आहे.

यावर 12 टक्के व्याज दिले जाणार आहे. कारखान्याकडे पुरेशी रक्कम नसताना तसेच ऊस उपलब्ध नसताना 16 कोटी रुपयांचे कर्ज उभारून कारखान्याची गाळपक्षमता वाढवण्यास आमचा विरोध आहे. कर्जापोटी सभासदांना रु.29.35 व्याज द्यावे लागणार आहे. त्यामुळे सभासदांना प्रती टनी 50 रुपये कमी दर घ्यावा लागणार आहे. त्यामुळे सभासदांचे आर्थिक नुकसान होणार आहे.'' - 'सकाळ' (कोल्हापूर), गुरुवार 23 मार्च 1989, पृ. 5, रकाना 1-2.

14. कुंभी-कासारी कारखान्याच्या गळिताला 25 वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने कारखान्याच्या उपयुक्ततेविषयी एक सर्वेक्षण कारखान्याने शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाकडून करवून घेतले. त्यातील निवडक प्रतिक्रिया या संदर्भात प्रातिनिधिक म्हणून मानता येतील.

(अ) **आजी व माजी संचालकांची संचालक मंडळाविषयी मते** - बऱ्याच संचालकांनी मान्य केले आहे की, त्यांना कारखान्याची उद्दिष्टे पूर्णपणे माहीत नाहीत. संचालक मंडळाच्या सभेमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीव्यतिरिक्त इतर बाबींच्या विकासासाठी केव्हाही गंभीररूपाने चर्चा होत नाही. (पान 14-ब).

स्वतःची माणसे व गावे यांच्या भल्यासाठी आम्ही संचालक मंडळावर जातो. (इंग्रजी आवृत्ती : 2.3).

(ब) **संचालक मंडळाविषयी सभासदांची मते** - (1) संचालक मंडळ कोणतेही आले तरी आजपर्यंत त्यांनी संकुचित दृष्टी ठेवूनच काम केले आहे. त्यामुळे कारखान्याची अपेक्षेप्रमाणे प्रगती होण्यात अडथळे आले आहेत. सहकारी तत्त्वावर जरी कारखाना असला तरी सहकार तत्त्व काय आहे ह्याचे फारसे ज्ञान त्यांच्याजवळ आहे किंवा नाही याचा संभ्रम पडतो. (2) नवीन योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये आजपर्यंत संचालकांनी अनुत्साह दाखवला आहे. सभासदांच्या अडिअडचणी समजावून घेण्यामध्ये त्यांनी फारसे स्वारस्य दाखवले नाही. (पृ. 17-क).

-'' कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील उत्पादक सभासदांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व शेतीविषयक गेल्या 25 वर्षांतील प्रगतीचा आढावा.'' संख्याशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,1988.

15. जनरल सभेमध्ये बोलण्याची वा चर्चा करण्याची संधी मिळत नसल्याने अशा सभेचा सभासदांना फारसा उपयोग होत नाही, फक्त पैसा आणि वेळ वाया जातो. (सभासदांचे मत).

- उपरोक्त, पृ. 16 (11).

16. पंचगंगा आणि वारणा कारखान्यांची शासकीय चौकशी अशाच आरोपाखाली चालू आहे.

## परिशिष्ट

# निवडणुकीनंतरचे चित्र

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या निवडणुका अलिकडेच पार पडल्या. पंचगंगा आणि दत्त (शिरोळ) हे कारखाने बहु-राज्य सहकारी संस्था कायद्याखाली **(Multi-state cooperative Societies Act)** स्थापन झालेल्या असल्यामुळे त्यातील तरतुदीनुसार त्यांची त्रैवार्षिक निवडणूक झाली. इतर नऊ कारखाने महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याखाली स्थापन झालेल्या असल्याने त्यातील तरतुदीनुसार त्यांची पंचवार्षिक निवडणूक झाली. छत्रपती शाहू कारखान्याने आपले नवे संचालक मंडळ 1987 मध्ये, गडहिंग्लज कारखान्याने 1988 मध्ये आणि इतर 9 कारखान्यांनी मे-जून-जुलै 1989 मध्ये निवडले. छत्रपती शाहू कारखान्याचे सर्वच संचालक बिनविरोध निवडून आल्याने त्या परिसरात निवडणुकीचा धुरळा उडाला नाही. याउलट, गडहिंग्लज कारखान्यात सत्ता बदलासाठी विरोधकांनी भक्कम आघाडी उभारली आणि त्यात ते पूर्ण यशस्वी झाले. या दोन्ही घटना जशा वैशिष्ट्यपूर्ण होत्या तशाच अपवादात्मकही होत्या. कारण, त्या सातारा जिल्ह्यातील रेठरे बुद्रुक येथील कृष्णा सहकारी साखर कारखान्यातील सत्ता बदलाचे नाट्य घडण्यापूर्वीच्या आहेत. म्हणून त्या या प्रवाहाच्या निरपेक्ष आहेत.

जिल्ह्यातील बाकी 9 कारखान्यांच्या निवडणुकांना मात्र प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे 'कृष्णा'तील घटनांचा संदर्भ होता. प्रभावी विरोधी आघाडी उभारून प्रस्थापितांना मुळासकट उखडून टाकता येते असा एक आत्मविश्वास प्रत्येक कारखान्यातील विरोधी शक्तींना वाटू लागला आणि त्या दृष्टीने निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरू झाली. त्यातच काही ज्येष्ठ कारखान्यांच्या बाबतीतले गैरव्यवहाराचे आरोप आणि त्यांची सरकारी यंत्रणेमार्फत चाललेली चौकशी याचा फायदा आपणास आपले इप्सित साध्य करण्यासाठी उठवता येईल असा विरोधकांचा होरा होता. या पार्श्वभूमीवर प्रस्थापित शक्तींनीही ही निवडणूक आपल्या जीवनमरणाचा प्रश्न मानून आणि आपले सर्व कौशल्य पणाला लावून लढविण्याची तयारी केली. विशेषतः पंचगंगा, वारणा, दत्त (शिरोळ) आणि भोगावती कारखान्यांच्या निवडणूक निकालाबद्दल अधिक उत्सुकता होती. सर्वच कारखान्यांच्या निवडणुका पॅनेल पध्दतीने पार पडल्या. प्रस्थापितांचे पॅनेल विरुध्द विरोधकांच्या एका वा अनेक गटांची पॅनेल्स असा तो सामना होता.

या मंथनातून काय निष्पन्न झाले? संचालक मंडळांचा चेहरामोहरा बदलला काय? नेतृत्व बदल घडू शकला काय? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी तक्ता 10 चा आधार जरुरीप्रमाणे घेता येईल.

तक्ता 10

**निवडणुकीनंतरची साखर कारखान्यांच्या संचालक मंडळाची जडणघडण**

| साखर कारखाना | निवडलेल्या संचालकांची संख्या | मागील संचालक मंडळातील पुन्हा निवडून आलेल्या संचालकांची संख्या | नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची निवडणुकीपूर्वीची त्या अधिकार पदावरील / संचालक मंडळावरील एकूण वर्षे | |
|---|---|---|---|---|
| | | | अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| 1. पंचगंगा | 12 | 7 (58.33) | 33 | 12 |
| 2. भोगावती | 14 | 1 (7.14) | 1 | — |
| 3. वारणा | 19 | 13 (68.42) | 33 | 33 |
| 4. दूधगंगा वेदगंगा | 16 | 3 (18.75) | 7 | — |
| 5. कुंभी-कासारी | 21 | 5 (23.81) | 26 | — |
| 6. दत्त (शिरोळ) | 11 | 8 (72.73) | 21 | 11 |
| 7. दौलत | 18 | 5 (27.78) | 16 | 12 |
| 8. गडहिंग्लज | 18 | 2 (11.11) | — | — |
| 9. छ. शाहू | 13 | 9 (69.23) | 9 | 9 |
| 10. दत्त (आसुर्ले) | 12 | 5 (41.67) | 5 | 5 |
| 11. छ. राजाराम | 15 | 4 (26.67) | 5 | — |

**टीप** : कंसातील आकडे संचालकांच्या एकूण संख्येशी टक्केवारी दर्शवितात.

पंचगंगा कारखान्यात विद्यमान अध्यक्षांच्याच दीर्घ सहवासातील काही सहकाऱ्यांनी विरोधी पवित्रा घेऊन विरोधी आघाडी उभारली. विद्यमान अध्यक्षांनी विरोधी गेलेले सहकारी वेगळे आणि त्याऐवजी नव्या सभासदांना संधी दिली. हे करताना एकनिष्ठ जुन्या सहकाऱ्यांनाच सोबत घेतले. विद्यमान अध्यक्षांनी 12 पैकी 11 जागा जिंकल्या आणि फक्त 1 जागा विरोधकांना मिळाली. अत्यंत चुरशीच्या या निवडणुकीनंतर मिळालेल्या भक्कम बहुमतामुळे विद्यमान अध्यक्षच आपल्या पदावर कायम राहिले. विद्यमान उपाध्यक्ष विरोधात गेल्याने त्यांच्या जागी एका ज्येष्ठ सहकाऱ्याला आणले.

भोगावती कारखान्यात चौरंगी लढत झाली तरी खऱ्या अर्थाने शेतकरी कामगार पक्षप्रणित विद्यमान अध्यक्षांचे पॅनेल आणि विरोधी काँग्रेस पक्षप्रणित पॅनेल यांच्यातच सामना होता. यामध्ये काँग्रेस पक्षप्रणित एका गटाच्या पॅनेलने 14 पैकी 13 जागा मिळवल्या आणि एकमेव जागा विद्यमान अध्यक्षांनाच मिळाली. अशा प्रकारे या कारखान्यानेही गडहिंग्लजप्रमाणेच दीर्घकालीन सत्तेवर असणाऱ्या मंडळींना बाहेर घालवले. विजयी पॅनेलने मात्र उमेदवार उभे करताना पूर्वी कधी काळी वर्ष दोन वर्षे संचालक मंडळात असलेल्या 5 सभासदांना पुन्हा प्रकाशात आणले. नवनिर्वाचित अध्यक्ष हे पूर्वी एक वर्ष संचालक होते. मात्र त्यांचे वडील कारखान्याच्या स्थापनेपासून सातत्याने 25 वर्षे संचालक मंडळावर असून त्यापैकी पहिली 6 वर्षे उपाध्यक्ष आणि नंतर 13 वर्षे अध्यक्ष होते. नवे उपाध्यक्ष प्रथमतःच या रिंगणात आले आहेत. या कारखान्यामध्ये घडलेल्या सत्तान्तराला पूर्वीच्या शेतकरी कामगार पक्षप्रणित संचालक मंडळातील अंतर्गत दुहीच प्रामुख्याने कारणीभूत ठरली आहे. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ झाला.

वारणा कारखान्यात विद्यमान अध्यक्षांच्या पॅनेलने सर्व जागा जिंकल्या आणि कारखान्यावरील आपले अधिपत्य पुन्हा एकदा सिध्द केले. आपल्या यशासाठी अध्यक्षांनी मागील संचालक मंडळातील 13 सभासदांना पुन्हा संधी दिली. सहा नवे चेहरे समाविष्ट केले असले तरी त्यापैकी दोघांचे वडील पूर्वी सुमारे 13 ते 15 वर्षे आणि एकाचा भाऊ 14 वर्षे संचालक होते. फक्त तीन संचालकच व्यक्ती आणि गावे या दोन्हीही बाबतीत मंडळात

प्रथमतःच येत आहेत. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदात बदल झालेला नाही. विशेष म्हणजे, अध्यक्षांनी प्रस्तुत कालखंड संपल्यानंतर पुन्हा निवडणुकीस उभे न राहण्याचे निवडणूक प्रचाराच्या वेळीच जाहीर केले आहे. थोडक्यात, वारणेच्या संचालक मंडळाचे चित्र नजरेत भरण्याइतके अजिबात बदलले नाही.

दूधगंगा वेदगंगा कारखान्याने संचालक मंडळावर सातत्याने नव्या व्यक्तींना आणि नव्या गावांना प्रतिनिधित्व देण्याची आपली परंपरा यावेळीही राखली आहे. त्यामुळे विद्यमान अध्यक्षांचे पॅनेल बहुमताने विजयी झाले असले तरी मंडळावरील 16 पैकी फक्त 3 जागांवर मागच्या मंडळातील सभासद आले आहेत. तथापि, सत्तारूढ तसेच विरोधी गटाने पूर्वी एखादा कालखंड संचालकपदी राहिलेल्या काही सभासदांना आणि / अथवा त्यांच्या मुलांना संचालकपदी आणण्याचे धोरण अनुसरलेले दिसते. निवडणुकीनंतर अध्यक्षपदात बदल झाला नाही; उपाध्यक्षपदी एका जुन्या संचालकाला आणले आहे.

कुंभी-कासारी कारखान्याने चौरंगी सामन्यात विद्यमान अध्यक्ष आणि उपाध्यक्षांना बाहेर फेकले. भूतपूर्व अध्यक्षांच्या पॅनेलने 21 पैकी 17 जागा जिंकल्या आणि राष्ट्रीय शेतकरी आघाडी या तीनपैकी एका विरोधी गटाला 4 जागा मिळाल्या. विशेष म्हणजे, 21 पैकी फक्त 5 सभासद मागील संचालक मंडळात होते; इतर सर्व नवे सभासद आहेत. या रीतीने या कारखान्याने पूर्वपरंपरेनुसार संचालक मंडळ बदलते ठेवले असले तरी अध्यक्षपदाची सूत्रे पुन्हा एकदा भूतपूर्व अध्यक्षांकडे सोपविली आहेत. उपाध्यक्षपदी मात्र नवी व्यक्ती आणली आहे.

दत्त (शिरोळ) कारखान्यात सत्तारूढ गटाचेच सर्व उमेदवार निवडून आले. या गटाने 11 पैकी 8 सभासद पूर्वीचेच ठेवून फक्त 3 नव्या सभासदांसह निवडणूक लढविली. अध्यक्षपदात बदल झाला नाही. उपाध्यक्षपदी एका जुन्याच सहकाऱ्याला निवडण्यात आले. परिणामी, संचालक मंडळाची सामान्य प्रतिमा बदलली नाही.

दौलत कारखान्यातही सत्तारूढ गटाने सर्व जागा मिळविल्या आणि विद्यमान अध्यक्ष व उपाध्यक्षांची पदेही पुढे चालू ठेवली. मात्र निवडणुकीच्या सोपस्कारातून जाताना विद्यमान अध्यक्षासहित फक्त 5 संचालकांना पुन्हा संधी दिली आणि 13 नवे सभासद निवडून घेतले.

गडहिंग्लजच्या संचालक मंडळावर विरोधी गटाचे सर्व उमेदवार निवडून आले आणि त्यामुळे कारखाना उभारणीपासून अस्तित्वात असलेली सत्ता संपुष्टात आली. विरोधकांनी विद्यमान संचालक मंडळातील दोघांना आपल्या गटात घेऊन त्यांना पुन्हा निवडून आणले तसेच 1977-79 या काळातील दोघा संचालकांना पुन्हा रिंगणात आणले. नवनिर्वाचित अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे दोघेही नव्यानेच आपला पदभार सांभाळताहेत.

संचालक मंडळाची बिनविरोध निवड झालेला एकमेव कारखाना म्हणून छ. शाहू कारखान्याचा उल्लेख करावा लागेल. ही निवड करताना सत्तारूढ गटाने 13 पैकी 9 संचालकांना पुन्हा संधी दिली. दोन संचालक निवडणुकीपूर्वीच काही महिने निर्वतले नसते तर बव्हंशी त्यांनाही राखले असते. त्यांच्याऐवजी दोन आणि इतर दोन असे चार नवे सभासद संचालक मंडळावर आणले गेले. कारखान्याच्या मुख्य प्रवर्तकानीच दोन वर्षांच्या विश्रांतीनंतर पुन्हा अध्यक्षपदाची धुरा सांभाळली असून उपाध्यक्षपद अखंडित राहिले आहे. अशा रीतीने संचालक मंडळाचा तोंडावळा फारसा बदलला नाही.

दत्त (आसुर्ले) आणि छ. राजाराम या कारखान्यांचे संचालक मंडळ आतापर्यंत सरकारनियुक्त होते. दोघांचीही ही पहिली निवडणूक होती. दत्त (आसुर्ले) मध्ये ती खूप हिरिरीने लढली गेली. त्यात विद्यमान अध्यक्षांच्या बाजूने कौल मिळाला. त्यांनी आपले संपूर्ण पॅनेल विजयी केले. त्यात विद्यमान संचालक मंडळातील 5 सभासदांना स्थान मिळाले; 7 सभासद नवे होते. विद्यमान अध्यक्षांनीच हे पद पुन्हा सांभाळले; उपाध्यक्षपद नव्या व्यक्तीला दिले. याउलट छ. राजाराम कारखान्यातील विद्यमान अध्यक्षांच्या पॅनेलने 15 पैकी 6 जागा बिनविरोध जिंकून पुढील यशाचा मार्ग मोकळा केला होता. उर्वरित निवडणुकीत त्या गटाने आणखी 8 जागा जिंकल्या. विद्यमान संचालक मंडळातून अध्यक्षासह 4 सभासद पुन्हा निवडले गेले. अध्यक्षपद पूर्वीप्रमाणे चालू राहिले; उपाध्यक्षपदी नवी व्यक्ती आली.

हा सर्व तपशील लक्षात घेतल्यानंतर सर्व कारखान्यांच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या आणि अध्यक्ष—उपाध्यक्षांच्या निवडीनंतर नेमके कोणते चित्र प्रत्ययास येते? सारांश रूपाने पुढील गोष्टी सांगता येतील.-

(1) वारणा, दत्त, (शिरोळ), दौलत, छ. शाहू व दत्त (आसुर्ले) या पाच कारखान्यांत सर्व जागा आणि पंचगंगा, दूधगंगा वेदगंगा, कुंभी-कासारी व छ. राजाराम या चार कारखान्यांत बहुसंख्य जागा सत्तारूढ गटाने मिळविल्यामुळे जिल्ह्यातील 11 पैकी 9 कारखान्यांत कोणताही आश्चर्यजनक बदल संभवत नाही.

(2) गडहिंग्लज आणि भोगावती या दोन कारखान्यांत विरोधी पक्ष सत्तेवर आल्यामुळे कारखान्यांची पूर्वीची प्रतिमा उजळण्याची शक्यता आहे असे सकृत्‌दर्शनी म्हणता येईल. प्रत्यक्षातील कामावरूनच हा विश्वास कितपत सार्थ होता याचे प्रत्यंतर येईल.

( 3 ) जिल्ह्यातील ज्येष्ठ आणि बहुचर्चित तीन कारखान्यांनी आपल्या संचालक मंडळात बहुसंख्य विद्यमान सभासद ठेवले आहेत. निर्वाचित सभासदांच्या एकूण संख्येत विद्यमान सभासदांचे प्रमाण आहे. पंचगंगा–58.83 टक्के, वारणा–68.42 टक्के आणि दत्त (शिरोळ)–72.73 टक्के. अजून प्रकाशझोताबाहेर असलेल्या छ. शाहू कारखान्यात हे प्रमाण 69.23 टक्के आहे. याचा अर्थ, या चारही कारखान्यांत दीर्घकाल सत्तेवर असलेल्या सत्ताधिशांचीच एकतंत्री राजवट आणखी तीन वा पाच वर्षे चालणार. जे थोडेफार नवे संचालक आहेत ते सूत्रधारांच्या कृपेनेच आलेले असल्याने त्यांना स्वतंत्र मत असणार नाही.

( 4 ) कुंभी-कासारी, दौलत आणि दूधगंगा वेदगंगा या तीन कारखान्यांत संचालक मंडळावर नवी माणसे अधिक संख्येने आली असली तरी नवनिर्वाचित अध्यक्षांच्या कारखान्याच्या संचालक मंडळावरील दीर्घकालीन स्थानांमुळे ते सूत्रधार कारखान्यावरील आपली पकड ढिली होणार नाही यासाठीच कसून झटतील. इथेही नवी माणसे मोठ्या संख्येने त्यांचीच आहेत.

( 5 ) छ. राजाराम आणि दत्त (आसुर्ले) कारखान्यातही विद्यमान अध्यक्षांनीच बाजी मारली आहे. काही जुने आणि बरेच नवे सभासद त्यांनी संचालक मंडळात आणले आहेत. तेही जुन्या कारखान्यांचा आदर्श नजरेसमोर ठेवून आपला वरचष्मा राखण्याचा प्रयत्न करतील.

निवडणुकांच्या गदारोळात जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या क्षेत्रात काही काळ आशा-निराशेचे वातावरण निर्माण झाले होते. 'कृष्णा' प्रमाणेच काही कारखान्यांत तरी प्रस्थापित गट उखडले जातील असा आशावाद बाळगला जात होता. प्रत्यक्षात मात्र प्रस्थापितांनी नेहमीपेक्षा अधिक जागरूकतेने बहुसंख्य ऊसकरी सभासदांवरचा आपला प्रभाव अविचल राखून आपले यश निश्चित केले. याचा अर्थ एवढाच की, दीर्घकालपर्यंत कारखान्याची सूत्रे स्वतःकडे ठेवून साखर कारखान्यांच्या सूत्रधारांनी आपापल्या परिसरात आपले पाय घट्ट रोवले आहेत. त्यामुळे त्यांना उखडून काढणे सहज साध्य नाही. विरोधी आघाड्या निर्माण झाल्या खऱ्या परंतु 'कृष्णा' प्रमाणे तोडीस तोड नेतृत्व न लाभल्याने आणि / अथवा विरोधकांतील फाटाफुटीमुळे विरोधकांना (भोगावती व गडहिंग्लज वगळता) आपले इप्सित साध्य करता आले नाही. मात्र हेही खरे की, अनेक ठिकाणी विरोधकांनी मिळविलेली मते विचारात घेतल्यास, विरोधक दोन पावले पुढे सरकले आहेत असे म्हणता येईल.

प्रस्थापितांनी आर्थिक व्यवहारातील शुचितेचे आश्वासन दिले आहे. ऊस उत्पादक, राजकीय कार्यकर्ते आणि शासन यांच्या रेट्याखाली त्यांना हे करणे अनिवार्य ही ठरेल. खरा प्रश्न आहे तो एकतंत्री राजवटीच्या बेड्या कितपत सैल होतात याचा. बिगर सभासद ऊसकऱ्यांना सभासद करून घेण्यात कितपत उदारता दाखविली जाते, सभासदांना कारखान्याच्या कामकाजात कितपत मुक्तपणे सहभागी होता येते आणि कारखान्याचे आर्थिक व्यवहार सभासदांच्या हिताच्या दृष्टीने कितपत चालवले जातात यावरच या सहकारी उपक्रमाचे सहकारीपण अवलंबून राहील.

◊◊◊

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**आजीव सदस्यांची यादी**
**(एप्रिल-जून 1989 अंकावरून पुढे चालू)**

444 प्रा. ब. म. सवदी, निपाणी (जि. बेळगांव)
445 श्री. बाळकृष्ण शा. माने, मुंबई
446 प्रा. बाबूराव बा. कोदळकर, कर्जत (जि. अहमदनगर)
447 प्रा. रमेश माळी, भडगाव (जि. जळगांव)
448 प्रा. कैलाश काशीनाथ पाटील, परभणी
449 प्रा. एकनाथ कृ. पोळ, वाई (जि. सातारा)

# शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी श्रमदानातून बांधलेला बंधारा

आ. गो. पुजारी *

**प्रास्ताविक**

सहकार हाच लोकशाहीचा आधार आहे, लोकशाही हाच धर्म आहे आणि सहकार हाच आचार आहे! अशा शब्दात सहकाराचे वर्णन केले जाते. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अनेक क्षेत्रात सहकारी तत्त्वाचा अवलंब केला जातो, हे खरे आहे. साखर कारखान्यापासून ते थेट ग्राहक भांडारापर्यंत आज सहकाराचे जाळे देशात पसरले आहे. परंतु वारंवार पडणाऱ्या भयंकर दुष्काळाच्या संकटातून, पाण्याच्या तीव्र टंचाईतून सोडवणूक करण्यासाठी सहकारी तत्त्वावर श्रमदानाच्या माध्यमातून मोठा बंधारा बांधण्याचा अभिनव प्रयोग घडला आहे. देशात बंधारे बांधणे ही राज्य व केंद्र सरकारची जबाबदारी असल्याचे सर्वांनाच विदित आहे. परंतु सरकारच्या मदतीविना खाजगी क्षेत्रात सहकारी तत्त्वावर भारतात प्रथम धरण बांधण्याचा हा एक अभिनव प्रयोग होय! राज्य अथवा केंद्र सरकारची कसलीच आर्थिक मदत न घेता स्वतःच्या हिमतीवर करीत असलेल्या ह्या अभिनव प्रयोगाचे थोड्या प्रमाणात का होईना; पण सरकारवरील अवलंबित्व कसे कमी करता येईल हे कर्नाटकातील जमखंडी व अथणी तालुक्यातील 27 खेड्यातील शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे. कदाचित वृत्तपत्रातून आपण वाचले असेल की, सांगली जिल्ह्यातील बलवडी या ठिकाणी 3 मि. उंचीचे 20 मि. लांबीचे बळीराजा नामक धरण बांधले जात आहे. तेथील शेतकरी नदीतील वाळू विकण्याची सरकारकडून परवानगी काढून त्या पैशातून हा बंधारा बांधत आहेत. तर जमखंडी तालुक्यातील चिकपडसलगी येथे 8 मी. उंच 450 मीटर लांब, एक कोटी 15 लक्ष रु. खर्चाचा एक बंधारा कृष्णा नदीवर शेतकरी स्वखर्चातून व श्रमदानातून बांधत आहेत. त्याची सविस्तर माहिती या लेखाव्दारे देण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्थसंवादासाठी प्रस्तुत लेख लिहिण्यासाठी गेल्या मे महिन्यात प्रत्यक्षात बंधाऱ्याच्या

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा (सोलापूर)

ठिकाणी जाऊन तेथील आवश्यक ती सर्व कागदपत्रे नकाशे पाहिले व संयोजकांची व काही शेतकऱ्यांची मुक्त मुलाखत घेतली.

**बंधारा व त्याचे स्वरूप :**

कर्नाटक राज्यातील विजापूर हा इतिहास प्रसिध्द जिल्हा असून तेथील गोलघुमट, आजूबाजूचा बादामी, ऐहोळे, पट्टदकल्लू इत्यादी इतिहास प्रसिध्द प्रेक्षणीय स्थळे बऱ्याच लोकांना परिचयाची आहेत. या जिल्ह्यात एकूण पाच नद्या वाहात असल्या तरी प्रतिवर्षी भयानक दुष्काळ या जिल्ह्याच्या नशिबी चुकलेला नाही. या पाच नद्यांपैकी कृष्णा ही सर्वात मोठी नदी असून ती देखील उन्हाळ्यात कोरडी पडते. या नदीवर जमखंडी शहरापासून 14 कि. मी. अंतरावर जमखंडी - विजापूर राज्य रस्त्यावर हा प्रस्तुत बंधारा बांधण्यात येत आहे. चिकपडसलगीच्या मुख्य पुलापासून वरच्या बाजूला 60 मीटर अंतरावर प्रत्यक्षात धरणाची जागा आहे. वरील जागा रयत संघाचे तांत्रिक सल्लागार - अभियंते - श्री. एल्. टी. अम्मीनभावी यांनी 14-12-87 रोजी निश्चित केली आणि त्यानंतर सरकारी पाटबंधारे (बेळगाव उत्तर भाग) अभियंते यांनी 24-1-88 रोजी या जागेची पाहणी करून ती योग्य असल्याचा निर्वाळा दिला. नदीपात्रातील रान घट्ट दगडयुक्त असून दोन्ही बाजूचे किनारे मजबूत आहेत. या परिसरात नदी सरळ दिशेने वाहात असून तांत्रिकदृष्ट्या बंधारा बांधण्यास ती जागा योग्य आहे.

बंधाऱ्याची लांबी 450 मीटर असून त्यातील 120 मीटर दगडी भिंत तर उर्वरित भागात वेगवेगळ्या उंचीचे लोखंडी दरवाजे बसविण्यात आले आहेत. 180 मीटर लांबपर्यंत 8 मीटर उंचीचे सिमेंटचे पिलर उभे केले आहेत. धरणापासून मागे 20 कि. मी. म्हणजे हिप्परगी बॅरेजपर्यंत 3 टी. एम. सी. इतके पाणी संग्रह होणार असून 26,000 एकर जमिनीला कायम पाणी मिळणार आहे. जलाशयातून पंपसेटच्या साहाय्याने पाणी उचलून घ्यावयाचे आहे. बंधाऱ्याच्या कामासाठी आवश्यक असलेली सर्व प्रकारची तांत्रिक सेवा श्री. अम्मीनभावी, अशोक तुंगळ, हेगडे धारवाडचे अभियंते इत्यादी पुरवीत आहेत आणि बंधारा पूर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल करण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. जानेवारी 1988 मध्ये बांधकामास प्रारंभ झाला असून मे 1989 मध्ये 90 टक्केपेक्षा अधिक काम पूर्ण झाले होते. छायाचित्रावरून हे आपल्याला अधिक स्पष्ट होते. 1990 जानेवारीमध्ये पाणी अडविणार असल्याचे श्री. न्यामगौडा यांनी सांगितले.

**गरजेतून मार्ग सुचला :**

गरजेतून मनुष्य मार्ग शोधतो, हा नेहमीचाच आपला अनुभव आहे. या परिसरातील शेतकऱ्यांना सततच्या पाण्याच्या दुष्काळातून व पाणी टंचाईतून या अभिनव प्रयोगाचा विचार सुचला. सातारा, कोल्हापूर, सांगली मार्गे कृष्णा विजापूर जिल्ह्यात प्रवेश करीत असताना सुमारे 250 कि. मी. लांबपर्यंत वाहात जाते. या नदीवर महाराष्ट्रात ठिकठिकाणी बंधारे बांधल्यामुळे उन्हाळ्यात अथणी व जमखंडी तालुक्यातील दोन्ही शहरासहीत अनेक खेडयात शेतीच्या एवढेच नव्हे तर पिण्याच्या पाण्याचीही तीव्र टंचाई वर्षानुवर्षे भासत आहे. गेल्या 10-15 वर्षापासून एका बाजूला पावसाचे प्रमाण कमी झाले असून दुसऱ्या बाजूला पाणीपुरवठ्यासाठी नदीवरील पंपसेटची संख्या वाढत आहे. परिणामी उन्हाळ्यात नदी कोरडी ठणठणीत. मग कोयना धरणातून पाणी सोडण्यास महाराष्ट्र शासनाला वारंवार विनंत्या कराव्या लागत. कर्नाटक सरकारने पाण्याचे पैसे भरले तरच पाणी नाही तर नाही. त्यातूनही राजकीय हितसंबंधातून महाराष्ट्र शासनाने वेळेवर पुरेसे पाणी सोडले तर ठीक नाही तर पिण्याच्या पाण्याच्या समस्येबरोबरच चिकपडसलगी ते महीशवाडगीपर्यंत नदीच्या दोन्ही बाजूला कोट्यवधी रुपयांचे ऊस वाळून जातात.

या परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रतिवर्षी नदीकाठचे अनेक शेतकरी एकत्र येऊन नदीपात्रातील पाणी कमी होण्याची लक्षणे दिसू लागली की, म्हणजे जानेवारी महिन्यात वाळूने भरलेल्या सिमेंटच्या पोत्याने छोटेछोटे बांध घालून उसाचे पीक जगवू लागले. संबंधित प्रत्येक शेतकरी प्रत्येक वर्षी 500/- रु. खर्च करीत असे. वाळूच्या एका बांधासाठी 50 हजार रु. खर्च होत असे. पावसाळ्यात बांध फुटून वाळू वाहून गेलेली असायची. पुन्हा पुढच्या वर्षी 50 हजार रु. खर्च करावयाचे. तरीदेखील शेतकऱ्यांना या खर्चाची पर्वा नव्हती. कारण 500/- रु. खर्चात 10-15 हजार रु. किंमतीचा ऊस हाती लागायचा. म्हणून वाळूने बांध घालण्याऱ्या शेतकऱ्याच्या संख्येत जशी वाढ होत गेली तसे पाणी अडविण्यास खेड्या-खेड्यामध्ये स्पर्धा सुरू झाली. जागोजागी अशा प्रकारच्या बांधाची संख्या वाढत गेली तसा प्रत्येक वर्षी पुराबरोबर पैसा वाया जाऊ लागला. प्रस्तुत पार्श्वभूमीवर काही जाणकार मंडळींनी या भयानक परिस्थितीत एक कायमचा मार्ग काढण्याचे ठरविले, आणि हा अभूतपूर्व बंधारा बांधून पूर्ण केला.

**इतिहासातले राजकारण**

1960 च्या दरम्यान महाराष्ट्रात कोयनेजवळ कृष्णेवर एक पक्का बंधारा बांधण्यात आला. पाणीपुरवठा व वीजपुरवठा असे त्याचे दोन उद्देश होते. वीजनिर्मितीसाठी ज्या पाण्याचा उपयोग करण्यात येणार होता. ते पाणी वीज-निर्मितीनंतर कर्नाटकात सोडण्याचा प्रस्ताव यशवंतराव सरकारने कर्नाटक सरकारसमोर ठेवला. त्यासाठी कर्नाटक सरकारला ( त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. बी. डी. जत्ती) तीन कोटी रुपये भरून करार करून घेणे आवश्यक होते. परंतु वीज-निर्मितीनंतर महाराष्ट्र सरकार पाणी कोठे सोडणार? ते आपोआप कृष्णा नदीत येईल या चुकीच्या धोरणामुळे त्या वेळेस कर्नाटक सरकारने महाराष्ट्र सरकारशी

करार केला नाही. आपल्या सोईनुसार महाराष्ट्र सरकारने वीज-निर्मितीनंतर ते पाणी नदीत न सोडता दुसरीकडे सोडून दिले. प्रतिवर्षी यातून 200 टी. एम. सी. पाणी वाहून जात आहे. त्या वेळच्या कर्नाटक सरकारच्या चुकीच्या व आडमुठ्या धोरणामुळे एवढ्या पाण्याला कर्नाटकाची जनता कायमची मुकली. उन्हाळ्यात पाणी कमी होऊ लागले की जनतेचे हाल बघवेनासे होतात. आज कर्नाटक सरकारला प्रत्येक वर्षी एक कोटी रुपये भरून कोयनेतील पाणी सोडण्यासाठी महाराष्ट्र सरकारला विनंती करावी लागत आहे. पैसे भरून पावती केली तरच महाराष्ट्र सरकार पाणी सोडणार, नाही तर नाही. कर्नाटक सरकारच्या आर्थिक गोचिडीमुळे अनेक वेळा या परिसरातील शेतकरी अडचणीत येतात.

1965 ते 1987 पर्यंत कर्नाटकात जेवढे मुख्यमंत्री झाले त्या सर्वांना जमखंडी परिसरातील शेतकऱ्यांनी कृष्णा नदीवर बंधारा बांधण्यासाठी अनेक निवेदने दिली. परंतु प्रत्येकाने याकडे सोईस्करपणे दुर्लक्ष केले. 1972 मध्ये त्या वेळचे जमखंडीचे आमदार श्री. पी. एम. भंगी यांनी या योजनेचे स्वप्न पाहिले. त्यांनी मौजे सनाळ जवळ एक बंधारा बांधण्याचा प्रस्ताव मांडला. परंतु पुढे दोनतीन वर्षे पाऊस चांगला पडल्यामुळे योजना काही काळ बारगळली. 1977 नंतर पुन: परिस्थिती बिघडत चालली. सनाळच्या ऐवजी चिकपडसलगीजवळ बंधारा बांधण्याची कल्पना नव्या युवकांसमोर पुन: आकार घेऊ लागली. जमखंडी अर्बन को-ऑप. बँकेचे चेअरमन श्री. एस. बी. न्यामगौडा, बीळगी भागाचे आमदार व पत्रकार श्री. बाबुरेड्डी तुंगळ व त्यांच्या इतर असंख्य सहकार्यांनी या योजनेचा पाठपुरावा करण्याचे ठरविले व त्याअनुषंगाने बेंगळूरच्या अनेक वाऱ्या करून शासनाचे दार ठोठावले. परंतु शासनाकडून काहीच प्रतिसाद मिळेना. 1986 मध्ये श्री. न्यामगौडा यांनी या योजनेचा पाठपुरावा करण्यासाठी एक खास सभा बोलाविली. सभेने निवडलेल्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांना भेटून निवेदन दिले. मंत्र्याने हे निवेदन, पाटबंधारे खात्याकडे पाठवून योजना तयार करावी असा आदेश दिला. दरम्यानच्या काळात जमखंडी भागाचे आमदार जी. स. बागलकोट यांनी आणखीन एक शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ बेंगळूरला घेऊन जाऊन श्री. भंगी यांनी कल्पिलेला सनाळ गावाजवळ बंधारा बांधला जावा म्हणून मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले. या निवेदनामुळे मुख्यमंत्री पेचात पडले. हे निवेदन पण पाटबंधारे खात्याकडे पाठवून योजना तयार करण्यास आदेश देण्यात आला. त्याप्रमाणे पाटबंधारे खात्याने योजना तयार करून चिकपडसलगीचा बंधारा एक कोटी पंधरा लाख रुपयात तयार करता येईल व 26 हजार एकर जमिनीला कायमचे पाणी मिळू शकेल. सनाळ जवळच्या बंधाऱ्यासाठी एक कोटी रु. 45 लाख रुपये तर केवळ 20 हजार एकर जमिनीला कायमचे पाणी मिळणार आहे. त्याप्रमाणे चिकपडसलगीचा बंधारा बांधावयास हरकत नाही असा तांत्रिक सल्ला दिला. पण माशी शिंकली ती येथे की, चिकपडसलगीजवळ बंधारा बांधला तर ते अप्पर कृष्णा प्रकल्पाच्या पाण्याखाली जाणार असल्याने त्याला मंजुरी देता येणार नाही असा ठराव मंत्रिमंडळाने केला.

**खासगी बंधारा बांधण्याचा निर्णय**

या योजनेतून तांत्रिक अडचणीच्या सबबीखाली कर्नाटक सरकारने व्यवस्थित अंग काढून घेतले व स्वतःसमोरील पेचप्रसंग सोडविला. परंतु या योजनेचे सूत्रधार श्री. न्यामगौडा व त्यांचे नजिकचे सहकारी निराश न होता, जिद्द न सोडता सहकारी तत्त्वावर अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन खासगीरित्या हा बंधारा बांधून पूर्ण करण्याचा संकल्प केला. कारण अप्पर कृष्णा प्रकल्प पूर्ण होण्यास किती वर्षे लागतील याचा कोणताच अंदाज बांधता येत नाही. उन्हाळ्यात पाण्याअभावी ऊसासारखे कोट्यावधी रुपयांचे नगदी पिकांचे अतोनात नुकसान होते. जिद्दीला पेटलेल्या या कार्यकर्त्यांनी पंचवीस एक खेड्यातील जवळजवळ 5 हजार लहानमोठ्या शेतकऱ्यांची सभा घेऊन वरील निर्णय घेण्यात आला व " कृष्णा तीर रयत संघ " ची स्थापना केली. श्री. बाबूरेड्डी तुंगळ हे या संघाचे अध्यक्ष तर श्री. एस. बी. न्यामगौडा हे कार्यवाह म्हणून काम पाहात आहेत. खासगी तत्त्वावर बांधण्यात येणाऱ्या या बंधाऱ्याची योजना एक खासगी बांधकाम कंपनीला तयार करण्यासाठी देण्यात आली. जमखंडी तालुक्यातील 21 व अथणी तालुक्यातील 6 खेड्यांना ह्या बंधाऱ्याच्या पाण्याचा लाभ होणार आहे. तर या गावातील संबंधित शेतकऱ्यांनी आपल्याकडे असलेल्या विद्युत् पंपाच्या अश्वशक्तीच्या आधारे निधी/वर्गणी देण्याचे त्या खास बैठकीत ठरविण्यात आले. प्रत्येक अश्वशक्तीला 400 रु. प्रमाणे आपला वाटा देऊन प्रथम 5 लाख रुपये जमविले. आता या बांधकामाच्या कार्याला परवानगी द्यावी म्हणून शेतकऱ्यांचे शिष्टमंडळाचे बंगलूरला पुन: खेटे सुरू झाले.

**जाचक अटीसह सरकारची परवानगी**

1987 च्या सप्टेंबर महिन्यात या शिष्टमंडळाने पुन्हा रामकृष्ण हेगडे यांना भेटून परवानगी द्यावी अशी विनंती केली. यांना शासनाकडून परवानगी मिळू नये म्हणून असंतुष्ट आत्म्यांनी आपले खालच्या दर्जाचे राजकारण खेळण्यास सुरुवात केली. परंतु दरम्यानच्या काळात मंत्रिमंडळाची सभा होऊन बंधारा बांधण्यासाठी परवानगी दिली गेली. परवानगी देत असताना सरकार म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत बंधारा बांधण्यात येईल. तेव्हा त्यासाठी आपल्याकडील आवश्यक तो सर्व निधी या संबंधित खात्याकडे जमा करून द्या असे रयत संघाला सांगण्यात आले. तेव्हा न्यामगौडा यांनी सरकारला विचारले की, " सरकारने मुदतीत हे काम पूर्ण केले नाही , व परिणामी त्याचा

खर्च दुप्पट तिप्पट वाढला तर तो बोजा सरकार सहन करणार आहे का? '' सरकारनी नकार दिला. शिवाय सार्वजनिक बांधकाम खात्याची कार्यक्षमता स्वच्छ कारभार इत्यादी गोष्टी सर्वांनाच चिरपरिचयाच्या आहेत. तेव्हा ''आम्ही आमच्या स्वतःच्या जबाबदारीवर हा बंधारा बांधू, तुम्ही फक्त परवानगी द्या '' अशा प्रकारची विनंती शासनाला करण्यात आली. शेवटी सरकारने परवानगी दिली. खरी परंतु या संधावर अनेक जाचक अटी लादण्यात आल्या. (1) सरकारकडून कायदेशीर एक नवा पैसाही मिळणार नाही. (2) पाटबंधारे खात्याकडून तयार केलेल्या नकाशा/योजनेप्रमाणे हा बंधारा बांधण्यात यावा. (3) बंधारा पूर्ण झाल्यानंतर त्याचा सर्व हक्क व जबाबदारी सरकारकडे सोपवावी व सरकार त्याची देखभाल करेल. (4) पंपसेटने पाणी उचलणाऱ्या शेतकऱ्यांने पाणी उचलताना रीतसर पाणीपट्टी द्यावी. (5) कोणत्याच शेतकऱ्यांना त्याची जमीन धरणात गेल्यामुळे शासनाकडून नुकसानभरपाई मिळणार नाही, इत्यादी शेतकऱ्यांनी या सर्व अटी एक आव्हान समजून कामाला सुरुवात केली.

**भांडवल संचय कसा व कोठून?**

वर उल्लेखिल्याप्रमाणे शतप्रयत्नानंतर राज्य सरकारने बंधारा बांधण्यास केवळ परवानगी दिली. 1987 च्या डिसेंबर महिन्यात त्या वेळचे कर्नाटकचे मुख्यमंत्री श्री. रामकृष्ण हेगडे यांच्या हस्ते बंधाऱ्याचा पायाभरणी समारंभ पार पडला. त्या वेळेस हेगडे यांनी थोड्याफार प्रमाणात आर्थिक साहाय्य व सवलतीच्या दरात सिमेंट देण्याची घोषणा केली होती. परंतु अद्याप एक कवडीही मिळाली नाही तर हा प्रस्तुत प्रकल्प 1 कोटी 15 लक्ष रुपयांचा असून त्याच्या पूर्ततेसाठी भांडवल जमवण्याचा प्रश्न महत्त्वाचा होता. जो शेतकरी या बंधाऱ्यातून पाणी उचलतो त्या प्रत्येक पंपसेटधारक शेतकऱ्याकडून भागभांडवल घेण्याचे ठरवले. एक अश्वशक्तीचे 400/- रु. प्रमाणे, आजमितीला 60 लक्ष रुपये भांडवल जमवले आहे. भांडवल जमविण्यास सुरुवातीला संयोजकांना थोड्याशा समस्या भेडसावल्या. कारण अशा प्रकारचा प्रयत्न अगदीच नवीन होता. शिवाय संयोजकांवर काय म्हणून विश्वास टाकावयाचा? मध्येच बांधकाम सोडून दिले तर सरकारी कामाच्या दिरंगाईचा अनुभव, बांधलेला बंधारा पुरात वाहून गेल्यास तो बोजा कोण सहन करणार? इत्यादी, अनेक संशय त्या परिसरातील शेतकऱ्यांच्या मनात येणे स्वाभाविक होते. शिवाय स्थानिक राजकारण, परंतु या शेतकऱ्यांचे संशय निवारण करून त्यांच्यात विश्वास निर्माण करून भागभांडवल देण्यास प्रवृत्त करण्याचे श्रेय संयोजकांनाच आहे. संयोजकातील भक्कम मंडळींनी सुरुवातीला स्वतःजवळील पैसा खर्च करून बंधाऱ्याच्या कामाला प्रारंभ करून शेतकऱ्याच्या मनात आपल्याविषयी व बंधाऱ्याविषयी विश्वास निर्माण केला, आणि मग भागभांडवल जमविण्यास प्रारंभ केला. पुढील तक्त्यावरून भांडवल उभारणीचे स्वरूप लक्षात येईल. नंतर तर अशी परिस्थिती निर्माण झाली की शेकडो शेतकऱ्यांनी भागभांडवलासाठी अर्बन बँकेच्या कर्जाचे अर्ज सही करून संयोजकाकडे सुपूर्त केले. पाहिजे तितकी रक्कम संबंधित शेतकऱ्याच्या नावावर कर्ज काढता आले. मुलाखतीत श्री. एस. बी. न्यामगौडा यांनी सांगितले की एकूण शेतकऱ्यांकडून भागभांडवलाच्या स्वरूपात साठ लक्ष रूपये जमवले त्यापैकी 200 पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आपली जमीन तारण ठेवून कर्जरूपाने आपला नियोजित वाटा दिला. तर 132 शेतकऱ्यांनी पैशाची गरज लक्षात घेऊन निश्चित केलेल्या वर्गणीपेक्षा जास्त रक्कम दिली. या संदर्भात जमखंडी अर्बन को-ऑप. बँकेचा वाटा मोठा असल्याचा विशेष उल्लेख करावा लागणार आहे. कारण प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या या बँकेने प्रस्तुत प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी फार मोठी आर्थिक मदत केली आहे. बांधण्यासाठी अर्ज केलेल्या बहुतांशी शेतकऱ्यांच्या कर्जाचे अर्ज मंजूर करून वेळोवेळी आर्थिक साहाय्य केले. शिवाय स्वतः अर्बन बँकेने एक लक्ष रुपये देणगी दिली. जमखंडी बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी 3 लक्ष रुपयांची मदत केली. तर सांगली शहरातील अडत व्यापाऱ्यांनी 1 लाखापेक्षा जादा रक्कम देणगी म्हणून दिल्याचे समजते. वास्तविक पाहता सांगली व्यापाऱ्याचा व या बंधाऱ्याचा प्रत्यक्षात काहीच संबंध नाही. परंतु या परिसरात जो भुईमूग, हळद, गूळ निघतो त्यातील मोठा भाग सांगली बाजारपेठ गाठतो. या बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या या वस्तूंच्या उत्पादनात भर पडावी आणि व्यापाराचे प्रमाण वाढावे या हेतूने केलेली ही मदत आहे.

**तक्ता क्रमांक 1**

**भांडवल संचयाचे स्वरूप**

| अ. नं. | भांडवली संचयाचे साधन | भांडवल रुपयेमध्ये |
|---|---|---|
| 1. | सभासद भागभांडवल (प्रत्येक अश्वशक्तीस 400 रु. प्रमाणे) | 6000000 |
| 2. | जमखंडी को-ऑप. बँक जमखंडी देणगी | 100000 |
| 3. | जमखंडी बाजारातील व्यापारस्थ | 300000 |
| 4. | सांगली बाजारातील व्यापारस्थ | 100000 |
| 5. | बेळगाव जिल्हा परिषद | 500000 |
| 6. | कपार्ट ही संस्था | 1700000 |
| 7. | विजयमहंत स्वामी इळकल | 10000 |
| 8. | कर्मचारी अर्बन को-ऑप. बँक, जमखंडी | 9000 |
| 9. | कर्मचारी विजापूर ग्रामीण बँक | 11000 |
| 10. | कर्मचारी व प्राध्यापक जमखंडी कॉलेज | 8000 |

बेळगाव जिल्ह्यातील अथणी तालुक्यातील सहा खेड्यांना या बंधाऱ्याचा प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे. म्हणून बेळगाव जिल्हा परिषदेने या बंधाऱ्यासाठी 5 लक्ष रुपये देणगी दिली. वास्तविक पाहता या बंधाऱ्याच्या लाभधारक एकूण 27 खेड्यांपैकी विजापूर जिल्ह्यातील 21 खेड्यांना प्रत्यक्ष फायदा होणार आहे. म्हणून विजापूर जिल्हा परिषदेला अनेकवार विनंती करून देखील काहीच प्रतिसाद मिळाला नाही. वास्तविक 90 टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात या बंधाऱ्याचा उपयोग याच जिल्ह्याला होणार असताना देखील त्यासाठी या जिल्हा परिषदेने काहीच आर्थिक मदत करू नये ही निश्चितच कोणालाही खटकणारी गोष्ट आहे.

डिसेंबर 1988 मध्ये कौन्सिल फॉर पिपल्स ॲडव्हान्समेंट ऑफ पीपल्स ॲक्शन ॲंड रूरल टेक्नॉलॉजी (कपार्ट) या केंद्रीय संस्थेच्या एका समितीने या प्रकल्पाला भेट दिली. जीनाभाई दर्जी यांच्या अध्यक्षतेखाली या समितीच्या सदस्यांनी शेतकऱ्यांच्या उपक्रमाबद्दल कौतुक करून मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत दिली जाईल असे आश्वासन दिले. 6 जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे याची बैठक होऊन या प्रकल्पासाठी 28 लक्ष रुपये मंजूर केले. आज अंती 17 लक्ष रुपये (पहिला हप्ता 7 लाखाचा, दुसरा हप्ता 10 लाखाचा) दिला असून राहिलेली रक्कम तिसऱ्या हप्त्यात दिली जाणार आहे.

ईळकलचे श्री. विजय महंत स्वामी यांनी या प्रकल्पाला एक दिवस भेट देऊन 10 हजार रुपये देणगी दिली. जमखंडी अर्बन बँकेचे कर्मचारी, विजापूर ग्रामीण बँकेचे कर्मचारी, जमखंडी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी इत्यादिंनी आपला एक दिवसाचा पगार बंधाऱ्यासाठी दिला. या व्यतिरिक्त लहानलहान प्रमाणात अनेक शेतकरी, संघटना कर्मचारी व्यापारी इत्यादींनी धनसाहाय्य केले आहे. तर काही आश्वासनेही त्यांना मिळाली आहेत. एकंदरीत, कार्यवाह श्री. एस. बी. न्यामगौडा व तेथील शेतकऱ्यांची जिद्द पाहिली की आता पैशाची अडचण फारशी राहिलेली नाही, हे सहजासहजी लक्षात येते.

**अभूतपूर्व श्रमदान - काही व्क्ती व संस्था**

या बंधाऱ्याच्या बांधकामातील वैशिष्ट्य म्हणजे श्रमदान होय. एवढा मोठा सिमेंटचा कायम स्वरूपाचा बंधारा बांधावयाचा तर अनेक इंजिनियर, वेगवेगळे कुशल कारागीर आणि असंख्य मजुरांची आवश्यकता असते. बांधकामातील तंत्रज्ञांना व कौशल्यांचा भाग सांभाळण्यासाठी रयत संघाने सात खाजगी इंजिनियर, सात वर्क्स इन्स्पेक्टर व 250 पगारी नोकर नेमले होते. आणि बांधकामातील जे इतर काम-बंधाऱ्यासाठी पाया खोदणे, वाळू बाजूला करणे, दगड आणणे, भर घालणे, बांधकामाला माल उचलून देणे, इत्यादी सर्व कामे असंख्य लोक, आजूबाजूच्या खेड्यातील युवक, कामगार संघटना, रोटरी लायन्स क्लब, वकील, पुढारी मंडळी, रिक्षाचालक आणि मुख्य म्हणजे शाळा कॉलेजमधील असंख्य विद्यार्थी व शिक्षक या श्रमदानाचे मानकरी आहेत. हे सर्व स्वतःहून श्रमदान करण्यास येण्याविषयी रयत संघाला पत्र लिहितात व रयत संघ त्यांना एक ठराविक दिवस व ठराविक काम निश्चित करून देतो. यामुळे एकतर कामात सुसूत्रता येते आणि विनाकारण कामाच्या ठिकाणी लोकांची गर्दी न होता व आवश्यक तेवढ्याच माणसांना बोलावून त्यांच्या कामाला व श्रमाला न्याय देता येतो. जसजसे हे काम झपाट्याने उरकू लागले तसतसे श्रमदानासाठी येणाऱ्यांची संख्याही वाढू लागली आणि एक नवीन प्रथाही पडत गेली. आणि ती म्हणजे ज्या संघटना श्रमदानासाठी येऊ लागल्या त्यांनी श्रमदान तर केलेच शिवाय काही निधीही जाहीर करू लागले. वर उल्लेखिल्याप्रमाणे जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे विजापूर ग्रामीण बँकेचे कर्मचारी व कॉलेजचे कर्मचारी इत्यादींनी श्रमाबरोबर धनही अर्पण केले. एक दिवशी इळकलचे श्री. विजय महंत स्वामी हे आपल्या शिष्यगणासह बंधाऱ्याच्या ठिकाणी श्रमदान करून 10 हजार रुपये देणगी देऊन गेले. हुन्नूरच्या शंभर गवंड्यांनी (कुशल बांधकाम करणारे) आपल्या कुशलतेचे योगदान या बंधाऱ्याच्या बांधकामासाठी श्रमदानातून दिलेली घटना अतिशय उल्लेखनीय आहे. जी व्यक्ती व संघ श्रमदानासाठी येतात ते स्वतःच्या खर्चाने वाहन करून व दोन वेळचे जेवण घेऊन येतात. रयत संघाकडून साईटवर केवळ दोन वेळा चहा दिला जातो. आजपर्यंत 8 ते 9 हजार लोकांनी श्रमदान केले आहे. अशा प्रकारे श्रमदानासाठी येण्याऱ्यांची संख्या मोठी असल्यामुळे काही प्रसंगी वीज किंवा गॅस बत्त्यांच्या प्रकाशात रात्री देखील श्रमदान केले जाते. म्हणूनच अवघ्या दीड वर्षात 90 टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण केले गेले आहे.

या अभिनव प्रयोगाचे मानकरी म्हणून काही खास व्यक्तींचा उल्लेख करावासा वाटतो. कृष्णातीर रयत संघाचे कार्यवाह श्री. एस. बी. न्यामगौडा हे या बंधाऱ्याचे केंद्रबिंदू आहेत. 38 वर्ष वयाचे हे युवक अर्बन को-ऑप. बँकेचे चेअरमन होते. जमखंडी बाजारपेठेतील एक मोठे नामवंत अडत व्यापारी आहेत. या प्रकल्पाच्या सुरुवातीपासून बंधाऱ्याच्या संबंधीची सर्व महत्त्वाची कामे यांच्याच नेतृत्वाखाली पार पाडली जातात. घर, व्यापार व शेती तूर्तास बाजूला ठेवून बहुतांश वेळ ते या बांधकामासाठी देतात. बेंगलोर, बेळगांव इत्यादी ठिकाणी बंधाऱ्याची कामे निघालेली पदरमोड करून पहिल्यांदा ते काम करून येतात. बांधकामासाठी नोकरांच्या पगारासाठी पैसे कमी पडले किंवा वेळेवर उपलब्ध झाले नाहीत तर स्वतःजवळील पैसे देऊन भागवतात. मुलाखतीत भेटलेल्या बहुतांश लोकांच्या तोंडात एकच वाक्य होते. ते म्हणजे '' न्यामगौडा आहेत म्हणून हे काम पूर्ण होत आहे.'' शांत स्वभावाच्या आपल्या कार्यक्षम कर्तबगारीने

सभोवतालच्या लोकांच्या मनावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप उमटविणाऱ्या या युवकाचे कौतुक या कामानिमित्त करील तितके कमीच पडणार आहे.

गॅमन इंडिया लि. कंपनीत काम करणारे जमखंडीचे तरुण अभियंते अशोक नुगळ - यांनी नोकरीचा राजीनामा देऊन या बंधाऱ्याच्या कार्याला आपले मार्गदर्शन देऊ केले आहे. सेवानिवृत्त अभियंते श्री. एल. टी. अम्मीनभावी यांचेही मार्गदर्शन सतत लाभत आहे. आमदार बाबू रेड्डी तुंगळ, बी. एम. पाटील, बाळपाणा, अनगौडर, पी. स. अतरगौंड, बसप्पा देवखर, बसवराज पाटील, इ. कार्यकर्ते न्यामगौडाचे उजवे हात आहेत. स्वतः न्यामगौडा त्यांचे सहकारी, अनेक श्रीमंत शेतकरी उसने म्हणून अधिक पैसे, ट्रक, ट्रॅक्टर, जीप, इत्यादी साधने व इतर साहाय्य देऊ करीत आहेत.

**बंधाऱ्याचे अर्थशास्त्र**

वर उल्लेखिल्याप्रमाणे प्रस्तुत परिसर कर्नाटकातील दुष्काळाच्या छायेतील एक कायमचा भाग म्हणून ओळखला जातो. लोकांचे दारिद्र्य, उपासमारी आणि उदरनिर्वाहासाठी शेजारच्या शहरी किंवा औद्योगिक क्षेत्रांना स्थलांतर करणे इत्यादीतर अशा प्रदेशांची मूळ लक्षणे ठरतात. या स्थलांतरामुळे शेतमजूर व सामान्य शेतकऱ्याचे जीवन खडतर बनते व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे कायमचे नुकसान होते. या बंधाऱ्यामुळे या परिसरातील हजारो सामान्य दारिद्र्यरेषेखालील लोकांना बऱ्याच प्रमाणात आर्थिक साहाय्य होणार आहे. त्याची सविस्तर माहिती तक्ता क्रमांक 2 मध्ये दिली आहे. एकूण लाभधारक शेतकऱ्यांमध्ये सामान्य शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक म्हणजे 73 टक्के इतके आहे. मागासवर्गीयांचे प्रमाण 6 टक्के तर बडे शेतकरी 21 टक्के पर्यंत आहेत. या 73 टक्केतील अनेक दारिद्र्यरेषेखालील, लहान व श्रीमंत शेतकऱ्यांना या बंधाऱ्यामुळे दारिद्र्यरेषेच्या वर येण्यास हातभार लागेल. एकंदरीत 26 हजार एकर जमीन कायमची पाण्याखाली येणार असून त्यात बड्या शेतकऱ्यांची जमीन सुमारे निम्मी इतकी आहे. शेतीला पाणीपुरवठा करण्याबरोबरच जमखंडी शहरासहित त्या 27 खेड्यांतील 3 लक्ष लोकांची कायमची पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे. बंधाऱ्याच्या बांधकामाच्या वेळी 3 लक्ष श्रमदिवस रोजगार निर्माण झाला असून ते पूर्ण झाल्यानंतर 25 लक्ष श्रमदिवस वर्ष शेती आणि पूरक व्यवसायात लोकांना रोजगार मिळणार आहे. या सर्वांचे फलित म्हणून प्रतिवर्षी 250 लक्ष रुपयाचे उत्पन्न वाढण्याचा अंदाज रयत संधाने केला आहे. याचा तपशील पुढील तक्त्यात दिला आहे.

**तक्ता क्रमांक 3**

**बंधाऱ्याच्या लाभार्थींचे वर्गीकरण**

| अ. नं. | खेड्याचे नांव | एकूण लाभार्थी शेतकरी | | | | लाभक्षेत्रातील एकूण जमीन एकरमध्ये | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | श्रीमंत व लहान शेतकरी | मागासवर्गीय शेतकरी | बडे शेतकरी | एकूण शेतकरी | श्रीमंत व लहान शेतकऱ्यांचे | मागासवर्गीय शेतकऱ्यांचे | बडे शेतकऱ्याचे | एकूण शेतकऱ्याचे |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1) | चिक्कपडसलगी | 100 | 19 | — | 119 | 146.21 | 19.09 | — | 165.30 |
| 2) | नागनूर | 88 | 16 | 99 | 203 | 195.15 | 52.14 | 1113.23 | 1360.52 |
| 3) | हिरेपडसलगी | 152 | 06 | 110 | 268 | 425.32 | 06.36 | 1707.09 | 2138.77 |
| 4) | टक्कलकी | 102 | 06 | — | 108 | 279.28 | 09.13 | — | 288.41 |
| 5) | टाकोड | 50 | 08 | 48 | 106 | 134.18 | 06.15 | 610.37 | 751.30 |
| 6) | मारनूर | 107 | 21 | 105 | 233 | 272.32 | 91.15 | 1436.18 | 1800.25 |
| 7) | तुबची | 57 | — | 54 | 111 | 157.19 | — | 451.33 | 608.52 |
| 8) | जंबगी (बु.) | 127 | 53 | — | 180 | 352.32 | 116.28 | — | 468.60 |
| 9) | जंबगी (खु.) | 33 | 27 | 45 | 105 | 85.36 | 61.09 | 223.06 | 469.51 |
| 10) | मैगूर | 112 | 21 | 79 | 212 | 262.03 | 71.33 | 561.34 | 894.80 |
| 11) | शिरगुप्पी | 148 | 21 | 79 | 248 | 398.21 | 96.19 | 388.02 | 882.42 |
| 12) | मुदूर | 161 | 07 | 75 | 243 | 367.32 | 21.22 | 602.22 | 990.76 |
| 13) | मंकणवाडी | 229 | 43 | 54 | 326 | 484.33 | 100.09 | 734.19 | 1318.61 |

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 14) कडकोळे | 130 | 47 | 70 | 247 | 305.20 | 33.26 | 661.51 | 999.97 |
| 15) कुल्लळ्ळी | 219 | 24 | 40 | 283 | 467.06 | 40.33 | 244.22 | 751.61 |
| 16) आसंगी | 505 | 31 | 124 | 660 | 414.02 | 46.18 | 351.22 | 811.42 |
| 17) हिप्परगी | 173 | 12 | 50 | 235 | 507.08 | 69.07 | 276.30 | 852.45 |
| 18) ईसनाळ | 95 | 05 | — | 100 | 253.34 | 18.24 | — | 272.58 |
| 19) आलगूर | 386 | 26 | 81 | 493 | 927.06 | 73.35 | 788.25 | 1788.66 |
| 20) जमखंडी | 41 | — | — | 41 | 144.30 | — | — | 144.30 |
| 21) मधनमट्टी | 106 | 15 | 36 | 157 | 202.03 | 00.05 | 168.06 | 370.14 |
| **अथणी तालुका** | | | | | | | | |
| 22) नंदगांव | 11 | — | 33 | 44 | 44.34 | — | 423.01 | 467.35 |
| 23) शिरहट्टी | 376 | — | — | 376 | 943.39 | — | — | 943.39 |
| 24) जनवाड | 216 | 07 | 37 | 260 | 593.31 | 42.32 | 235.15 | 870.78 |
| 25) सवदी | 636 | 19 | 35 | 690 | 2011.04 | 93.20 | 225.29 | 2329.53 |
| 26) झुंझरवाडा | 138 | — | — | 138 | 467.33 | — | — | 476.33 |
| 27) महीशवाडगी | 376 | 06 | 40 | 422 | 1236.24 | 9.24 | 1431.00 | 2676.48 |
| एकूण | 4874 | 440 | 1294 | 6608 | 12074.96 | 1075.46 | 12131.04 | 25281.46 |
| टक्केवारी | 73.75% | 6.65% | 19.60% | 100% | 47% | 4% | 49% | 100% |

**तक्ता क्र. 3**
**बंधाऱ्यापासून रोजगारनिर्मिती व उत्पन्न**

| अ. नं. | तपशील | प्रमाण |
|---|---|---|
| 1. | एकूण लाभक्षेत्र | 26 हजार एकर |
| 2. | पिण्यासाठी पाणी | 3 लक्ष लोकांना |
| 3. | बांधकामाच्या वेळी रोजगार-निर्मिती | 3 लक्ष श्रमदिवस |
| 4. | प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर रोजगार-निर्मिती | 25 लक्ष श्रमदिवस/वर्ष |
| 5. | प्रतिवर्षी जादा ऊस उत्पादन | 1.80 लक्ष टन |

बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रात काही अपवाद वगळता सर्व जमीन भारी प्रतीची आहे. सामान्यपणे जमखंडी तालुक्यातील बागायतदारांचे, कृष्णा काठच्या शेतकऱ्यांचे मुख्य पीक ऊसच आहे. या तालुक्यातील हीडकल धरणाच्या पाण्याखाली येणाऱ्या जमिनीत उसाची लागवड यापूर्वीच केली जात आहे तर या बंधाऱ्यामुळे त्यात आणखीन भर पडणार आहे. या पिकाबरोबर ज्वारी, भुईमूग, हळद व कापूस इत्यादी नगदी पिकेही घेतली जातात. या बंधाऱ्यामुळे या प्रस्तुत पीक पध्दतीत फारसा बदल न होता उत्पादनात मात्र (त्यातल्या त्यात ऊस) भर पडणार आहे. या निश्चित बारमाही पाणीपुरवठ्यामुळे सरासरी एकरी 7.5 टन उसाच्या उत्पादनात वाढ होण्याची आशा व्यक्त केली जाते. शेजारच्या नंदी या गावी निघणाऱ्या साखर कारखान्याला केंद्र

सरकारने नुकतीच मान्यता दिली असून त्यांचा या शेतकऱ्यांना फायदा उचलता येईल. नाहीतर या शेतकऱ्यांना उगार, कवठेमहांकाळ, सांगलीपर्यंत ऊस न्यावा लागत असे. भुईमूग, हळद, कापसासारखी पिके वाढली तर त्यावर प्रक्रिया करणाऱ्या या परिसरातील अनेक गृह व कुटीर उद्योगांना निश्चितच बळकटी मिळणार असून जमखंडी अडत बाजारातील एकूण उलाढाल वाढणार आहे.

**बंधाऱ्याचा ताळेबंद**

नेहमीच्या ताळेबंदामध्ये एका बाजूला खर्च तर दुसऱ्या बाजूस उत्पन्न दाखविलेले असते. परंतु या दोन्ही बाजू वित्तीय स्वरूपाच्या असतात. सामान्यतः वास्तव खर्च व वास्तव उत्पन्नाचा विचार केला जात नाही. तर या बंधाऱ्याच्या ताळेबंदामध्ये वित्तीय जमा, खर्चाबरोबरच वास्तव जमाखर्चाचाही विचार करणे आवश्यक असल्याचे माझे मत झाले आहे. वित्तीय स्वरूपाच्या जमाखर्चाची बाजू म्हणजे - या बंधाऱ्याचा एकूण खर्च, त्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून भांडवल जमवण्याचे स्वरूप, एकूण धरणाचे लाभार्थी - लाभक्षेत्र, उत्पन्नाचा अंदाज, इत्यादी बाबी तपशीलवार वर वर्णिल्या आहेत. तर वास्तव जमाखर्चाच्या बाजू जरा अधिक तपशीलवार मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

वास्तव खर्चात सर्वात महत्त्वाचा खर्च म्हणजे श्रमदानाचा होय. असंख्य लोकांनी बांधकामाच्या वेळी श्रमदान केले. ज्या गरीब शेतकऱ्यांना आपला भागभांडवलाचा वाटा उचलता येत नव्हता, त्याने श्रमदान करून ते फेडले. तर काहींनी जेवण तयार करून, वेगवेगळे साहित्य आणून देऊन आपला वाटा उचलला आहे. विनामूल्य तंत्रज्ञान पुरवणारे अभियंते, निरीक्षण किंवा देखरेख करणारे पर्यवेक्षक, काही मानधनावर काम करणारे युवक आणि मुख्य म्हणजे न्यामगौडासारखे सतत वेळ देणारे या सर्वांच्या वास्तव वेतनाचा विचार बंधाऱ्याच्या वास्तव खर्चाच्या बाजूने मांडण्यासारखा आहे.

वास्तव उत्पन्नातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आव्हानात्मक ठरलेल्या संकल्पाच्या पूर्ततेचे समाधान होय. येणाऱ्या कोणत्याही व कसल्याही अडचणीला तोंड देऊन सरकारच्या तोलामोलाची कामे सामान्य शेतकरी करू शकतात हा आत्मविश्वास होय.

**बंधाऱ्यासाठी लोकांना आव्हान**

शेतकऱ्याने शेतकऱ्यांच्यासाठी केलेली, लोकांनी आपल्याला पाहिजे म्हणून केलेली, लोकनियोजनातून साकार होत असलेली ही योजना आहे. म्हणून या कामी लोकांचे सहकार्य हा या योजनेचा मानबिंदू ठरतो. वाचकांच्या मनामध्ये एक संभ्रम निर्माण होणे स्वाभाविक आहे की, एवढ्या मोठ्या प्रकल्प पूर्ततेसाठी कृष्णातीर रयत संघाच्या कार्यकर्त्यांनी सभोवतालातील असंख्य लोकांकडून तन-मन-धनाने साहाय्य कसे काय प्राप्त केले?

न्यामगौडा आणि मंडळींने सुरुवातीला अनेक सार्वजनिक सभा बोलावून धरणाचा इतिहास व त्याची रूपरेषा लोकांच्या समोर ठेवली. त्याचे महत्त्व व आवश्यकता पटवून दिली. त्यासाठी धरणाचे, हिरवेगार टवटवीत पिकांची आकर्षक चित्रे काढून छोट्या, छोट्या पुस्तकातून भित्तीपत्रकातून लोकांच्यापर्यंत पोहोचवल्या. पाण्याच्या, व पिकाच्या, सहकाराच्या संदर्भात आकर्षक, स्फूर्तिदायक घोषणा तयार करून लोकांना ऐकवल्या. गावोगावी वारंवार सभा घेऊन धरणाची आवश्यकता पटवून दिली. सरकारी धरणे, त्याची दिरंगाई, त्यावर अवलंबून न राहणे, स्वतःच्या पायावर आपण उभे राहिलो तर त्यातून कितीतरी फायदे मिळतात, इत्यादी गोष्टी शेतकऱ्यांना पटवून दिल्या.

श्रमदानासाठी अनेक स्तरातील निरनिराळ्या लोकांना माहिती करून देऊन बंधाऱ्याविषयी उत्सुकता निर्माण करण्याचे काम दूरदर्शन (सरकारी नव्हे) आणि वृत्तपत्राने केले. लोकांच्याकडून श्रमदानासाठी सहकार्य मिळवण्यासाठी संघाने उपयोजिलेला प्रचारमार्ग अगदीच बोलका आहे. संघाच्या कार्यकर्त्यांनी बंधाऱ्याच्या बांधकामावर काही लोक श्रमदान करीत असताना त्यांचे व्ही. डी. ओ. शूटींग होऊन अथणी व जमखंडी शहरातील स्थानिक डिशसंस्था माध्यमातून दाखविण्यात येत असे. म्हणून बऱ्याच लोकांना या बंधाऱ्याची व श्रमदानाची माहिती झाली व ते स्वयंस्फूर्तीने श्रमदानासाठी येवू लागले. माहिती देण्यामध्ये व लोकांना आवाहन करण्यात वृत्तपत्रांचा वाटादेखील अतिशय महत्त्वाचा आहे.

**टीकाकारांचे मत :**

"पाणी (नदी )ही राष्ट्रीय संपत्ती असून त्यावर खाजगी लोकांना धरण बांधण्यासाठी परवानगी देऊन कर्नाटक सरकारने एक वाईट परंपरा सुरू केली आहे." खाजगी मेडिकल व इंजिनियरिंग कॉलेजसारखी खाजगी धरणे बांधण्याची टूम निघाली तर देशाला भयंकर मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागणार. कर्नाटकाच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारने देखील या नदीवर जागोजागी धरणे बांधण्यास परवानगी दिली तर कर्नाटक व आंध्र प्रदेशाला कायमचे कोरड्या नदीचे दर्शन घ्यावे लागेल. या सगळ्या गोष्टी जरी मान्य झाल्या तरीही टीकाकाराने काही गोष्टी कबूल केल्या पाहिजेत की, शेतकऱ्यांनी सरकारवर किती म्हणून व कोणकोणत्या गोष्टींवर अवलंबून राहावयाचे ? या परिसरातील शेतकरी सरकारकडून एक पैसाही न घेता धाडसाने, स्वबळावर पैसा जमवून एक कोटी रुपयांचा प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प त्यांनी सोडला ही कौतुकाची एवढेच नव्हे तर भारतातील

शेतकऱ्यांना एका मार्गदर्शी घटना ठरली आहे. सहकार व त्यातून स्वावलंबन व त्यातून या शेतकऱ्यांनी इतर लोकांना पटवून दिले ही साधी गोष्ट नव्हे. शिवाय पाटबंधारे खात्याने तयार करून दिलेले नकाशे / योजनेप्रमाणेच हा बंधारा बांधण्यात आला असून प्रकल्पाची रयत खात्याकडे याची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त संबंधित शेतकरी पाणीपट्टी देणार असून बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा खर्चही त्यांनाच करावयाचा आहे.

**निष्कर्ष :**

(1) बंधारे व धरणे बांधून पाणीपुरवठा करण्याचे काम राज्य व केंद्र सरकारचे असते असा आजवरचा आपला रिवाज आहे. परंतु सरकारची मदत न घेता स्वतः जनता सरकारच्या तोलामोलाची कामे करू शकते हे यातून दाखवून दिले आहे.

(2) लोकांनी आपल्याला पाहिजे म्हणून केलेली ही योजना आहे. लोक नियोजनातून ही कल्पना साकार होत आहे. याला राजकीय वास नाही की यात राजकीय पुढाऱ्यांची लुडबूड नाही.

(3) कृष्णा नदीवर बांधण्यास येणाऱ्या आलमट्टी जवळील अप्पर कृष्णा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर चिकपडसलगीचा बंधारा पूर्णपणे त्यात बुडून जाणार आहे. या तांत्रिक अडचणीमुळे कर्नाटक शासनाने या बंधाऱ्याला कोणतीच आर्थिक मदत दिली नाही. पण प्रश्न असा उद्भवतो की याच नदीवर अप्पर कृष्णा प्रकल्पात बुडणारा महेश वागळीचा बॅरेज स्वतः सरकारने कसा काय बांधला ? हिप्परगी बॅरेजची तीच अवस्था असताना जागतिक बँकेचे कर्ज काढून गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून त्यावर पैसा कसा काय खर्च करीत आहे ? सरकारच्या यासारख्या धोरणांचा काहीच अंदाज करता येत नाही. एका बाजूला म्हणावयाचे की पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून अर्थव्यवस्था सुधारली पाहिजे, त्यासाठी जनतेचा सहयोग आवश्यक आहे, आणि प्रत्यक्षात मात्र ही तऱ्हा.

वाचकांच्या मनात एक असा प्रश्न निर्माण होतो की, अप्पर कृष्णा प्रकल्पाचा दुसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर त्याचे पाणी मागे 60 कि. मी. पर्यंत साठणार आहे. चिकपडसलगीचा हा बंधारा त्यात बुडणार असताना शेतकऱ्यांनी कोट्यवधी रुपये खर्च करून मग आज हा बंधारा कशासाठी बांधला ? तर त्याचे गणित असे की, अप्पर कृष्णेचा दुसरा टप्पा पूर्ण होण्यास कमीत कमी आणखी 10 वर्षे तरी लागतील. तेवढ्यात या प्रस्तुत धरणासाठी गुंतवलेल्या भांडवलापेक्षा कितीतरी पटीने उत्पन्न या जलाशयातील संग्रही पाण्यापासून मिळवण्याचा आत्मविश्वास येथील शेतकऱ्यांनी दाखविला आहे. मुलाखतीत न्यामगौडा म्हणाले की, खरे म्हणजे येथल्या उसाच्या एका हंगामात बंधाऱ्याचा खर्च सहज निघून जातो. म्हणून या शेतकऱ्यांना प्रतिअश्वशक्तीच्या पाठीमागे 400/- रुपये खर्च करणे काहीच वाटत नाही.

एक उन्हाळ्यात उसाचे पीक वाचविण्यासाठी एकमेव उद्देशाने बडे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन ही योजना हाती घेतली असली तरी अनेक सामान्य शेतकऱ्यांनाही याचा फायदा होणार आहे.

(4) शासनातर्फे हाती घेतलेल्या अशा प्रकारच्या प्रकल्पात ज्यांच्या जमिनी जातात त्यांना नुकसानभरपाई देण्याची प्रथा आहे. परंतु प्रस्तुत प्रकल्पात एकतर फारशी जमीन जलाशयात बुडालेली नाही आणि ज्याची थोडीफार बुडालेली आहे त्यांनी संघाकडे किंवा शासनाकडे कोणतीच नुकसानभरपाईची मागणी केलेली नाही. नाहीतर अशा वेळी लोकांच्या असहकार्यामुळे बंधाऱ्यांच्या बांधकामाला कोर्टातून स्थगिती मिळाली असती.

(5) सुरुवातीपासून अतिशय नियोजनबद्ध व काटकसरीने राबविलेली ही योजना आहे. सरकारी दरबारातून राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पापेक्षा हा एक अतिशय आगळावेगळा प्रकल्प आहे. सरकारी दरबारातून असले प्रकल्प हाती घेतल्यानंतर पहिल्यांदा ''कुशल'' कामगारांची निवड होते. त्यांचा एक असंख्य स्टाफ असतो. मुख्य साईटच्या जवळ पहिल्यांदा स्टाफ क्वॉर्टर्स तयार होतात. आजूबाजूला बंगल्या, अनवाला जिथा, डिझेल व इतर अनेक सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतात. पुन्हा ऑफिसमध्ये टेबल, खुर्च्या, फॅन, कुलर इत्यादी सजावट. हा सर्व देखावा धरणासाठी मंजूर झालेल्या रकमेतून केला जातो. विशेष म्हणजे वारंवार होणाऱ्या मिटींग व त्याचे भत्ते, तरीही 10-15 वर्षे हे प्रकल्प रेंगाळत असतात. का तर हे सर्व कामगार ''कुशल'' असतात ना ? अथणीचा हिप्परगी बॅरेज व मंगळवेढ्याचा उजनी प्रकल्प याचे बोलके उदाहरण आहे. चिकपडसलगीच्या साईटच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली असता एका छोट्याशा पत्र्याच्या शेडमध्ये सर्व काही असल्याचे दिसले. तेच त्यांचे क्वॉर्टर्स, ऑफिस, पत्र्याच्या बोळकंडीतून येणारा वारा हाच त्यांचा फॅन व कुलर, श्रमदान व इतर काम करणाऱ्या लोकांच्या विश्रांतीसाठी गवताचे एक मोठे छप्पर तयार करून खाली मत्तपैकी वाळू पसरून दिली आहे. सरकार दरबारी एकूण प्रकल्पासाठी मंजूर झालेल्या रकमेपैकी 40-50 टक्के रक्कम या सजावटीसाठी खर्च होते. तर उरलेली रक्कम प्रत्यक्ष प्रकल्पावर खर्ची टाकली जाते. तर रयत संघाने सरकारला दाखवून दिले आहे की, अशा प्रकारचे अनाठायी खर्च न करता देखील प्रकल्प पूर्ण करता येतात.

(6) रयत संघाचे संयोजक, इंजिनियर व या परिसरातील जनता यांनी जीव ओतून मनापासून काम केल्यामुळे अवघ्या दीड वर्षात बंधारा बांधून पूर्ण केला तर सरकारी दरबारातील कामांना 10-15 वर्षे का लागतात, याचाही विचार सरकारने केल्यास बरे होईल. अशा दिरंगाईमुळे प्रकल्प प्रतिवर्षी वाढत जातो. तो बोजा कोण व कसे सहन करणार ? उदाहरणच द्यावयाचे आले तर मंगळवेढा येथे उजनीच्या पाण्यासाठी माण नदीवर जलसेतू


बांधण्याचा 1977 मधील खर्च 90 लक्ष रुपयांचा होता. आज 1989 संपत आले तरी काम पूर्ण झाले नाही. एवढेच नव्हेतर आज त्याचा एकूण खर्च 1 कोटी 45 लाख रुपयांचा झाला आहे. या जाणिवेतून रयत संघाने चिकपडसलगीचा बंधारा बांधण्याचे काम कर्नाटक सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे सुपूर्त करण्यास साफ नकार दिला.

(7) भारतात पहिल्यांदा अशा प्रकारे श्रमदानातून व लोकांच्या स्वयंस्फूर्तीतून एवढ्या मोठ्या धरणाचे बांधकाम पूर्ण होत असल्याचे पाहावयास मिळले. मठ, मंदिरे बांधण्यासाठी, यात्रा समारंभ करण्यासाठी किंवा पुढाऱ्यांना थैली देण्यासाठी, लोक एकत्र येऊन पैसे जमवीत असल्याचे सर्वांनाच माहीत आहे. परंतु देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत, उत्पादनात भर टाकणाऱ्या घटनेत या बंधाऱ्याचा प्रयोग भारतात एक ''अभिनव प्रयोग'' असल्याचे मानले जाते.

(8) या शेतकऱ्यांचे धाडस, आत्मविश्वास स्वावलंबन सहकार्याची मनोभावना आणि संघटन कौशल्य ही गुणवैशिष्ट्ये इतर शेतकऱ्यांनी आदर्श म्हणून आपल्या डोळ्यासमोर ठेवावीत.

(9) एकंदरीत या शेतकऱ्यांनी हाती घेतलेल्या अभिनव उपक्रमाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. अशा प्रकारचे उपक्रम हाती घेतले तर ग्रामीण भागात निश्चितच संघटन भावना वृद्धिंगत होतील यात शंका नाही.

◊◊◊


कृष्णा तीर रैत संघ
सूची नकाशा
= सूची =
गावठाण
बॅरेज
लिफ्ट इरिगेशन स्किम
कृष्णा नदी
कमांड एरीया
अस्तित्वातील बॅरेज
बांधकाम खालील बॅरेज
नियोजीत बॅरेज
जमरबंडी शहर
चिक्कपडसलगी.
N

# सुवर्णाची देशी व विदेशी किंमत

एस. आर. चिरमाडे *

अलिकडे लंडन येथील शेरसन लेहमन आणि ब्रदर्स या सुवर्ण व इतर मूल्यवान धातूसंबंधी माहिती पृथक्करण करणाऱ्या संस्थेने सुवर्णाचे व इतर मूल्यवान धातूचे भाव डॉलरमूल्याची अनिश्चितता, व्याजदर अनिश्चितता, शेअरमूल्याची अनिश्चितता यामुळे अतिरिक्त वाढतील असा निर्वाळा दिला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सुवर्णाची किंमत प्रति औंसाला 500 डॉलर होण्याची शक्यतासुद्धा त्यांनी निवेदित केली आहे. त्यांचे मते 1987 मध्ये सुवर्णाचा एकूण जागतिक पातळीवरील पुरवठा 1543 टन व मागणी 371 टन अशी असेल. 1986 मध्ये सुवर्ण पुरवठा 1502 टन व मागणी 1380 टन अशी होती. दागिने बनविण्याकरिता 925 टन सुवर्णाची आवश्यकता साधारणपणे राहील. सदर संस्थेचे अंदाज वास्तवात प्रत्येकाला येत आहे. भारतीय सुवर्ण किंमत पावसाळ्यामध्ये साधारणपणे कमी होत असते. पण अलिकडे सुवर्ण किंमत कमी होण्याऐवजी वाढत आहे. वरीलप्रमाणे आकडेवारीवरून सुवर्ण किंमत देशात व आंतरराष्ट्रीय पातळीवर सध्या वाढत असल्याचे दिसते. शेरसन लेहमन संस्थेने सुवर्ण किंमत वाढ होण्याकरिता जी कारणमीमांसा दिली आहे ती सर्वसाधारणपणे आर्थिक निदर्शकांवर आधारलेली दिसते. त्यांनी दिलेल्या कारणमीमांसेचे व्यतिरिक्त सध्या स्विस बँकेमधील परदेशी लोकांची असलेली संपत्ती तसेच भारताचे संदर्भात उघडकीला आलेले बोफोर्स व स्विस बँक ठेवी प्रकरण सुद्धा या भाववाढीला कारणीभूत आहे असे अनुमान करण्याला आधार आहे. कारण भारत सरकारचे नियंत्रणाखालील इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स आणि पॉलिसी या संस्थेच्या 1983-84 मध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या 21 टक्के म्हणजेच 37 हजार कोटी रुपये इतका काळा पैसा होता. तसेच परदेशी बँकांमध्ये जवळजवळ 40 हजार कोटी रुपये इतकी संपत्ती भारतीयांनी संचित केली आहे. काही परदेशी बँकांमध्ये अवैध मार्गांनी मिळविलेल्या पैसा सुरक्षित ठेवता येतो. पण अलिकडे बोफोर्स व स्विस बँक या प्रकरणामुळे या परदेशी बँकांमधील ठेवींचे किंवा प्रॉपर्टीच्या ठेवींचे रूपांतर

* प्राध्यापक, मू. जे. महाविद्यालय, जळगाव

सुवर्ण किंवा इतर मूल्यवान धातूमध्ये केले जाणे शक्य आहे व त्यामुळे अशा धातूला मागणी वाढून किंमतही वाढेल असे अनुमान करणे तर्क सुसंगत आहे.

सुवर्णाची भारतातील किंमत (मुंबई) व सुवर्णाची विदेशी किंमत (लंडन) यासंबंधी 1971 ते 1988 अशी तुलनात्मक आकडेवारी पुढील तक्त्यामध्ये दिली आहे.

| वर्ष महिना | लंडन किंमत प्रती 10 ग्रॅम (रुपयांत रूपांतरित) | मुंबई किंमत प्रती 10 ग्रॅम (रुपयांत) | मुंबई व लंडन येथील सुवर्ण किंमत अंतर (रुपयांत) |
|---|---|---|---|
| 1971 (सरासरी) | 107-50 | 200-16 | 92-66 |
| 1972 ,, | 153-31 | 242-14 | 88-82 |
| 1973 ,, | 256-08 | 369-23 | 113-15 |
| 1974 ,, | 418-29 | 519-10 | 100-81 |
| 1975 ,, | 424-18 | 544-49 | 120-31 |
| 1976 ,, | 328-70 | 549-50 | 220-80 |
| 1977 जुलै ,, | 407-00 | 588-00 | 181-00 |
| 1978 ,, | 491-32 | 680-69 | 189-37 |
| 1979 ,, | 726-90 | 978-20 | 251-00 |
| 1980 जून ,, | 1516-91 | 1333-35 | 183-56 |
| 1981 ,, | 1280-45 | 1649-92 | 369-47 |
| 1982 ,, | 959-67 | 1650-80 | 691-13 |
| 1983 ,, | 1353-43 | 1774-96 | 421-53 |
| 1984 ,, | 1364-19 | 1963-07 | 598-88 |
| 1985 ,, | 1291-70 | 2225-00 | 933-30 |
| 1986 ऑगस्ट ,, | 1566-30 | 2250-00 | 683-90 |
| 1987 ,, | 1957-58 | 2925-00 | 967-43 |
| 1987 सप्टें. 5, | 2098-00 | 2980-00 | 882-00 |
| 1987 29 सप्टें. | 2133-00 | 3070-00 | 937-00 |
| 1987 10 ऑक्टो. | 2133-00 | 3125-00 | 992-00 |
| 1987 31 ऑक्टो. | 2163-00 | 3285-00 | 1120-00 |
| 1987 24 नोव्हें. | 2154-00 | 3820-00 | 1660-00 |
| 1987 15 डिसें. | 2294-37 | 3360-00 | 1065-63 |
| 1987 31 डिसें. | 2229-00 | 3400-00 | 1170-00 |
| 1988 30 जाने. | 2146-87 | 3435-00 | 1288-13 |
| 1988 6 फेब्रु. | 2049-45 | 3260-00 | 1210-55 |

संदर्भ : इकॉनॉमिक्स टाईम्स 21-10-1987, 12-11-1987, 6-2-1988.

वरीलप्रमाणे तक्त्यावरून सुवर्णाच्या देशी व विदेशी किमतीसंबंधी कल्पना येते. मुंबईमधील सुवर्ण किंमत लंडनमधील किमतीपेक्षा सर्वसाधारणपणे बरीच जास्त असल्याचे प्रत्ययाला येते. सुवर्णाची किंमत देशी व विदेशी बाजारात अतिरिक्त प्रमाणात का वाढलेली आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे.

**सुवर्ण उत्पादन :**

जागतिक स्तरावर सुवर्णाचे उत्पादन अलिकडे वाढते आहे. जागतिक पातळीवरील उत्पादनाचे आकडे पुढील तक्त्यात दिले आहेत.

**जगातील व भारतातील सुवर्ण उत्पादन (टनामध्ये)**

| वर्ष | जागतिक सुवर्ण उत्पादन | भारतातील सुवर्ण उत्पादन | भारताचे सुवर्ण उत्पादनाचे जगातील उत्पादनाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| 1971 | 1613.08 | 3.07 | 0.23 |
| 1972 | 1530.00 | 3.03 | 0.22 |
| 1973 | 1539.03 | 3.03 | 0.21 |
| 1974 | 1449.05 | 3.02 | 0.22 |
| 1975 | 1384.01 | 3.00 | 0.22 |
| 1976 | 1435.00 | 3.05 | 0.24 |
| 1977 | 1428.05 | 2.05 | 0.18 |
| 1978 | 1432.00 | 1.07 | 0.19 |
| 1979 | 1400.00 | 2.00 | 0.14 |
| 1980 | — | 2.45 | — |
| 1981 | — | 2.49 | — |
| 1982 | — | — | — |
| 1983 | — | — | — |
| 1984 | — | 1.99 | — |
| 1985 | 1502.00 | 1.84 | — |
| 1986 | 1543.00 | — | — |

इकॉनॉमिक्स टाईम्स, दि. 30-1-80
टाईम्स ऑफ इंडिया डिरेक्टरी, 1984

वरीलप्रमाणे आकडेवारीवरून सुवर्णाच्या जागतिक उत्पादनाची कल्पना येते. भारतात सुवर्ण उत्पादन अती अल्प आहे. पण जगात मात्र सुवर्ण उत्पादन बरेच आहे. साम्यवादी राष्ट्रवगळता इतर सुवर्ण निर्माते देशामध्ये 1981 ते 1986 या कालावधीत सुवर्ण उत्पादन फार मोठ्या प्रमाणात वाढले. 1986 मध्ये बिगर साम्यवादी देशांनी 1281 टन सोने उत्पादित केले. दक्षिण आफ्रिका व रशिया येत्या दोन वर्षात अधिकाधिक सोने विक्री काढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दागिन्यांकरिता 2/3 इतके उत्पादन आवश्यक असते. त्यामुळे हल्लीची सोन्याची भाववाढ कायम स्वरूपात राहणार नाही, असा काही तज्ज्ञांचा अंदाज आहे. कारण जगातील अनेक देशात नव्या व सुवर्ण खाणी प्रत्ययाला येत आहेत. जुन्या खाणीमधूनसुध्दा भाववाढीमुळे सुवर्ण काढणे शक्य होत आहे. 1987 मे या कालावधीत सुवर्ण किंमत 475 डॉलर प्रती अंशी होती, पण जून 87 मध्ये ती 446 डॉलर अशी झाली. जागतिक पुरवठा मागणीचे तुलनेने अतिरिक्त असल्याने जागतिक सुवर्ण बाजारपेठेत सुवर्णाची किंमत मोठ्या प्रमाणावर बदलत असते.

**अमेरिकन डॉलरची अस्थिरता व सुवर्णातील गुंतवणूक**

व्हिएतनामधील युध्दामुळे अमेरिकन युध्दखर्च वाढला व चलनही अतिरिक्त वाढविण्यात आले. सर्वसाधारणपणे जे लोक अमेरिकन डॉलरमध्ये संपत्ती संचित करीत होते, त्यांनी डॉलरचे इतर चलनाचे संदर्भात अधोमूल्यन झाल्याने डॉलरऐवजी इतर चलने व सोने यामध्ये गुंतवणूक केली. विनिमयदराचा देशोदेशीचा समन्वय व समायोजन यामुळे सोन्याच्या किंमती वाढल्या. विनिमयदरात विषमता किंवा असमन्वय असल्यास सुवर्णाची किंमत कमी होते. म्हणजेच परदेशी चलनामध्ये सट्टेबाजीमुळे सोन्यामध्ये गुंतवणूक कमी होते. डॉलर किंवा इतर परदेशी चलनाचा वापर सुवर्णातील तस्करी आयात करण्याकरिता केला जातो. अशा चलनाचा मुक्त बाजार विनिमयदर अधिकृत विनिमयदरापेक्षा जास्त असतो. म्हणूनच भारतातील सुवर्णाची किंमत विदेशी किमतीपेक्षा जास्त असते.

**तस्करी स्वरूपात आयात होणारे सोने :**

तस्करी मार्गाने आणलेल्या सोन्याकरिता अतिरिक्त दराने परदेशी चलन खरेदी केले जाते. म्हणून सोन्याची परदेशी किंमत यामध्ये बराच फरक असतो. भारतात दरवर्षी तस्करी मार्गाने जे सोने आणले जाते त्यासंबंधी संख्यात्मक माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

| वर्ष | तस्करी स्वरूपात भारतात आणलेले सोने (टन) |
|---|---|
| 1968 | 140-00 |
| 1969 | 103-00 |
| 1970 | 215-00 |
| 1971 | 175-00 |
| 1972 | 107-20 |
| 1973 | 60-50 |
| 1974 | 14-00 |
| 1975 | 25-00 |
| 1976 | 32-90 |
| 1977 | 39-50 |
| 1978 | 34-00 |
| 1979 | 10-00 |
| 1980 | 9-00 |
| 1981 | 25-40 |
| 1982 | 50-00 |
| 1983 | 60-00 |
| 1984 | 70-00 |

संदर्भ : इकॉनॉमिक टाईम्स, 15-9-82, 12-11-87.

वरील आकडेवारीवरून सोन्याचा व्यापार किती विस्तृत प्रमाणावर आहे, हे सहज लक्षात येते. तस्करांना विदेशात सुवर्ण खरेदीकरिता परदेशी चलनाकरिता अधिकृत विनिमय दरापेक्षा जवळजवळ 33 टक्क्यांपेक्षा जादा दर द्यावा लागतो. तसेच तस्करी नफ्याची अपेक्षा 33 ते 45 टक्क्यांपर्यंत असल्याने सोन्याची किंमत वाढ होते. तस्करी मार्गाने येणाऱ्या सोन्याला विमा संरक्षण देणाऱ्या काही कंपन्या आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत. तस्कर सोन्याची बिस्कीटे सिंगापूर किंवा हाँगकाँगमधून भारतीय किनाऱ्यावर पाठवितात व तेथून सदर माल देशात येतो. सुवर्ण मूल्याच्या 5 टक्केपर्यंत विमा कसर असते. भारतीय अधिकाऱ्यांनी सोने पकडल्यास विम्याची पूर्ण रक्कम उपलब्ध होते.

**भारतातील सुवर्ण किमतीचे उर्ध्वगमन :**

भारतात सोन्याच्या किमती वाढल्यावर परत किंमत कमी होण्याची शक्यता फार कमी असते. कारण भारतातील सुवर्ण बाजार विदेशी बाजारापेक्षा वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण आहे. उलट परदेशी बाजारापेठांमध्ये सुवर्णाची किंमत मोठ्या प्रमाणावर कमीजास्त होत असते. किमती संबंधीच्या या फरकाचे कारण म्हणजे भारतात सुवर्णाचा कायम तुटवडा आहे. सामाजिक स्वरूपाची मागणी मात्र सातत्याची असते. तसेच भारतात

जगातील सर्व देशांचे तुलनेने अधिक समांतर अर्थव्यवस्थेतील व्यवहार आहे. या व्यवहारातील काही मिळकत सुवर्णामध्येच सर्वसाधारणपणे गुंतली जाते. तसेच सुवर्णव्यवहार सट्टेबाजीच्या हेतूनेसुध्दा केले जातात. दागिन्याप्रमाणेच उद्योगव्यवसायात दंतचिकित्सा विद्युत् याकरिता सुध्दा सोन्याची मागणी वाढत आहे.

**ग्रामीण शिलकी पैसा व सुवर्णात गुंतवणूक :**

ग्रामीण शेतीव्यवसायात हरीतक्रांती झाल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. पाणीपुरवठा सोयी, सुधारित व हायब्रीड बियाणे, कीटकनाशके, रासायनिक खते अद्ययावत शेती मशागती यामुळे शेती उत्पादन वाढले आहे. शेतीव्यवसायातील गुंतवणूक पूर्वी शेती धारणा वाढवण्याकडे केली जात असे पण अलिकडे ग्रामीण शेतीवर कमाल धारणा कायदे लागू असल्याने शेतीतील शिल्लक सोने, घरबांधणी यावर खर्च केली जाते. काही पिकांकरिता उदा. तेलबिया, डाळी व इतर नगदी पिके यांच्या किमतीसुध्दा शेतकऱ्यांना आकर्षक आहेत. तसेच शेती व्यवसायावर अगदी प्रगत शेतकऱ्यांवरसुध्दा इतर समाज घटकाचे तुलनेने आयकरासारख्या कराचे ओझे जवळजवळ नाहीच. त्यामुळे शिलकी रकमेचा विनियोग सुवर्ण खरेदी करण्याकरिता होतो. कोरडवाहू शेतमाल, उदा. हायब्रीड ज्वारी, बाजरी, गहू यांसारख्या मालाच्या किमती मात्र कमी आहेत, आणि ही पिके साधारणपणे गरीब व मध्यमवर्गीय शेतकरी घेतात. बागायत पिके जसे ऊस, फळफळावळ, भाजीपाला यांच्या किमती फारच वाढलेल्या आहेत व बागायतदार शेतकऱ्यांना बऱ्याच प्रमाणात विक्रेवाढावा असल्याने फायदा होऊन त्यांची शेष शिल्लक सुवर्ण खरेदीकडे वर्ग होते. ग्रामीण भागात शिलकी वाढत आहे. हे बँकांच्या ठेवीवाढीवरूनसुध्दा लक्षात येण्यासारखे आहे. ग्रामीण भागात अगदी दूरवर व्यापारी व सहकारी बँकांच्या शाखा उघडण्यात आलेल्या आहेत व त्या माध्यमातून सुध्दा काही ग्रामीण शिलकी ठेवी रूपाने मिळवल्या जातात.

**करविषयक धोरण व सुवर्ण किंमतमान :**

भारताच्या 1985-86 या अंदाजपत्रकामध्ये संपत्ती कराबाबत काही सवलती देण्यात आल्या. त्यामुळे सोन्याच्या खरेदीकडे सवलत अधिक वाढलेली आहे. सुवर्णामधील किंमतीतील वाढीमुळे व सुवर्ण हे कायम स्वरूपाचे मूल्यवान असे ऐवज असल्याने कंपनीच्या शेअरपेक्षा सोन्यात गुंतवणूक करण्याची प्रवृत्तीसुध्दा वाढलेली आहे. सुवर्णामधील गुंतवणूक बहुतांशी दागदागिने स्वरूपात असल्याने आर्थिक दृष्टिकोनातून अनुत्पादक असते व भारतामध्ये अशा गुंतवणुकीला भाववाढीमुळे प्रोत्साहन मिळत आहे. भारतात जवळजवळ 5400 टन सोने साठा असल्याचा अंदाज आहे. तसेच नव्या वित्तीय धोरणामुळे करदर कमी झाल्याने शेष उत्पन्न सुवर्णामध्ये गुंतविण्याची प्रवृत्ती वाढली आहे.

**आंतरराष्ट्रीय द्रव्यनिधी व मध्यवर्ती बँकेकडून सुवर्ण विक्री :**

जानेवारी 1975 मध्ये आंतरराष्ट्रीय द्रव्यनिधीच्या 126 राष्ट्रांनी चलनाची सुवर्णातील किंमत ही पध्दती बंद करण्याचे ठरविले त्यामुळे सुवर्णाचे आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याबाबत महत्त्व कमी झाले. सुवर्णाचा आंतरराष्ट्रीय द्रव्यनिधी व्यवहारात कोणताही संबंध राहिला नाही. तसेच मध्यवर्ती बँकांनी सुवर्ण विक्रीचे धोरण स्वीकारले. द्रव्यनिधीने सुध्दा स्वतःजवळील सोन्यापैकी 1/6 सोने विकले. भारत सरकारनेसुध्दा 1978 मध्ये 80 टन शासकीय सुवर्ण साठ्यापैकी 12.959 टन सोने 86.69 कोटी रुपयाला लिलाव पध्दतीने विकले. हे लिलाव मे 1978 पासून ऑक्टोबर 1978 या अवधीत करण्यात आले. शासनाजवळ सोन्याचा साठा मर्यादित असल्याने सोन्याचा लिलाव बंद करण्यात आला. पण अर्थव्यवस्थेमध्ये मात्र सुवर्णाची किंमत तेव्हापासून जलद वाढण्याला सुरुवात झाली. कारण काही थोड्या व्यक्तींनी लिलाव पध्दतीचा त्यांचे फायद्याचे दृष्टीने उपयोग करून सुवर्ण संचित केले व त्यामुळे भाववाढ सरसावली. ज्यांनी सोने लिलावात खरेदी केले, त्यांनी खूप नफा मिळविला. सुवर्णाची मागणी अती ताठर असल्याने सुवर्णाचा शासकीय पातळीवरून तोकडा पुरवठा करून उलट सुवर्णाची किंमत कमी होण्याऐवजी वाढली.

**पेट्रोलियमची भाववाढ व सुवर्ण किंमत :**

1974 मध्ये पेट्रोलियमच्या किंमतीत जवळजवळ 300 टक्के वाढ झाली. त्यामुळे अप्रत्यक्ष परिणाम म्हणून सुवर्णाची किंमत वाढली. तसेच 1974 मध्ये अमेरिकेने डॉलर व सुवर्ण यामधील मुक्त विनिमयदर बंद केला. पेट्रोलियम किंमत वाढल्यामुळे डॉलर व इतर चलने कमकुवत बनली व गुंतवणूक त्यामुळे सुवर्णामध्ये करण्याचा कल वाढला. अरब राष्ट्रातील लोकांनीसुध्दा त्यांच्या शिलकी रकमा सुवर्णामध्ये गुंतवण्याला सुरुवात केली. त्यामुळे सुवर्णाची किंमत दर औंशाला डॉलर 850 पर्यंत 1980 डिसेंबरमध्ये वाढली. पुढे अमेरिकेत व्याजाचे दर 20 टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले. त्यामुळे नंतरच्या काळात उत्पादक गुंतवणूक वाढली. अरब राष्ट्रांच्या लोकांनी त्यांच्या बचती डॉलरमध्ये वर्ग केल्या अतिरिक्त व्याज दरवाढीमुळे सुवर्ण किमती कमी होण्याला मदत झाली. तसेच पेट्रोलियमच्या किमती कमी झाल्या. अरब देशवासियांनी त्यांचेजवळील सोने विक्रीला काढले. रशियामध्ये 1981 मध्ये दुष्काळ परिस्थिती असल्याने मोठ्या प्रमाणावर म्हणजे 300 टन सोने इतकी विक्री करण्यात आली. वरील कृतीमुळे सुवर्णाची आंतरराष्ट्रीय किंमत पुन्हा जून 1982 मध्ये डॉलर 380 झाली. जुलै 1982 पासून पुन्हा सुवर्णाची आंतरराष्ट्रीय किंमत वाढू लागली. कारण अमेरिकेत व्याजाचे दर कमी करण्यात आले. परिणामी सोन्यातील गुंतवणूक वाढली. अमेरिकेत मंदी आल्याने अनेक बँका संकटात आल्या. चलनाच्या क्रयशक्तीचा व

सुवर्णामधील गुंतवणुकीचा फार जवळचा संबंध आहे. चलन दुबळे बनले तर सुवर्ण किंमत वाढत असते. भारतात सुवर्ण किंमत वाढत आहे. कारण भारतीय रुपयांची क्रयशक्ती भाववाढीमुळे कमी होत आहे. भारतातील सुवर्ण किंमत सर्वसाधारणपणे नेहमीच आंतरराष्ट्रीय किमतीपेक्षा जास्त असते. अलिकडे दोन्ही किमतीतील तफावत 800 ते 900 पर्यंत वाढलेली दिसते. (10 ग्रॅमला) तसेच भारतात दरवर्षी मागणी जवळजवळ 80 टनाइतकी असते व उत्पादन फक्त 2 टनाच्या आसपास आहे. जगात सुवर्णाचा साठा जवळजवळ 60 हजार टन आहे. भारतातील साठा 5400 टन असून तो बहुतांशी खाजगी मालकीचा आहे. बाकी सर्व सुवर्ण तस्करी मार्गाने भारतात आणले जाते. दुष्काळी परिस्थिती असल्यास काही प्रमाणात सुवर्णाचा देशी आपद स्थिती स्वरूप पुरवठा वाढवण्याची शक्यता असते. ह्या वर्षी म्हणजे 1987 मध्ये अनेक राज्यात दुष्काळ आहे. त्यामुळे आपत्ती स्वरूप सुवर्ण पुरवठा जास्त होण्याची शक्यता आहे.

**सुवर्णाची अतिरिक्त किंमत व मध्यम वर्गीयांची क्रयशक्ती :**

1963 पासून सुवर्ण नियंत्रण कायदा अंमलात आलेला आहे व तेव्हापासून देशी व विदेशी सुवर्ण किंमतीमध्ये अधिक तफावत पडत आहे. ह्या तफावतीमध्ये तस्करी अधिक वाढत आहे. 1978 मध्ये सुवर्ण धोरणाकरिता एक समिती शासनाने नेमली होती. ह्या समितीच्या मते सोने फक्त फार थोडे लोक धारण करतात. त्यामुळे शासनाने खास दखल घेण्याचे कारण नाही, असे प्रतिपादन केले. सुवर्णाच्या वाढलेल्या किंमतीमुळे मध्यमवर्गीयांच्या आवाक्याबाहेर सुवर्ण खरेदी जात आहे. भारतातील हुंडा पध्दती बोकाळली आहे. मुलींच्या पालकांना हुंडा साधारणपणे सोन्यातच द्यावा लागतो. हुंडा पध्दती सर्व समाज स्तरात पसरत आहे. त्यामुळे मध्यमवर्गीयांचा व लहान शेतकऱ्यांचा सुध्दा सुवर्ण खरेदीशी संबंध येतो. मात्र अतिरिक्त भाववाढीमुळे त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन जसे शेती, राहते घर इत्यादी विकावे लागत आहे, असे लेखकाने केलेल्या एका संशोधन पाहणीत प्रत्ययाला आले आहे. म्हणून शासनाने सुवर्णाचे व्यापाराबाबत काही तरी ठोस धोरण स्विकारणे जरूर आहे. सुवर्णाची खाजगी क्षेत्रातील मालकी अतिशय विषम स्वरूपाची आहे. समाजातील अती श्रीमंत काळा पैसाधारक नवश्रीमंताकडे सोन्याची मालकी केंद्रित झाली आहे! अमेरिकेसारख्या श्रीमंत व भांडवलशाही देशातसुध्दा 1976 पूर्वी अस्सल सुवर्ण धारणेला खाजगी लोकांना परवानगी नव्हती. रशियासारख्या साम्यवादी देशात खाजगी लोकांना सुवर्ण धारणेची परवानगी नाही.

**सुवर्ण बाजारपेठा**

ब्रिटिश काळामध्ये लंडन हे जगातील एक सुवर्ण व्यापाराचे प्रमुख व मध्यवर्ती केंद्र होते. कारण आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवहार लंडनमधून नियंत्रित होत असत. दुसऱ्या महायुध्दानंतर स्विझर्लंडमधील झुरिच या शहरामध्ये सुवर्ण व्यापार वाढीस लागला. 1968 पर्यंत झुरिच महत्त्वपूर्ण सुवर्णपेठ बनली. दक्षिण आफ्रिकेतील व रशियामधील सोने झुरिच येथे आकर्षित झाले. अमेरिकेत 1933 ते 1975 पर्यंतच्या काळात सोने धारण करणे कायद्यानुसार प्रतिबंधित होते. त्यामुळे अमेरिकेत सुवर्णाचा व्यापार विकसित झाला नाही. 1975 नंतर मात्र न्यूयॉर्क व शिकागो येथे सुवर्ण व्यवहार सुरू झाले. 1980 पासून हाँगकाँग, सिंगापूर येथे सुवर्ण व्यवहार होऊ लागले. मुंबईला फार जुना सुवर्ण बाजार आहे. पुणे, मुंबईचा सुवर्ण बाजार शासकीय नियंत्रणामुळे सुप्त स्वरूपात कार्य करतो. भारताला समुद्र किनारा मोठा असल्याने समुद्र तस्करी मोठ्या प्रमाणावर चालते. सुवर्ण तस्करी बाजारात साधारणपणे चांदीने बदला घेतली जाते. चांदीच्या विक्रीत नुकसान असले तरी सुवर्णाच्या विक्रीत अतिरिक्त नफा असतो. परदेशात स्थायिक असलेल्या भारतीयांच्या बचतीसुध्दा तस्कर वापरतात. दरवर्षी साधारणपणे मध्यम व उच्च वर्गात 20 लाख विवाह भारतात होतात. प्रत्येक विवाहात 30 ग्रॅम सोने अशा हिशेबाने साधारणपणे 60 टन सोन्याची मागणी दरवर्षी दागिन्याकरिता असते. तसेच दुष्काळ किंवा इतर कारणांमुळे 10 ते 12 टन सोने बाजारात विक्रीला येते. म्हणजेच 50 टनांची तफावत भारतीय बाजारपेठेत असते, व ही तफावत बहुतांशी तस्कर भरून काढतात. अशा परिस्थितीत सुवर्णाची आयात शासनाने अधिकृतरित्या करणे उचित वाटते.

**सुवर्ण साठेबाजी व अविकसित देशांचा आर्थिक विकास :**

भारतात सुवर्णाचा साठा फार मोठ्या प्रमाणात आहे. वित्तीय साधनसामुग्री, कारखानदारी किंवा इतर उत्पादन प्रयोजनाकडे न वापरता सुवर्ण खरेदीकडे वापरली जाते. आर्थिक विकासाचे दृष्टीने हे बरोबर नाही. सुवर्ण हे समाजातील प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जाते. म्हणून विकसनशील देशांनी सुवर्णाचे बाबत संयुक्तिक धोरण आखण्याची जरूर आहे. विकसित देशाच्या सुवर्ण धोरणाचा आंधळेपणाने अवलंब करणे बरोबर होणार नाही. काही तज्ञ सुवर्ण व्यवहारावर अप्रत्यक्ष कर टाकण्याचे सुध्दा सुचवितात. गोल्डबोंड, सुवर्ण सर्टिफिकेटस, सुवर्णाची शासकीय पातळीवर आयात अशाही सूचना काही तज्ञ करतात. भारतीय अर्थव्यवस्थेत जगातील कोणत्याही इतर देशांपेक्षा जास्त प्रमाणात काळा पैसा असल्याने व हा पैसा सुवर्णामध्ये गुंतविला जात असल्याने याबाबत आवश्यक ती प्रभावी व परिणामकारक कारवाई जरूर आहे. चालू शतकाअखेर जागतिक उत्पादन 2000 टनापर्यंत होईल. दक्षिण आफ्रिका, रशिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूगिनी यामध्ये सुवर्णाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढेल असा अंदाज आहे. भारतात मात्र सुवर्ण उत्पादन अतिअल्प म्हणजे 2

टनांचे आसपास असून मागणी 60 ते 80 टनांचे आसपास आहे. ही मागणी वस्तुतः बहुतांशी आयातीव्दारे भागविली जाते. तस्कर 900 रुपये प्रती 10 ग्रॅम इतका अतिरिक्त नफा घेत असतात, असे प्रत्ययाला येते. या परिस्थितीचे शासनाने आकलन करून वस्तुनिष्ठ व व्यवहार्य सुवर्ण धोरण स्विकारले पाहिजे. सुवर्ण व्यवहारातील तस्करी काळाबाजार व नफेखोरीला आळा घालून स्थिर व मर्यादित उत्पन्न असलेल्या मध्यमवर्गीयांना त्यांच्या सामाजिक व कौटुंबिक गरजा इतके तरी सुवर्ण किफायतशीरपणे उपलब्ध केले गेले पाहिजे.

## 19 ऑक्टोबर 87 पासूनचे मंदीचे लाट व सुवर्ण किंमत

19 ऑक्टोबर 87 रोजी अमेरिकेत शेअर्सचे भाव कमी होऊन जी मंदी निर्माण झाली त्यामुळे सुवर्णाच्या जागतिक किमतीमध्ये वाढ झाली. कारण शेअर्सच्या ऐवजी सुवर्णामध्ये गुंतविणे अधिक फायद्याचे झाले. न्यूयॉर्क सुवर्ण बाजारामध्ये फार मोठ्या प्रमाणावर खरेदी शक्ती सुवर्णाकडे वळविण्यात आली. तसेच अमेरिकन डॉलरची किंमत जपानचे 'येनच्या' संदर्भात व डॉयच मार्कचे संदर्भात कमी झाल्यानेसुध्दा गुंतवणूक डॉलरऐवजी सुवर्ण खरेदीकडे वळल्याचे प्रत्ययाला आले. सुवर्णाप्रमाणे चांदीची किंमतसुध्दा न्यूयॉर्क बाजारात वाढली. 1987 मध्ये केंद्रशासनाच्या कस्टम खात्याच्या वारंवार पडणाऱ्या धाडीमुळे सुध्दा सुवर्णाची तस्करी आयात कमी झाली व भारतातील सुवर्ण किंमत वाढत राहिली. ऑगस्ट 1987 मध्ये भारतातील सुवर्ण किंमत 2965/- होती. 24 नोव्हे. 1987 रोजी रु. 3820/- अशी झाली व नंतर कमी होऊन 6 फेब्रु. 1988 रोजी किंमत रु. 3300/- प्रती 10 ग्रॅम अशी झाली.

## सुवर्ण आयात व उत्पादन धोरण

1989 मध्ये देशात एकूण बचत 35268/- रु. होती. त्यापैकी जवळजवळ 4500/- रु. एवढी गुंतवणूक सुवर्ण व चांदी या धातूमध्ये करण्यात आली. असा तज्ञांचा अंदाज आहे. तसेच दरसाल 1500/- कोटी रुपये इतके मूल्याचे परकीय चलन बेकायदेशीर मार्गाने सुवर्ण आयातीकरिता वापरले जाते. म्हणून बॅगेज नियम शिथिल केल्यास व भारतात येणाऱ्या व्यक्तीला प्रत्येकी 50 ग्रॅम सोने बरोबर आणण्याला परवानगी दिल्यास सुवर्ण पुरवठा वाढेल. व किंमती कमी होतील. तसेच परदेशातील सुवर्ण खाण तज्ञ कंपन्यांना जर भारतात नियंत्रित स्वरूपात सुवर्ण उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करण्यास परवानगी दिल्यास सुवर्णाचे देशी उत्पादन वाढू शकेल. भारतात खाजगीरित्या सुवर्णाचा प्रचंड साठा आहे. त्यातून व विवाहप्रसंगीचा डामडौल बडेजाव प्रत्ययाला येतो. म्हणून असा सुवर्ण डामडौल व बडेजाव यावर नियंत्रण घालून सदर सुवर्ण सुवर्ण रोखे स्वरूपात गुंतविल्यास आर्थिक विकासाला पोषक असा उपयोग होऊ शकेल. काळ्या पैशाची जी गुंतवणूक सुवर्णात होत आहे त्यालाही पायबंद झाला पाहिजे. काळ्या पैशाच्या व्याप्तीला आळा घातल्यास सुवर्ण किंमत नियंत्रित होऊ शकेल. अर्थव्यवस्थेतील इतर वस्तूंच्या किमती व सुवर्णासारख्या मौल्यवान धातूच्या किमती यामध्ये ताळमेळ (पॅरिटी), अलिकडे समांतर अर्थव्यवस्थेच्या प्रभावामुळे सुवर्ण किंमत व इतर वस्तूंच्या किंमती यामध्ये फारच तफावत (डिसपॅरिटी) होत आहे.

## सुवर्ण किंमत व सर्वसाधारण वस्तूंची भाववाढ

सुवर्ण व चांदीच्या किमती वाढत असल्याने गुंतवणूक प्रवाह या धातूच्या खरेदीत गोठला जातो. त्यामुळे इतर वस्तूंची मागणी कमी होऊन त्या वस्तूंची भाववाढ रोखली जाते असा युक्तिवाद सुवर्ण किमतीकडे दुर्लक्ष करण्यामागे दिसतो. हा युक्तिवाद संयुक्तिक नाही कारण सर्वसाधारण किंमत वाढ स्थिर ठेवण्याकरिता मौल्यवान धातूच्या खरेदीत खरेदीशक्ती अडविणे हे आर्थिक नीतीच्या दृष्टीने बरोबर नाही. सर्वसाधारण किंमत-मान स्थिर ठेवण्याकरिता शासनाने प्रखर व परिणामी असे प्रतिरोधात्मक मार्ग अवलंबिले पाहिजेत. सुवर्ण व चांदीच्या किमती फोफावल्यामुळे सर्वसाधारण वस्तूंचे किंमतमान रोखले जाते हे तत्त्व जरी खरे असले तरी ते वस्तुतः विकृत स्वरूपाचे आहे. आर्थिक समस्येला मुरकोडी व शासनाचा नाकर्तेपणा त्यातून दिसतो.

## वास्तव व परिणामकारक सुवर्ण धोरणाची गरज

सुवर्ण आयातीकरिता वास्तव धोरण ठरविणे जरूर आहे. सुवर्ण आयात व सुवर्ण बँक या संदर्भात रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर सी. रंगराजन यांचे अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमली होती पण अजून त्याबाबत कृती झालेली दिसत नाही. सुवर्ण व्यापाराला मक्तेदारी स्वरूप आहे. सुवर्ण नियंत्रण कायद्यात ही मक्तेदारी कमी करण्याच्या दृष्टीने दुरुस्ती झाली पाहिजे. सुवर्णातील गुंतवणूक आर्थिकदृष्ट्या उत्पादक आहे पण प्रत्यक्षात मध्यम व उच्च कुटुंबातून जवळजवळ 10 टक्के बचत सुवर्णात गुंतविली जाते. ऑक्टोबर 1987 मध्ये जी मंदीची लाट आली त्यामुळे तर कंपन्यांच्या शेअर्समधील गुंतवणूक प्रवाह सुवर्णाकडे वळविला गेला, अशी परिस्थिती निर्माण होणे आर्थिक विकासाच्या दृष्टीने घातक आहे. म्हणून शासनाने सुवर्ण पुरवठा मागणी व किंमत याबाबत तटस्थतेची किंवा उदासीनतेची भूमिका घेणे धोक्याचे आहे.

०००

# पीएच. डी.
# प्रबंधाचा सारांश

## Zilla Parishad Finance in Vidarbha : 1963-82 (Structure and Trends)*

सुलोचना मानकर **

प्रस्तुत प्रबंधात विदर्भातील जिल्हा परिषदांच्या उत्पन्न व खर्चाची रचना आणि प्रवृत्ती यांचा अभ्यास केला. यासाठी जिल्हा परिषद आणि राज्य सरकारव्दारा प्रसिध्द केलेल्या माहितीचा उपयोग करण्यात आला. तसेच जिल्हा परिषदेचे निर्वाचित पदाधिकारी व अधिकारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

संशोधनाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.-

**विकेंद्रीकरणाच्या कक्षा**

(1) स्थानिक स्वशासन (**Local Self-Government**) हा लोकशाही शासन प्रणालीचा सर्वात आदर्श प्रकार आहे. कारण स्थानिक विकास हा लोकांच्या प्रेरणेने आणि सहभागाने चांगल्या प्रकारे साध्य होऊ शकतो व राष्ट्रीय योजनांचा लोकांना जास्तीत जास्त फायदा होऊ शकतो.

अर्थात नियोजन आणि निगरानी या दृष्टीने कार्यकारी घटक कोणता असावा याबाबत मतभिन्नता असलेली दिसून येते.

(2) 1957 साली स्थापन झालेल्या बलवंतराय मेहता समितीने सार्वजनिक हिताच्या कामात व्यक्तिगत रस घेणे व त्यासाठी त्याग करण्याची तयारी असणे या दृष्टीने 'गट' **Block** हा कार्यकारी घटक असावा असे सुचविले होते. समितीने पुढे असे म्हटले आहे की, ह्या संस्थांच्या कार्यक्षेत्रात येणारी सार्वजनिक हिताची व विकासाची सर्व कामे ह्या संस्थांकडे सोपवायला पाहिजेत. फक्त मार्गदर्शन करणे, निगरानी ठेवणे व आवश्यक असल्यास निधी उपलब्ध करून देणे ही कामे राज्य सरकारने स्वतःकडे ठेवावीत.

(3) महाराष्ट्रात याच संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या लोकशाही विकेंद्रीकरण समितीने ( नाईक समिती 1961 ) लोकशाही विकेंद्रीकरणाचा कार्यकारी घटक 'जिल्हा' असावा असे म्हटले आहे. कारण त्यांच्या मते जिल्ह्याच्या समन्वयात्मक विकासासाठी आवश्यक असलेली संसाधने, प्रशासकीय व तांत्रिक दृष्टीने आवश्यक मानवीय साधने ही जिल्हा स्तरावरच उपलब्ध

* श्रीमती. मानकर यांचा सदर प्रबंध नागपूर विद्यापीठाने **Ph. D.** साठी स्वीकारलेला आहे. प्रबंधासाठी मार्गदर्शक होते नागपूर विद्यापीठातील डॉ. श्री. वि. खांदेवाले.

** अर्थशास्त्र विभागप्रमुख श्रीमती रा. गो. महिला महाविद्यालय, अकोला.

होऊ शकतात. यानुसार 1962 साली महाराष्ट्रात जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्या.

(4) जिल्हा परिषदांच्या वित्ताच्या बाबतीत नाईक समितीने असे म्हटले आहे की, ह्या संस्था वित्तासाठी पूर्णपणे राज्य सरकारवर निर्भर राहू नये. त्यांना उत्पन्नाची साधने उपलब्ध करून द्यायला पाहिजेत, जेणेकरून ह्या संस्था भविष्यात स्वयंनिर्भर बनतील.

(5) थोडक्यात, बलवंतराय मेहता समितीने संघटनात्मक दृष्टिकोनातून कार्यकारी घटक 'गट' असावा असे सुचविले होते तर नाईक समितीने प्रशासकीय दृष्टिकोनातून 'जिल्हा' हा कार्यकारी घटक सुचविला होता.

(6) राष्ट्रीय स्तरावर 1978 साली स्थापन झालेल्या पंचायत राज संस्था समितीने (अशोक मेहता समिती) लोकांचा अधिकाधिक सहभाग आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने 'मंडल पंचायत' स्थापन करण्याची शिफारस केली होती.

यानुसार, आतापर्यंत फक्त आंध्र आणि कर्नाटक ह्या दोन राज्यात मंडल पंचायत स्थापन करण्यात आल्या.

(7) या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, बलवंतराय मेहता समितीपासून तो अगदी अलीकडच्या काळात महाराष्ट्रात स्थापन झालेल्या पाटील समिती 1986 पर्यंत सर्वांनी वारंवार आवर्जून सांगितले की, कार्यकारी घटक कोणताही असला तरी जर ह्या संस्थांना प्रभावी लोकशाही आर्थिक संस्था म्हणून कार्य करू द्यायचे असेल तर त्यांना पुरेशी उत्पन्नाची साधने उपलब्ध करून द्यायला पाहिजेत.

(8) परंतु अभ्यासांती असे निदर्शनास आले की, 1963 ते 82 या कालावधीत विदर्भातील जिल्हा परिषदांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत सरकारी अनुदान हा आहे. वरील कालावधीत विदर्भातील सर्व जिल्हा परिषदांच्या संयुक्तरित्या आणि व्यक्तिशः एकूण महसुली उत्पन्नातील सरकारी अनुदानाचा वाटा कधीही 85 % पेक्षा कमी नव्हता. एवढेच नाही तर हे अनुदान कोणत्या योजनांवर आणि कशा प्रकारे खर्च करावे यासंबंधी मार्गदर्शक सूचनाही दिलेल्या असतात. त्यामुळे याबाबत जिल्हा परिषदांना फारसे स्वातंत्र्य उरत नाही.

(9) जिल्हा परिषदांना स्वतःचे उत्पन्न खर्च करण्याचे स्वातंत्र्य असते. पण हे उत्पन्न मर्यादित असते. 1963-82 या कालावधीत विदर्भातील जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न व्यक्तिशः अथवा संयुक्तरित्या 15% पेक्षा कधीही जास्त नव्हते.

(10) जिल्हा परिषदांचे स्वतःचे उत्पन्न वाढविण्याला मर्यादा आहेत कारण जिल्हा परिषदांद्वारा राबविल्या जाणाऱ्या योजनांचा उद्देश प्रसार करणे व सेवा प्रदान करणे हा असतो. उत्पन्न मिळविणे हा उद्देश नसल्यामुळे ह्या योजनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नात फारशी वाढ होऊ शकत नाही.

जिल्हा परिषदेचे स्वतःचे सर्वात महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन म्हणजे स्थानिक उपकर. ह्या साधनांपासून मिळणारे उत्पन्न हे शेतसाऱ्याच्या वसुलीवर म्हणजे पर्यायाने निसर्गाच्या अनुकूलतेवर व पिकाच्या परिस्थितीवर अवलंबून असते. त्यामुळे स्थानिक उपकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नाला मर्यादा पडतात.

**महसुली उत्पन्न व खर्च**

(11) 1962-83 च्या तुलनेने 1981-82 साली विदर्भातील सर्व जिल्हा परिषदांच्या संयुक्त उत्पन्नात 796% ने वाढ झाली.

(12) विदर्भातील फक्त भंडारा जिल्हा परिषदेचा अपवाद वगळता इतर सर्व जिल्हा परिषदांच्या बाबतीत 1963-82 या कालावधीत सरकारी अनुदानात झालेली वाढ ही एकूण महसुली उत्पन्नात झालेल्या वाढीपेक्षा अंशतः जास्त आहे.

(13) विदर्भातील सर्व जिल्हा परिषदांचा संयुक्तपणे विचार करता स्थानिक उपकर + इतर कर व फी ह्या जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या एकूण महसुली उत्पन्नातील वाटा 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली कमी झालेला दिसतो.

ही तथ्ये "विदर्भातील जिल्हा परिषदा उत्पन्न वाढविण्यासाठी अधिप्रमाण करपद्धतीचा अवलंब करतात" ही परिकल्पना अस्विकारणीय ठरवितात.

(14) 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली बांधकाम आणि दळणवळण, जलसिंचन, शेती व पशुसंवर्धन आणि वने ह्यांसारख्या प्रत्यक्ष विकासात्मक बाबींवर होणाऱ्या खर्चातील वाढ ही एकूण महसुली खर्चातील वाढीपेक्षा जास्त होती.

ही तथ्ये " जिल्हा परिषदांच्या खर्चाचा मोठा हिस्सा हा विकासात्मक कार्यावर खर्च केला जातो. आणि त्याव्दारा दीर्घकालीन विकासाची हमी मिळते" ह्या परिकल्पनेचे समर्थन करतात.

(15) विदर्भातील सर्वच जिल्हा परिषदांच्या एकूण महसुली खर्चाचा 40% हिस्सा नेहमीच शिक्षणावर खर्च झालेला दिसतो.

(16) सामाजिक कल्याणावर होणाऱ्या एकूण खर्चापैकी मोठा हिस्सा हा मागासवर्गीयांच्या कल्याणावर खर्च झालेला दिसतो. ज्यात शैक्षणिक सवलती, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांना दिले जाणारे अनुदान यांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो.

(17) 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली विदर्भातील जिल्हा परिषदांच्या प्रती-व्यक्ती उत्पन्न व प्रती-व्यक्ती खर्चात

झालेली वाढ ही अनुक्रमे एकूण महसुली उत्पन्न व एकूण महसुली खर्चात झालेल्या वाढीपेक्षा कमी आहे.

याचे कारण लोकसंख्येत झालेली वाढ हे होय.

(18) स्थानिक उपकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबतीत अकोला व अमरावती जिल्हा परिषद विदर्भातील इतर जिल्हा परिषदांपेक्षा आघाडीवर आहे.

(19) इतर कर व फी ह्या साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबतीत अकोला, अमरावती, भंडारा, नागपूर आणि चंद्रपूर ह्या जिल्हा परिषदा विदर्भातील उर्वरित जिल्हा परिषदांच्या तुलनेने आघाडीवर आहेत.

(20) एकूण महसुली उत्पन्नाचा विकास-दर हा चंद्रपूर जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त आहे तर अकोला, अमरावती, भंडारा आणि यवतमाळ जिल्हा परिषदांसाठी प्रादेशिक विकास-दरापेक्षा जास्त आहे.

भंडारा आणि चंद्रपूरसारख्या मागासलेल्या जिल्ह्यांसाठी एकूण महसुली उत्पन्नाचा विकास दर जास्त असणे हे त्यांना विकासाच्या अधिक संधी उपलब्ध करून दिल्याचे द्योतक आहे.

(21) 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली एकूण महसुली खर्च आणि दरडोई खर्च यात झालेली वाढ ही चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या बाबतीत सर्वात जास्त तर यवतमाळ आणि भंडारा जिल्हा परिषदेच्या बाबतीत सरासरीपेक्षा जास्त आहे. ह्या सर्व जिल्ह्यांमध्ये आदिवासी लोकांचे प्रमाण जास्त आहे.

**शिक्षण**

(22) 1962-63 ते 1981-82 या कालावधीत शिक्षणावर होणाऱ्या खर्चातील वाढ ही चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या बाबतीत सर्वात जास्त आहे तर शिक्षणावर होणाऱ्या प्रती-व्यक्ती खर्चातील वाढ ही भंडारा जिल्हा परिषदेच्या बाबतीत सर्वात जास्त आहे.

प्राथमिक शाळांचा विकास-दर हा चंद्रपूर जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त तर अमरावती व वर्धा जिल्हा परिषदेसाठी सरासरीपेक्षा जास्त आहे.

प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या नोंदणीचा विकास दर हा सुध्दा चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या बाबतीत सर्वात जास्त तर अकोला, अमरावती व बुलढाणा ह्या जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त आहे.

**बांधकाम व दळणवळण**

(23) 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली बांधकाम आणि दळणवळणावर होणाऱ्या खर्चातील वाढ ही चंद्रपूर जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त आहे तर अकोला, नागपूर आणि वर्धा जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त आहे.

बांधकाम आणि दळणवळणावर होणाऱ्या दरडोई खर्चातील वाढीबाबत हीच स्थिती आहे.

बांधकाम आणि दळणवळणावर होणाऱ्या खर्चाचा विकास-दर हा चंद्रपूर जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त आहे तर अकोला, बुलढाणा आणि नागपूर जिल्हा परिषदेसाठी सरासरीपेक्षा जास्त आहे.

**जलसिंचन**

(24) 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली जलसिंचनावर होणाऱ्या खर्चातील वाढ ही वर्धा जिल्हा परिषदेच्या बाबतीत सर्वात जास्त होती तर भंडारा व चंद्रपूर जिल्हा परिषद वगळता विदर्भातील उर्वरित जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त होती.

जलसिंचनावर होणाऱ्या खर्चाचा विकास-दर हा नागपूर जिल्हा परिषदेच्या बाबतीत सर्वात जास्त होता तर अमरावती व यवतमाळ जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त होता.

प्रत्यक्ष जलसिंचनाचा विकास-दर हा यवतमाळ जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त तर अकोला, अमरावती व बुलढाणा जिल्हा परिषदांच्या बाबतीत धनात्मक होता.

**वैद्यकीय सेवा + आयुर्वेद + सार्वजनिक आरोग्य**

**सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी**

(25) 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली वरील चारही बाबींवर होणाऱ्या संयुक्त खर्चातील वाढ ही चंद्रपूर जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त होती तर यवतमाळ व नागपूर जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त होती.

ही तथ्ये ' सामाजिक सेवा उपलब्ध करून देताना प्रामुख्याने मागासलेल्या आणि आदिवासी भागाला प्राधान्य दिले जाते ' ह्या परिकल्पनेचे समर्थन करतात.

वैद्यकीय सेवांवर होणाऱ्या खर्चाचा विकास-दर आणि आयुर्वेदावर होणाऱ्या खर्चाचा विकास-दर अमरावती जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त आहे.

सार्वजनिक आरोग्यावर होणाऱ्या खर्चाचा विकास-दर, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकीवर होणाऱ्या खर्चाचा विकास-दर आणि सार्वजनिक आरोग्य केंद्रावर होणाऱ्या खर्चाचा विकास-दर लक्षात घेता चंद्रपूर जिल्हा परिषद सर्वात आघाडीवर आहे.

**कृषी व पशुसंवर्धन**

(26) 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली शेती व पशुसंवर्धनावर होणाऱ्या खर्चातील वाढ ही यवतमाळ जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त तर भंडारा व वर्धा जिल्हा परिषद सोडून विदर्भातील इतर जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त आहे.

शेतीवर होणाऱ्या खर्चाचा विकास-दर हा अकोला जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त तर यवतमाळ व नागपूर जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त आहे.

सुधारित बी-बियाणे गुणन कार्यक्रम ह्या योजनेअंतर्गत बियाण्यांच्या वितरणाचा विकास-दर हा नागपूर जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त आहे.

सखोल लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्राचा विकास-दर हा अकोला जिल्हा परिषदेसाठी सर्वाधिक आहे.

पशुवैद्यकीय संस्थांचा विकास-दर हा अमरावती जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त आहे.

पशुंची प्रतिबंधक लस टोचणी, पशुचिकित्सा आणि पशुखच्चीकरण ह्या सर्वांचे विकास-दर चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या बाबतीत विदर्भात सर्वात जास्त आहेत.

**समाजकल्याण**

(27) 1962-63 च्या तुलनेने 1981-82 साली समाजकल्याण आणि सामुदायिक विकास यावर होणाऱ्या खर्चातील वाढ ही नागपूर जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त होती.

समाजकल्याणावर होणाऱ्या खर्चाचा विकास दर हा यवतमाळ जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त तर अकोला आणि नागपूर जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त होता.

मागासवर्गीयांसाठी उपलब्ध शैक्षणिक सवलतींच्या लाभार्थींचा विकास-दर हा भंडारा जिल्हा परिषदेसाठी सर्वात जास्त तर बुलढाणा, नागपूर आणि चंद्रपूर जिल्हा परिषदांसाठी सरासरीपेक्षा जास्त होता.

यावरून हे स्पष्ट होते की, बांधकाम व दळणवळण, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी, पशुसंवर्धन ह्यावर होणाऱ्या खर्चाच्या बाबतीत चंद्रपूर जिल्हा परिषद आघाडीवर होती. त्याचप्रमाणे नागपूर जिल्हा परिषद जलसिंचनाच्या बाबतीत, अकोला जिल्हा परिषद, कृषीवरील खर्चाच्या बाबतीत, अमरावती जिल्हा परिषद वैद्यकीय सेवा व आयुर्वेदावरील खर्चाच्या बाबतीत, आणि भंडारा जिल्हा परिषद शिक्षणावरील खर्चाच्या बाबतीत आघाडीवर होती.

जिल्हा परिषदांची स्वायत्तता व कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने खालील सूचना करण्यात आल्या आहेत -

**(1) जिल्हा परिषदांमध्ये नियोजन व मूल्यमापन कक्ष स्थापन करण्यात यावा.**

यामुळे लोकांच्या विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची अंमलबजावणी योग्य पध्दतीने व योग्य वेळात होईल व ह्या योजनांचा लोकांना पुरेपूर फायदा मिळेल.

**(2) जिल्हा परिषदांनी कमाल मर्यादेपर्यंत स्थानिक उपकर लावायला पाहिजे.**

कारण यावर 100 % स्थानिक उपकर समानीकरण अनुदान मिळते. हा सर्व पैसा शेवटी स्थानिक लोकांच्या विकासावरच खर्च करावयाचा असतो. त्यामुळे ग्रामीण जनतेवरील बोजा स्थानिक उपकरात वाढ केल्यामुळे वाढेल' ह्या सबबीखाली जिल्हा परिषदांच्या निर्वाचित सदस्य आणि पदाधिकाऱ्यांनी स्थानिक उपकर वाढीला विरोध करायला नको.

**(3) जिल्हा परिषदांचे पदाधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात यावी.**

यामुळे पदाधिकारी व कर्मचारी यांच्यातील योजनेचा उद्देश, अंमलबजावणी या संदर्भात गैरसमज निर्माण होणार नाहीत. योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल आणि जिल्हा परिषदांची कार्यक्षमता आणि स्थानिक विकासाची गती वाढेल.

**(4) 'महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद समन्वय समिती' ची स्थापना करायला पाहिजे.**

यामुळे जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना आपल्या विकासात्मक अनुभवांचे आदानप्रदान करता येईल. राज्य सरकारशी सुसंवाद साधता येईल आणि विकासासंबंधी, कार्यपध्दती सुधारण्यासंबंधी काही सामान्य निकष निर्माण करता येतील. याचा परिणाम जिल्हा परिषदांची कार्यक्षमता वाढण्यात होईल.

**(5) जिल्हा परिषदांना अधिक स्वायत्त बनविण्याच्या दृष्टीने 'राज्य वित्त निगमाची स्थापना' करण्यात यावी.**

विविध समित्यांनी वेळोवेळी सुचवूनसुध्दा जिल्हा परिषदांना उत्पन्नाची साधने सुपूर्द केली गेली नाहीत त्यामुळे जिल्हा परिषदा आणि जिल्हा परिषदांचे वित्त हे राज्य वित्ताचे उपांग ठरलेले दिसते. म्हणून जिल्हा परिषदांना स्वायत्त बनविण्याच्या दृष्टीने राज्य वित्त निगमाची स्थापना करण्यात यावी अशी सूचना पाटील समितीने सुध्दा केली होती. आम्ही या सूचनेचे मनापासून समर्थन करतो.

ह्या विविध मार्गांद्वारा जिल्हा परिषद राज्य सरकार वित्तीय संबंध सुधारून विदर्भात कुंठित झालेल्या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेला चालना द्यायला पाहिजे, जेणेकरून लोकांच्या प्रेरणेतून आणि सहभागातून स्थानिक विकास हे लोकशाही विकेंद्रीकरणाचे उद्दिष्ट साध्य होईल.

০০০

# एम्. फिल.
# प्रबंधांचा सारांश

## कृषी विपणनाची कार्यक्षमता: विश्लेषण व चाचणी*

मुक्ता दि. जहागिरदार **

**प्रस्तावना -**

प्रस्तुत शोधनिबंधात कृषी विपणनाच्या कार्यक्षमतेबाबत अध्ययन करण्यात आलेले आहे. त्यासाठी 'अ' विभागात कार्यक्षमतेच्या काही निकषांचे तात्त्विक विवेचन केलेले आहे. त्या निकषांपैकी किंमतफैलाव या निकषाच्या आधारावर गव्हाचे विपणन कार्यक्षम आहे की नाही याचा बाजारातून प्राप्त सांख्यिकीय माहितीच्या आधारे पडताळा घेण्याचा 'ब' विभागात केला आहे.

### विभाग 'अ'

### विपणनाची कार्यक्षमता : संकल्पना व निकष

**कृषी विकासाची कृषी विपणनावरील निर्भरता:**

व्यावसायिक वर्गीकरणात प्राथमिक, व्दितीय आणि तृतीय क्षेत्र असे तीन गट पाडले जातात. कृषी हा प्राथमिक क्षेत्रातील व्यवसाय. प्राथमिक क्षेत्रातील व्यवसाय माणसाच्या प्राथमिक व मूलभूत गरजा भागविण्याचे काम करतात आणि मानवी विकासाच्या प्राथमिक अवस्थेपासून ते अस्तित्वात आहेत. मानवाच्या प्राथमिक गरजा भागविणारा उद्योग यातच कृषीचे महत्त्व ग्रथित झालेले आहे. एवढेच नव्हे तर आर्थिक विकासाच्या संदर्भात सुध्दा विकसनशील, कृषिप्रधान व वेगाने लोकसंख्या वाढत जाणाऱ्या भारतासारख्या देशांच्या दृष्टीने आर्थिक विकासासाठी कृषी क्षेत्राचा विकास ही एक अपरिहार्य अट ठरते.

कृषी विकास हा कृषी उत्पादन व उत्पादकतेतील वाढीवरून मोजला जातो. त्यासाठी दोन अटी पूर्ण व्हाव्या लागतील. (1) उत्पादन वाढीसाठी आवश्यक आदानांची पर्याप्त उपलब्धता (2) उत्पादनाचा योग्य मोबदला मिळवून देणारी विपणन व्यवस्था.

उत्पादनवाढीसाठी उपलब्ध सुविधांचा वापर करून उत्पादन

* श्रीमती जहागिरदार यांचा सदर प्रबंध अमरावती विद्यापीठाने एम्. फिल्. पदवीसाठी 1985 साली स्वीकृत केला. त्यांना प्रा. आर. बी. यावले, श्री. शिवाजी महाविद्यालय अमरावती यांचे मार्गदर्शन लाभले.

** अधिव्याख्याता, विदर्भ महाविद्यालय, अमरावती.

वाढवावे असे शेतकऱ्यांना स्वतःला मनापासून वाटले, तरच त्यांचा पुरेपूर वापर होऊन उत्पादनवाढीची निष्पत्ती स्थायी स्वरूपात प्राप्त होऊ शकेल. म्हणजे उत्पादनवाढीची प्रेरणा कृषकाला मिळायला हवी. कृषकाला त्याच्या उत्पादनासाठी योग्य व लाभकारक मोबदला प्राप्त झाला तरच ही प्रेरणा त्याला मिळू शकेल आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक आदनांचा वापर करण्याची क्षमता निर्माण होईल अथवा वाढेल.

बाजारात उत्पादनासाठी दिली जाणारी किंमत योग्य असली तरी कृषक आपले संपूर्ण उत्पादन प्रत्यक्ष उपभोक्त्याला विकत नसल्यामुळे उपभोक्त्याने दिलेली संपूर्ण किंमत उत्पादकाला मिळत नाही. एकूण किंमतीतील कृषकाला मिळणारा वाटा विपणनव्यवस्थेच्या माध्यमातून पोहोचवला जात असल्याने तो विपणनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहील. कार्यक्षम विपणनव्यवस्थाच उत्पादकाला त्याच्या योग्य व न्याय्य वाटा मिळवून देऊन उत्पादनवाढीसाठी प्रेरित करेल. सारांश आर्थिक विकासासाठी आवश्यक असा कृषिविकास कार्यक्षम विपणनव्यवस्थेवर अवलंबून असल्याचा निष्कर्ष प्राप्त होतो.

**विपणन संकल्पना**

उत्पादन आणि विनिमय हे विपणनाचे दोन पैलू मानले जातात. कृषीच्या संदर्भात शेतात पिके तयार झाली की उत्पादनाची प्रक्रिया संपली असे मानले जाते. विनिमय प्रक्रियेच्या प्रारंभी उत्पादन शेतकऱ्याच्या मालकीचे असते तर या प्रक्रियेच्या अंती ते हजारो उपभोक्त्यांच्या मालकीचे बनते. कृषक आणि उपभोक्ते यांच्या दरम्यान उत्पादनाच्या स्वामित्वात अनेकदा बदल घडून येतो.

काही अभ्यासकांच्या मते विपणन ही खरेदी-विक्री प्रक्रिया आहे म्हणून विपणन हे खरेदी विक्रीच्या प्रक्रियांपुरते मर्यादित असावे. उत्पादनप्रक्रियांचा विपणनात समावेश होऊ नये, परिवहन संग्रहण इ. सारख्या स्थान समयादि उपभोग्यतांची निर्मिती करणाऱ्या क्रिया विपणनात अंतर्भूत व्हाव्यात परंतु प्रक्रिया करणासारखी रूप उपभोग्यता निर्माण करणाऱ्या प्रक्रिया विपणनातून वगळाव्यात. काहींच्या मते विनिमयात स्वामित्व बदल घडून येतो आणि स्वामित्व उपयोगिता ही समय, स्थान, रूप इ. उपभोग्यतांबरोबरच वर्णिलेली आहे. ती स्वतंत्रपणे व वेगळ्या संदर्भात वर्णित नाही म्हणून उत्पादनाच्या संकल्पनेतच विनिमयाची प्रक्रिया समाविष्ट आहे असे म्हणणे योग्य ठरेल.

वस्तुतः अर्थशास्त्रात उत्पादनाला 'उपभोग्यतांची निर्मिती' या रूपात परिभाषित केले जाते. त्यामुळे कुठल्याही प्रकारच्या उपभोग्यतांची निर्मिती करणाऱ्या क्रिया या उत्पादनच म्हणवल्या जातील. परिवहन, संग्रहण, प्रक्रियाकरण या क्रिया स्थान, समय, रूप इ. उपभोग्यतांची निर्मिती करतात. परंतु त्या विनिमयाच्या प्रक्रियेत अनिवार्य असल्याने विपणनात अंतर्भूत केल्या जातात. यावरून असे म्हणावे लागेल की उत्पादन आणि विनिमय हे पैलू परस्परांशी निकटपणे निगडित आहेत. विपणन ही उत्पादक व उपभोक्ते यांना एकत्रित आणणारी प्रक्रिया मानली जाते. त्यामुळे विपणनात सर्व प्रकारच्या प्रक्रिया मग त्या कुठल्याही प्रकारच्या उपभोग्यतांची निर्मिती करणाऱ्या असोत जर त्या विनिमयाशी म्हणजे उत्पादन उत्पादकाकडून उपभोक्त्याकडे हस्तांतरित होण्याशी संबद्ध असतील तर विपणनात अंतर्भूत होतील.

**विपणनाची कार्यक्षमता**

विपणन ही उत्पादक व उपभोक्ते यांना एकत्रित आणणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे विपणनाच्या कार्यक्षमतेचा संबंध उत्पादक, उपभोक्ते व त्यांना एकत्रित आणणाऱ्या मध्यस्थ व्यक्तिंशी येतो. विपणनव्यवस्था कार्यक्षम असेल तरच ती या सर्व संबंधित पक्षांना लाभकारक ठरू शकेल. कोल्स आणि अऊन्यू, जसदानवाला, अनन्तनारायण, प्रो. वॉग इ. नी विपणन कार्यक्षमतेच्या केलेल्या परिभाषांच्या आशयानुसार कार्यक्षम विपणनव्यवस्था म्हणजे अशी विपणनव्यवस्था की जी उत्पादकाला अधिकतम लाभप्राप्त करून देते. या व्यवस्थेच्या अंतर्गत उपभोक्त्याला करावा लागणारा त्याग आणि विपणनसेवांवर होणारा व्यय न्यूनतम असतो.

कार्यक्षमतेच्या आशयानुसार उत्पादकाला अधिकतम उत्पन्न प्राप्त व्हावे याचा अर्थ अधिक किमतीव्दारे ग्राहकाचे शोषण किंवा मध्यस्थांनी दिलेल्या सेवांचा वाजवीपेक्षा कमी मोबदला नाही. तर मध्यस्थांनी अकारण अतिरिक्त मोबदला आकारू नये असे अभिप्रेत आहे. वाजवी मोबदल्याअभावी मध्यस्थांच्या सेवाच उपलब्ध होणार नाही. उपभोक्त्यांसाठी न्यूनतम त्यागात वाजवीपेक्षा कमी किंमती अभिप्रेत नाही. त्या योग्य असल्यास योग्य किंमती म्हणजे त्या प्रकारच्या उत्पादनाचा प्रवाह बाजारात सातत्याने येत राहावा यासाठी आवश्यक असलेल्या किंमती होय. कमी किमतीमुळे उत्पादन निरुत्साहित होऊन घटेल व उपभोक्त्याचे नुकसान होईल. सारांश कार्यक्षम विपणनात विपणनाशी संबद्ध कुठल्याच पक्षाचे उद्दिष्ट दुसऱ्यावर अन्याय करून वा त्याचे शोषण करून साध्य होणार नाही. प्रत्येकाच्या हितसंबंधाचे संरक्षण मात्र त्यातून होते.

**कार्यक्षम विपणनाचे निकष**

विपणनव्यवस्था कार्यक्षम आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी अभ्यासकांनी सांगितलेल्या तीन निकषांचे विवेचन करू -

**(1) विपणनाची कार्यक्षमता व किंमतफैलाव -**

अंतिम उपभोक्त्याने दिलेली किंमत व उत्पादकाला प्राप्त झालेली किंमत यातील अंतराला किंमतफैलाव (price spread) असे म्हणतात. वस्तूच्या उत्पादनस्थानापासून ती वस्तू अंतिम

उपभोक्त्यापर्यंत पोहोचवण्यासाठी केली जाणारी व्ययराशी म्हणजे उत्पादनव्यय होय. या कार्यात सहाय्यक व्यक्ती वा संस्था म्हणजे मध्यस्थांनी केलेल्या कार्यासाठी वा विपणनसेवांसाठी दिलेला मोबदला उपभोक्त्याने दिलेल्या एकूण किमतीत अंतर्भूत असतो. तो मध्यस्थांनी घेतल्यामुळे किंमतफैलाव निर्माण होतो. अधिक विपणनव्ययामुळे ग्राहकाचा त्याग वाढतो तसेच एकूण किंमतीतील उत्पादकाचा वाटा घटतो. म्हणजे उत्पादनाचा निर्माता व ज्याच्यासाठी उत्पादन तो उपभोक्ता दोघांचीही अधिक किंमतफैलावामुळे हानी होते म्हणून जास्त किंमतफैलाव हा सामान्यत: विपणनाच्या अकार्यक्षमतेचा द्योतक मानला जातो.

तथापि कृषी उत्पादन बहुतांश हंगामी नाशवान आणि देशात सर्वत्र विखुरलेल्या शेतकऱ्यांनी निर्माण केलेले असल्यामुळे ते अंतिम उपभोक्त्याला विकणे उत्पादकाला शक्य नाही. शिवाय कृषी उत्पादन उपभोक्त्यांना हव्या असलेल्या वेळी, स्थानी आणि हव्या असलेल्या स्वरूपातच निर्माण होते असेही नाही. ही कार्ये मध्यस्थ करीत असल्यामुळे त्यांचे कार्य व मोबदला समर्थनीय ठरतो. याचा अर्थ विपणनप्रक्रियेत किंमत फैलाव अपरिहार्य आहे असे म्हणता येईल. बरे मध्यस्थांची कार्ये स्वत:च करून कृषक उत्पादन उपभोक्त्याला विकेल तर अशा स्थितीत उत्पादकाचा अंतिम किंमतीतील हिस्सा कार्यक्षमतेचा निदर्शक ठरण्यापेक्षा उत्पादकाचे उत्पादनाबरोबर विपणनावर किती लक्ष केंद्रित झाले याचा दर्शक ठरेल.

मध्यस्थ केवळ उत्पादक व उपभोक्ते यांच्यात संबंध प्रस्थापित करीत नाहीत तर उपभोक्त्याला हव्या असलेल्या अनेक विपणन सेवाही उपलब्ध करून देतात म्हणून किंमतफैलावाचा निरपेक्षपणे - विपणनसेवांचा विचार न करता अकार्यक्षमतेचा निदर्शक म्हणून निर्देश अयोग्य ठरतो. एफ. व्ही. वॉग आणि ए. सी. हॉफमन यांनी अधिक किंमतफैलाव म्हणजे वाढती अकार्यक्षमता असा सरळ सरळ संबंध प्रस्थापित करणे योग्य ठरणार नाही असे याच अर्थाने म्हटले आहे. जास्त किंमतफैलाव हा जास्तीच्या व अधिक चांगल्या विपणनसेवांचा परिणाम असेल, तो विपणन सेवांच्या वाजवी मोबदल्याएवढा असेल तर एकूण किंमतफैलाव जास्त असूनही विपणनव्यवस्थेच्या अकार्यक्षमतेचा द्योतक असणार नाही. जास्तीच्या विपणनसेवा न देता त्याच सेवांसाठी अतिरिक्त मोबदला आकारल्यामुळे किंमतफैलाव वाढला असेल किंवा मध्यस्थांच्या अवाजवी संख्यावाढीमुळे त्यात भर पडलेली असेल तर मात्र तो किंमतफैलाव विपणनव्यवस्थेच्या अकार्यक्षमतेचा द्योतक ठरेल हे नि:संशय.

सामाजिक दृष्टिकोनातून विशिष्ट विपणनकार्यासाठी आवश्यक श्रम भांडवलाच्या मात्रांच्या माध्यमातून विपणनव्यवस्थेची कार्यक्षमता मोजता येत. वाजवीपेक्षा जास्त मात्रा वापरल्या म्हणून निर्मित किंमतफैलाव अकार्यक्षमतेचा निदर्शक ठरेल तसेच ज्या विपणनव्ययाव्दारे नवीन मागणीची निर्मिती, अधिक एकूण विक्री घटता उत्पादनव्यय इ. हेतू साध्य होत असतील तर त्यामुळे सामाजिकदृष्ट्या आवश्यक व उपयुक्त हेतू साध्य होत असल्याने तो वाजवी विपणनव्यय ठरेल. परंतु ज्या विपणनव्ययाव्दारे एकूण मागणी तीच राहून केवळ एका पेढीकडील मागणी दुसऱ्या पेढीकडे वळवली जात असेल तर शुध्द सामाजिक प्राप्ती शून्य राहील. तो व्यय अकार्यक्षमतेचा द्योतक ठरेल.

**(2) कार्यक्षमता आणि कल्याण -**

प्रो. ब्रेसलर यांनी कार्यक्षमता आणि कल्याण यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. वाढीव कल्याण कार्यक्षमतेचे निदर्शक मानला आहे. त्यांच्या मते कार्यक्षमता वाढली याचा अर्थ पूर्वीच्याच संसाधनांपासुन पूर्वीपेक्षा जास्त वस्तू आणि सेवांचे उत्पादन होते किंवा पूर्वीएवढ्या उत्पादनासाठी पूर्वीपेक्षा कमी संसाधने लागतील. विपणनाच्या संदर्भात असे म्हणता येईल की पूर्वीएवढ्या संसाधनांव्दारे अथवा विपणनव्ययाव्दारे पूर्वीपेक्षा अधिक विपणनकार्ये होतील किंवा पूर्वीएवढ्या विपणनकार्यासाठी पूर्वीपेक्षा कमी संसाधने लागतील. याचा परिणाम विपणनव्यय घटण्यात होईल. त्यामुळे ग्राहकाला कमी त्यागात पूर्वीएवढ्या वस्तू व सेवा प्राप्त होतील. उत्पादकाला पूर्वीपेक्षा अधिक वाटा प्राप्त होईल. परिणामत: उत्पादक व उपभोक्त्यांच्या वास्तविक उत्पन्नात अथवा उपभोगात वाढ होईल. उपभोगातील वाढ आणि त्याव्दारा प्राप्त झालेले वाढीव समाधान म्हणजे आर्थिक कल्याणातील वाढ होय. वाढत्या कार्यक्षमतेची परिणती अशा प्रकारे वाढत्या कल्याणात होईल. वाढत्या कल्याणाला परिणाम पुन्हा कार्यक्षमता वाढण्यात होऊ शकतो. आहार आणि आरोग्य, शिक्षणादि सुविधांच्या अधिक व सुधारित उपभोगामुळे उत्पादकता व कार्यक्षमता वाढते. परिवहन, दळणवळणादि सोईमुळे अन्यत्र उपलब्ध सुविधा, वस्तू, सेवा, ज्ञान इ. ची उपलब्धता शक्य होऊन संबंधित व्यक्तींचीच नव्हे तर व्यवस्थेची सुध्दा कार्यक्षमता वाढते. एकूण कार्यक्षमता व कल्याण परस्परपोषक वा परस्परसंवर्धक असल्याचे आढळून येते.

**(3) विपणनाची कार्यक्षमता आणि कृषी उत्पादन**

विपणनाची कार्यक्षमता कृषी उत्पादनावर होणाऱ्या विशिष्ट परिणामांच्या माध्यमातूनही अभिव्यक्त होत असते. कृषी उत्पादनाच्या संदर्भात कार्यक्षम विपणनव्यवस्था दोन व्यापक उद्दिष्टे साध्य करू शकते. ती कितपत साध्य झालीत यावरूनही विपणनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करता येईल.

**(अ) कृषी उत्पादनाच्या उपभोग्यतेत वृध्दी -**

उत्पादक ते उपभोक्त्याच्या दरम्यान कार्यक्षम विपणनव्यवस्था विपणनाच्या अंतर्गत येणाऱ्या प्रक्रिया, परिवहन, संग्रहण इ.

क्रियांच्या माध्यमातून मूळ कृषी उत्पादनात रूप, स्थान, समय इ. प्रकारच्या उपभोग्यतेत वाढ होते. कृषी उत्पादनात असलेल्या उपभोग्यतेत होणारी ही विविधांगी वाढ विपणनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेची द्योतक ठरते.

**(ब) उत्पन्न संसाधनांच्या वापराबाबत मार्गदर्शन**

विपणनव्यवस्था विनिमयाच्या विभिन्न यंत्रणांव्दारे कृषीक्षेत्रातून प्राप्त उत्पादन ग्राहकांमध्ये वितरीत करते तर ग्राहकांकडून किंमतीच्या स्वरूपात प्राप्त प्रतिफल वा मोबदला उत्पन्नाच्या स्वरूपात मध्यस्थ व उत्पादकांमध्ये वाढते. अशाप्रकारे प्राप्तीचे जे वाटप विपणनव्यवस्थेव्दारे केले जाते त्या वाटपाच्या माध्यमातून संसाधनांच्या उपयोग वा वापराबाबत उपभोक्त्यांचे पसंतीक्रम प्रतिबिंबित होत असतील तर विपणनव्यवस्था कार्यक्षम असल्याचे सिध्द होते.

उत्पादनासाठी अशा प्रकारच्या किंमती प्राप्त व्हाव्यात की त्याव्दारे उपभोक्त्यांना ते उत्पादन हवे का? त्याचा कोणता प्रकार किती परिमाणात हवा याबाबत योग्य, निश्चित स्वरूपाचे वा अचूक मार्गदर्शन प्राप्त होईल. नियोजनाचा स्वीकार केलेल्या अर्थव्यवस्थांना अशा प्रकारच्या कार्यक्षम विपणनाव्दारे उत्पादनसंसाधनांच्या विभिन्न क्षेत्रात व उपयोगात करावयाच्या वाटपाबाबत मार्गदर्शन प्राप्त होऊ शकते.

विपणनाच्या कार्यक्षमतेचे वरील तीन निकष लक्षात घेता किंमतफैलावाचा निकष अधिक मूलभूत स्वरूपाचा वाटतो. कारण किंमतफैलाव जास्त असेल तर उत्पादकाचा वाटा घटून व उपभोक्त्याचा त्याग वाढून त्यांच्या कल्याणात वृध्दी होऊ शकणार नाही. तसेच उत्पादनासाठी प्राप्त ग्राहकांची पसंती दर्शक किंमत मध्यस्थांनीच शोषून घेतली तर उत्पादकांना प्राप्त किंमतीव्दारे मार्गदर्शन प्राप्त होणे अशक्य ठरेल. यादृष्टीने किंमतफैलावाचा निकष अधिक महत्त्वाचा ठरतो. तो मापनासाठीही सोईस्कर आहे म्हणून या निकषाच्या आधारावर बाजारातून प्राप्त सांख्यिकीय माहितीच्या आधारे प्रामुख्याने अन्य प्रांतातून बोलावल्या जाणाऱ्या गव्हाचे विपणन कार्यक्षम आहे किंवा नाही याचे विवेचन करू.

## विभाग 'ब'

## किंमतफैलाव : पाहणी व विश्लेषण

**संशोधन पध्दती -**

किंमतफैलावाच्या अध्ययनासाठी अमरावती महानगर-पालिकेचे परिक्षेत्र निवडले आहे. अमरावती महानगरपालिका ही 1 मे 1983 रोजी स्थापन झाली असून तिच्या अंतर्गत अमरावती व बडनेरा शहर आणि काही खेड्यांचा समावेश होतो. तिचे क्षेत्रफळ 98.72 चौरस किलोमीटर असून 1981 च्या आकडेवारीनुसार लोकसंख्या 3,24251 आहे. अमरावती हे विदर्भातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर असून तेथे विभागीय कार्यालय आहे. अमरावती हे शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेले शहर असून तेथे अमरावती विद्यापीठ 1 मे 1983 रोजी स्थापन झालेले आहे. अमरावतीला धान्य, कापूस, कापड इ. ची मोठी बाजारपेठ आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या क्षेत्रात गव्हाचा ठोक व्यापार करणारे 20 व्यापारी आहेत. विपणनसाखळी व विपणनव्ययासंबंधी माहिती गोळा करण्यासाठी यापैकी सप्रयोजन नमुना निवड पध्दतीनुसार गव्हाच्या 8 ठोक व्यापाऱ्यांकडून प्रत्यक्ष जाऊन मुलाखत पध्दतीने माहिती गोळा केली. सर्व आकडेवारी मार्च 1985 मध्ये गोळा करण्यात आलेली आहे. तसेच पंजाब, मध्य प्रदेश, गुजरात येथील अर्थात उत्पादनक्षेत्रातील गव्हाचे भाव व विपणनव्यवहारांची माहिती अमरावती येथील ठोक व्यापाऱ्यांशी व वाहतूक व्यवसायीशी चर्चा करून प्राप्त करण्यात आलेली आहे.

अमरावती महानगरपालिकेतील चिल्लर व्यापाऱ्यांनी कोणत्या किंमतीला गव्हाची विक्री केली व त्यांना कोणता व किती विपणनव्यय करावा लागला इ. बाबतची माहिती किरकोळ व्यापाऱ्यांकडून प्राप्त केली. अमरावती महानगरपालिकेत 60 वॉर्डस् आहेत. वॉर्डस्ची रचना अभ्यासता असे लक्षात आले की 15 वॉर्डस् अमरावती शहराच्या सीमेवर आहेत, 40 वॉर्डस् शहराच्या अंतर्गत भागात असून 5 वॉर्डस् बडनेरात आहे. या विभिन्न प्रकारांमध्ये सीमेवरील 15 पैकी 5 म्हणजे 33 % अंतर्गत भागातील 40 पैकी 8 म्हणजे 20% आणि बडनेऱ्यातील 5 पैकी 2 म्हणजे 40% अशा प्रकारे 15 म्हणजे, एकूण 60 वॉर्डस्च्या 25% वॉर्डस् लॉटरी पध्दतीव्दारे ऐच्छिक पध्दतीने निवडले. या 15 वॉर्डस्मधील एकूण 45 किरकोळ व्यापाऱ्यांची निवड सप्रयोजन नमूना निवड पध्दतीच्या आधारे केली. अभ्यासासाठी पंजाबचा कल्याणसोना, गुजराथचा लोकवन आणि मध्य प्रदेशचा नर्मदा ह्या गव्हाच्या जाती घेतल्या.

**गव्हाच्या किंमतफैलावाचे अध्ययन -**

महाराष्ट्रात गव्हाच्या एकूण उत्पादनाच्या तुलनेत एकूण उपयोग फार जास्त असल्याने पंजाब, हरियाणा, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश इ. प्रांतांमधून गहू बोलावला जातो. विपणनाच्या कार्यक्षमतेच्या संदर्भात किंमतफैलावाचे विश्लेषण करण्यासाठी गहू विपणनाशी संबंधित उत्पादनक्षेत्र ते अमरावतीचा ग्राहक अशी संपूर्ण विपणनसाखळी व सर्व प्रकारचा विपणनव्यय विचारात घेतला आहे. अर्थात लक्षात ठेवण्याची महत्त्वाची गोष्ट अशी की उत्पादक शेतकऱ्याला मिळणारी किंमत कमी की जास्त याचा विचार प्रस्तुत अध्ययनाशी संबंधित नाही तर एकूण किंमतीत कृषकाचा वाटा व विपणनक्रियेशी संबंधित अन्य घटकांचा वाटा किती आहे आणि तो वाजवी आहे की नाही या संबंधीचे विवेचन आपल्याला अभिप्रेत आहे.

खालील तक्त्यात गव्हाच्या किंमतफैलावाचे संपूर्ण विवरण दिले आहे. विपणनव्ययाचे सर्व आकडे 1 क्विंटलवर येणाऱ्या व्ययाचे आहेत, तसेच ते सरासरी आकडे आहेत.

**तक्ता क्र. 1**

**गव्हाच्या किंमतफैलावाचे विवरण**

| विपणनाचे किंमत/व्यय घटक | गव्हाचा प्रकार | | |
|---|---|---|---|
| | लोकवन | कल्याण सोना | नर्मदा |
| | रुपये | रुपये | रुपये |
| (1) | (2) | (3) | (4) |
| अ) गव्हाची प्राथमिक बाजारातील किंमत | 184.60 | 153.20 | 170.00 |
| ब) प्राथमिक बाजारात कृषकाला द्यावे लागणारे आकार - | | | |
| 1) हमाली भराई इ. | 0.80 | 0.80 | 0.80 |
| 2) अडत | 2.40 | 2.00 | 2.20 |
| एकूण | 3.20 | 2.80 | 3.00 |
| क) कृषकाला प्राप्त किंमत अ-ब | 181.40 | 150.40 | 167.00 |
| ड) प्राथमिक बाजारात ठोक व्यापाराला द्यावे लागणारे आकार- | | | |
| 1) पाला, कटाई, हमाली, भराई इ. | 1.40 | 1.40 | 1.40 |
| 2) परिवहन व्यय | 2.50 | 2.50 | 2.50 |
| एकूण | 3.90 | 3.90 | 3.90 |
| इ) उत्पादन क्षेत्रातील (प्राथमिक बाजार) ठोक व्यापाऱ्याला पडलेली किंमत (अ+ड) किंवा (ब+क+ड) | 188.50 | 157.10 | 173.90 |
| फ) अमरावती महानगरपालिकेच्या क्षेत्रातील ठोक व्यापाऱ्याला उत्पादन क्षेत्रातल्या ठोक बाजारात द्यावे लागणारे आकार- | | | |
| 1) उत्पादन क्षेत्रातल्या ठोक व्यापाऱ्याच्या कार्याचा मोबदला | | | |
| 2) बारदान | 2.60 | 2.25 | 2.45 |
| 3) विक्रीकर | 8.00 | 8.00 | 8.00 |
| 4) बाजारसेस | - | 7.20 | - |
| 5) तुलाई ठेला, भराई, हमाली इ. | 1.35 | 1.20 | 1.25 |
| 6) दलाली | 2.00 | 2.00 | 2.00 |
| | 2.55 | 2.25 | 2.40 |
| एकूण | 16.50 | 22.90 | 16.10 |
| ग) उत्पादनक्षेत्रातल्या ठोक व्यापाऱ्याची विक्री किंमत अथवा अमरावती महानगरपालिकेतील ठोक व्यापाऱ्यांची खरेदी किंमत (इ + फ) | 205.00 | 180.00 | 190.00 |
| घ) अमरावती महानगरपालिकेतील ठोक व्यापाऱ्याचे विविध आकार- | | | |
| 1) परिवहन व्यय (ट्रकभाडे उत्पादनक्षेत्र ते अमरावती महानरपालिका) | 28.00 | 30.00 | 16.00 |
| 2) नाका - ऑक्ट्रॉय | 0.60 | 0.60 | 0.60 |
| 3) हमाली | 1.00 | 1.00 | 1.00 |
| 4) अधिकोषण व अन्य किरकोळ खर्च | 0.50 | 0.50 | 0.50 |
| 5) मार्केट सेस (बाजार फी) | 1.60 | 1.40 | 1.40 |
| 6) वजन घट - तूट | 2.00 | 1.80 | 1.90 |
| 7) अमरावतीच्या ठोक व्यापाऱ्याच्या कार्याचा मोबदला | 3.65 | 3.30 | 3.25 |
| एकूण | 37.35 | 38.60 | 24.65 |
| इ) अमरावती महानगरपालिकेतील ठोक | | | |

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| व्यापाऱ्यांची विक्री किंमत अथवा अमरावती महानगर-पालिकेतील किरकोळ व्यापाऱ्याची खरेदी किंमत (ग + घ) | 242.35 | 218.60 | 214.65 |
| त) अमरावती महानगर-पालिकेतील किरकोळ व्यापाऱ्यांचे विविध आकार- | | | |
| 1) परिवहनव्यय | 3.00 | 3.00 | 3.00 |
| 2) वजनघट - तूट | 2.60 | 2.30 | 2.30 |
| 3) किरकोळ व्यापाऱ्याच्या कार्याचा मोबदला | 7.50 | 7.40 | 7.30 |
| एकूण | 13.10 | 12.70 | 12.60 |
| थ) अमरावती महानगर-पालिकेच्या किरकोळ व्यापाऱ्याची विक्री किंमत अथवा अमरावती महानगर-पालिकेतील उपभोक्त्याची खरेदी किंमत (र + त) | 255.45 | 231.30 | 227.25 |
| किंमतफैलाव (थ + क) | 74.05 | 80.90 | 60.25 |

लोकवन, कल्याणसोना व नर्मदा गव्हासाठी कृषकाला मिळालेली किंमत अनुक्रमे 181.40 रु. 150.40 रु. आणि 167.00 रु. आहे तर उपभोक्त्याला द्यावी लागलेली किंमत 255.45 रु., 231.30 आणि 227.25 रु. आहे. त्यामुळे किंमत-फैलाव लोकवनसाठी 74.05 रु. म्हणजे कृषक उत्पादकाला मिळणाऱ्या किंमतीच्या 40.82% आहे. कल्याणसोना गव्हासाठी किंमतफैलाव 80.00 रु. अर्थात उत्पादकाला प्राप्त किंमतीच्या 53.78% तर नर्मदा गव्हासाठी 60.25 रु. म्हणजे 36.07 % आहे. सर्वात जास्त किंमतफैलाव कल्याणसोना गव्हासाठी तर सर्वात कमी नर्मदा गव्हाबाबत आहे. अंतिम उपभोक्त्याने दिलेल्या किमतीत कृषकाचा वाटा लोकवनसाठी 71.01% कल्यासोनासाठी 65.02% तर नर्मदा गव्हासाठी 73.48% येतो.

**(अ) विपणनाच्या टप्प्यानुसार किंमतफैलाव**

वरील तक्त्यानुसार उत्पादक कृषकाकडून उत्पादन क्षेत्रातल्या अथवा प्राथमिक बाजारातील ठोक व्यापाऱ्याकडे गव्हाचे हस्तांतरण हा विपणनाचा पहिला टप्पा, उत्पादनक्षेत्रातल्या ठोक व्यापारी ते अमरावती महानगरपालिका परिक्षेत्रातील ठोक व्यापारी हा दुसरा, अमरावती परिक्षेत्रातील ठोक व्यापारी ते किरकोळ व्यापारी हा तिसरा आणि अमरावती परिक्षेत्रातील किरकोळ व्यापाऱ्याकडून अंतिम उपभोक्त्याकडे होणारे गव्हाचे हस्तांतरण हा विपणनाचा चौथा असे विपणनाचे एकूण चार टप्पे मानता येतील. प्रत्येक टप्प्यात कोणता विपणनव्यय, किती आणि कोणाला करावा लागतो याचे सविस्तर विवरण तक्त्यात आहे.

**(ब) विपणनव्यय घटकानुसार किंमत फैलाव**

विपणनव्ययाला कारणीभूत ठरलेल्या विविध घटकांच्या आधारावर किंमतफैलावाचे विश्लेषणकरता येईल. विपणनव्ययाच्या विभिन्न घटकांचे मध्यस्थांवरील व्यय, परिवहनव्यय, कर, तूट व अन्य घटक असे पाच वर्ग करून त्यांचे एकूण विपणनव्ययातील प्रमाणाचा विचार करू.

खालील तक्त्यात उपरोल्लेखित वर्गीकरणानुसार व्ययाची आकडेवारी आणि एकूण किंमतफैलावाशी प्रतिशत प्रमाण दाखविले आहेत. सर्व आकडे प्रती क्विंटल गव्हावर येणाऱ्या खर्चाचे आहेत.

तक्ता क्र. 2

**किंमतफैलावाचे घटकानुसार वर्गीकरण**

| गव्हाचा प्रकार | किंमतफैलावाचे घटक | | | | | एकूण किंमतफैलाव |
|---|---|---|---|---|---|---|
| | मध्यस्थांचा वाटा | परिवहनव्यय | कर | तूट | हमाली तुलाई बारदान इ. अन्य खर्च | |
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| लोकवन | 18.70<br>(25.25) | 33.50<br>(45.24) | 3.55<br>(4.80) | 4.60<br>(6.21) | 13.70<br>(18.50) | 74.05<br>(100) |
| कल्याणसोना | 17.20<br>(21.27) | 35.50<br>(43.88) | 10.40<br>(12.85) | 4.10<br>(5.07) | 13.70<br>(16.93) | 80.90<br>(100) |
| नर्मदा | 17.60<br>(29.21) | 21.50<br>(35.69) | 3.25<br>(5.39) | 4.20<br>6.97) | 13.70<br>(22.74 | 60.25<br>(100) |

(टीप : कंसातील आकडे प्रतिशत दर्शवितात)

(1) मध्यस्थ

गव्हाच्या विपणनातील उत्पादक कृषक ते अंतिम उपभोक्त्यापर्यंत मध्यस्थांची साखळी ही उत्पादक कृषक - अडत्या खरेदी क्षेत्रातील ठोक व्यापारी - दलाल - अमरावती महानगरपालिका परिक्षेत्रातील ठोक व्यापारी - किरकोळ व्यापारी - अंतिम उपभोक्ता याप्रकारे सांगता येईल. उत्पादनक्षेत्र दूर असल्याने मध्यस्थांची संख्या जास्त आहे.

उत्पादक कृषकाला अडत्यांमार्फत आपला माल ठोक व्यापाऱ्याला विकावा लागतो तर अमरावतीचा ठोक व्यापारी दलालाच्या मध्यस्थीने माल खरेदी करतो. अडते व दलाल आपल्या कामासाठी 1.25% तर प्राथमिक बाजारातील व अमरावती परिक्षेत्रातील ठोक व्यापारी आपल्या कार्यासाठी 1.5% मोबदला आकारतात. किरकोळ व्यापाऱ्यांनी आपल्या कार्यासाठी आकारलेला मोबदला सरासरी 298% आढळून आला.

(2) परिवहनव्यय -

एकूण परिवहनव्यय मोजण्यासाठी उत्पादनक्षेत्रातील बाजार ते उत्पादनक्षेत्रातील ठोक व्यापाऱ्याचे दुकान, उत्पादनक्षेत्रातील ठोक व्यापारी ते अमरावती महानगरपालिका परिक्षेत्रातील (ठोक व्यापारी ते किरकोळ व्यापाऱ्याचे दुकान आणि अमरावती परिक्षेत्रातील ठोक ) व्यापारी ते किरकोळ व्यापाऱ्याचे दुकान या दरम्यान झालेला परिवहनव्यय विचारात घेतला आहे.

गहू अमरावतीला आणण्यासाठी रेल्वेभाडे बरेच कमी उदा. लोकवनसाठी (18-00 रु. असूनही रेल्वेने गहू पोहोचवण्यासाठी) लागणारा विलंब (जवळपास 3 आठवडे ते 1 महिना) व त्या अनुषंगाने करावा लागणारा अन्य व्यय उदा. खरेदी केंद्र ते रेल्वे स्टेशन, अमरावती-बडनेरा रेल्वे स्टेशन ते ठोक व्यापाऱ्याचे दुकान, हुंडीचे व्याज इ. मुळे गहू ट्रकनेच बोलावला जातो. एकूण किंमतफैलावात परिवहनावरील व्ययाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. लोकवनसाठी एकूण किंमतफैलावाच्या 45.24% कल्याणसोनासाठी 43.88% तर नर्मदा गव्हासाठी 35.69% येते

(3) कर-

करांमध्ये विक्रीकर, बाजारसेस, नाका इ. चा समावेश होतो. बाजारसेस दोनदा भरावा लागतो. एक, उत्पादनक्षेत्रातल्या ठोक व्यापाऱ्याकडून गहू खरेदी करताना आणि अमरावतीच्या किरकोळ व्यापाऱ्याला खरेदी केल्यानंतर दर 100 रुपयावर 0.65 रु. दराने कृषी उत्पन्न बाजार समितीव्दारे आकारला जातो.

अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीत प्रवेश केल्यावर प्रत्येक पोत्यावर 0.60 रु. नाका भरावा लागतो. गुजरात व मध्य प्रदेशने गव्हाच्या परप्रांतात होणाऱ्या विक्रीवर कर बसविला नाही परंतु पंजाब सरकारने 4% विक्रीकर बसविला आहे. एकूण किंमतफैलावाशी कराचे प्रमाण लोकवन, कल्याणसोना व नर्मदा गव्हासाठी अनुक्रमे 4.80%, 12.45% आणि 5.39% येते.

(4) वजनघट अथवा तूट

वजनघट अथवा तूट म्हणजे मालाची ने-आण करण्यात तेवढ्या रकमेचे धान्य वाया गेले असा आहे. एकूण किंमतफैलावाशी तुटीचे प्रमाण लोकवन,कल्याणसोना व नर्मदा गव्हासाठी अनुक्रमे 6.21%, 5.05% आणि 6.97% आहे.

(5) अन्य खर्च

यात बारदान, हमाली, तुलाई, ठेला भराई, अधिकोषण इ. वरील खर्च घेतला आहे. यात बारदान वा पोत्यावरील खर्च सर्वात जास्त आहे. एकूण किंमतफैलावाशी अन्य खर्चाचे प्रमाण अनुक्रमे 18.50%, 16.93% आणि 22.74% आहे.

(क) किंमतफैलावातील घटकांच्या प्रमाणाची तुलनात्मक भिन्नता -

मध्यस्थांच्या रकमेच्या स्वरूपातील वाट्यात भिन्न गव्हाबाबत फारसा फरक दिसत नाही. परंतु एकूण किंमतफैलाव व त्याचे काही कारक प्रत्येक प्रांताच्या बाबतीत भिन्न असल्याने मध्यस्थांच्या वाट्याचे प्रतिशत प्रमाण भिन्न आले आहे. मध्य प्रदेशच्या नर्मदा गव्हासाठी एकूण किंमतफैलाव कमी म्हणून मध्यस्थांचा वाटा तुलनात्मकदृष्ट्या सर्वाधिक, तर एकूण किंमतफैलाव पंजाबच्या कल्याणसोनासाठी सर्वाधिक तरी त्यात विक्रीकर जास्तीचा आणि महत्त्वाचा घटक म्हणून नर्मदा गव्हापेक्षा मध्यस्थांचा वाटा कमी येतो. मात्र सर्वच गव्हाबाबत एकूण किंमतफैलावात मध्यस्थांच्या वाट्यावरील खर्च दुसऱ्या क्रमांकावर दिसतो.

एकूण किंमतफैलावात परिवहनावर होणाऱ्या खर्चाचा वाटा गव्हाच्या प्रत्येक जातीबाबत सर्वाधिक आहे. उत्पादन व उपभोग क्षेत्रातील अंतरामुळे ते स्वाभाविकही आहे. अंतरभिन्नतेनुसार हा व्यय भिन्न आहे. त्याचा वाटा प्रत्येक गव्हासाठी भिन्न आहे. एकूण किंमतफैलावातील भिन्नता प्रामुख्याने परिवहन व्ययाच्या भिन्न वाट्याला कारणीभूत आहे. परिवहनव्ययाचे सर्वाधिक प्रमाण लोकवन व त्या खालोखाल कल्याणसोनासाठी आहे. वस्तुतः परिवहनव्ययाची रक्कम कल्याणसोनासाठी जास्त आहे. परंतु कल्याणसोनाचा एकूण किंमतफैलाव जास्त असल्याने त्याच्या परिवहनव्ययाचा वाटा तुलनात्मकदृष्ट्या कमी आहे. या दोन गव्हांच्या तुलनेत नर्मदा गव्हाचा परिवहनव्यय फार कमी व एकूण किंमतफैलावातील वाटाही कमी आहे.

कराच्या रकमेत नर्मदा व लोकवन गव्हाबाबत फारसा फरक नाही. परंतु नर्मदा गव्हाचा एकूण किंमतफैलावच कमी असल्याने एकूण किंमतफैलावाशी कराचे प्रमाण लोकवनपेक्षा जास्त आहे. पंजाब सरकारने लावलेल्या 4% विक्रीकरामुळे कराची रक्कम व वाटा दोन्ही कल्याणसोनासाठी सर्वाधिक आहे.

तूट वा वजनघटच्या रकमेत विभिन्न गव्हाबाबत फारसा फरक नाही. एकूण किंमतफैलावच्या भिन्नतेमुळे प्रत्येक गव्हासाठी तूट वरील प्रतिशत प्रमाण भिन्न आहे. अन्य खर्चाची रक्कमसुध्दा जवळपास सारखी असून किंमतफैलावातील भिन्नतेमुळे प्रतिशत प्रमाण भिन्न आहे. ते नर्मदा गव्हासाठी सर्वाधिक तर कल्याणसोनासाठी सर्वात कमी आहे.

**कृषि विपणनाची कार्यक्षमता व किंमतफैलाव**

गव्हाच्या विपणनात किंमतफैलाव किती व कशा प्रकारे निर्माण झाला याचे विवेचन केल्यानंतर गव्हाच्या विपणनाच्या कार्यक्षमतेबाबत कोणता निष्कर्ष काढता येईल ते पाहू. आपण आरंभीच पाहिले आहे की केवळ किंमतफैलाव कमी की जास्त यावरून विपणनव्यवस्था कार्यक्षम आहे की नाही ते ठरविता येत नाही. मध्यस्थांच्या अवाजवी संख्येमुळे, मध्यस्थांनी आकारलेल्या अवाजवी मोबदल्यामुळे अथवा सामाजिकदृष्ट्या उपयुक्त हेतू साध्य न होतात किंमतफैलाव निर्माण झाला असेल किंवा वाढला असेल तर विपणनव्यवस्था अकार्यक्षम आहे असे म्हणता येईल.

मध्यस्थांच्या संख्येचा विचार करता असे सुचविता येऊ शकेल की उत्पादन क्षेत्रातील ठोक व्यापारी व अमरावती परिक्षेत्रातील ठोक व्यापारी यांच्या दरम्यान काम करणारा दलाल उपयुक्त सेवा देत असला तरी टेलिफोन वगैरेसारख्या संपर्क साधनाद्वारे या ठोक व्यापाऱ्यांना परस्परांशी सरळ संपर्क ठेवणे अशक्य नाही.

अडते व दलाल त्यांच्या कामासाठी 1.25% कमिशन घेतात. कृषि उत्पन्न बाजार समितीने अडत्यांसाठी 1.25% कमिशन मान्य केलेले असल्याने ते वाजवी आहे असे म्हणावे लागेल. अडते व दलालांना केवळ ग्राहक मिळवून देण्यासाठी 1.25% कमिशन वाजवी मानल्यामुळे ठोक व्यापारी स्वतःच्या कामासाठी आकारत असलेला 1.5% मोबदला या तुलनेने योग्य अवाजवी मानता येणार नाही कारण माल खरेदून बोलावणे, विकला जाईपर्यंत साठविणे, किमतीतील चढउताराची जोखीम त्यांना स्वीकारावी लागते.

किरकोळ व्यापारी स्वतःच्या कामासाठी सरासरीने 2.98% मोबदला आकारत असलेले दिसतात. किरकोळ व्यापाऱ्यांची एकूण उलाढाल कमी असते. काही लहान दुकानदारांनी तर 2-3 पोते गहू विकायला जवळपास एक आठवडा लागत असल्याचे सांगितले. शिवाय उपभोक्त्यांना त्यांच्या घराजवळ व त्यांच्या सोईप्रमाणे कमी जास्त गहू खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध करून देतात. या सर्व बाबी लक्षात घेऊनही त्यांनी आकारलेला मोबदला जास्त वाढतो. तो घटू शकला तर विपणनव्यय कमी होऊन विपणनाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

अन्य प्रांतातून गहू आणण्यास पडणारे ट्रक भाडे व रेल्वे वॅगन्सनी आणल्यास पडणाऱ्या भाड्यात बरेच अंतर आहे. तथापि रेल्वेने गहू आणण्यात व्ययातील वाढ व गैरसोय प्रामुख्याने गहू अमरावती परिक्षेत्रात पोहोचण्यासाठी लागणाऱ्या विलंबामुळे आहे. रेल्वे वॅगन्सची उपलब्धता वाढली (अर्थात ही बाब दीर्घ काळातच साध्य होऊ शकेल) व रेल्वेने तत्पर सेवा उपलब्ध करून दिली तर परिवहनव्ययात घट होऊ शकेल.

पंजाबच्या कल्याणसोना गव्हासाठी किंमतफैलाव सर्वात जास्त 80.90 रु. आहे. परिवहनव्ययापेक्षाही विक्रीकर त्याला अधिक कारणीभूत आहे. गहू ही उपभोगाची आवश्यक वस्तू आहे. पंजाबमधील गहू फार मोठ्या प्रमाणावर अन्य प्रांतात जातो. अन्य राज्यांना विक्रीकर लावणे आवश्यक वाटले नाही. या बाबी लक्षात घेता पंजाब सरकारने विक्रीकराचे प्रमाण निदान कमी करायला काहीच हरकत नाही.

वजनघट वा तूट एक प्रकारे अपव्यय आहे. कारण तेवढा गहू उपभोगासाठी उपलब्ध होऊ शकत नाही तथापि त्याची किंमत मात्र ग्राहकाकडून वसूल केली जाते. त्यामुळे कार्यक्षमतेच्या दृष्टीने तूट न्यूनतम राहील याची काळजी घेतली जावी. तुटीच्या संदर्भात दोन कारणांचा उल्लेख करता येईल. उत्पादन व उपभोग क्षेत्रातील जास्त अंतर हे एक कारण. पण ते अपरिहार्य आहे. दुसरे कारण माल हाताळण्याची पध्दत. गव्हाची ने-आण पोत्यातून केली जाते. पोते सच्छिद्र असल्याने धान्य सांडून वाया जाते. परंतु माल ठेवणे उचलणे सच्छिद्र पोत्यामुळे हमालांना सोईचे पडते. तेव्हा वजनघट कमी करण्याच्या दृष्टीने स्वतंत्र व सखोल अध्ययन होऊन उपाय सुचविले जाणे योग्य ठरेल.

सामाजिक दृष्टिकोनातून विचार करता उपभोक्त्यांनी मागणी भागविण्यासाठी अनिवार्य ठरणारा व्यय समर्थनीय ठरतो. अधिक एकूण विक्री विपणनाद्वारे होत असेल तर सामाजिकदृष्ट्या उपयुक्त हेतू साध्य होतो. गव्हाचे स्थानिक उत्पादन कमी असल्याने अन्य प्रांतातून गहू आला नाही तर एकूण विक्री घटेल. उपभोक्त्यांना हवी असलेली वस्तू मिळणार नाही. उत्पादनक्षेत्र ते उपभोग क्षेत्र यातील अंतर जास्त असल्यामुळे परिवहनव्यय व मध्यस्थांची संख्या जास्त परिणामतः किंमतफैलावही जास्त असतो परंतु सामाजिकदृष्ट्या उपयुक्त हेतू साध्य करणारा असल्याने गव्हाचे विपणन अकार्यक्षम आहे असे म्हणता येणार नाही.

अंतिम उपभोक्त्याने दिलेल्या किंमतीत उत्पादक कृषकाचा वाटा लोकवन गव्हासाठी 71.01%, कल्याणसोनासाठी 65.02% तर नर्मदा गव्हासाठी 73.48% येतो. विपणनव्ययाची अनिवार्यता लक्षात घेता उत्पादकाचा हा वाटा समाधानकारक मानायला प्रत्यवाय नाही. प्रचलित विपणन व्यवस्थेत काही सुधारणा करून विपणनव्यय घटवून विपणनाची कार्यक्षमता वाढविणे शक्य आहे. तथापि, काही सुधारणा सखोल संशोधनांती सुचविता येण्यासारख्या, काही दीर्घकाळात साध्य होण्यासारख्या तर काही शासकीय धोरणाधीन आहेत. त्यामुळे प्रचलित परिस्थितीत गव्हाचे एकूण विपणन अकार्यक्षम नाही असा निष्कर्ष काढायला काहीच हरकत नाही.

◊◊◊

# चर्चा

## (1) महाराष्ट्रातील अर्थशास्त्र अध्यापनाच्या समस्या

*सी. पं. खेर

1988 च्या जानेवारीत अर्थशास्त्र परिषदेचे साताऱ्याला जे अधिवेशन झाले त्यात चर्चेसाठी 'महाराष्ट्रातील अर्थशास्त्र अध्यापनाच्या समस्या' असा एक विषय होता. या चर्चासत्रात जे निबंध वाचले गेले त्या निबंधातील पुढील मुद्दयांकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.

1 महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमात एकरूपता नाही.
2 मराठी पुस्तकातून येणारी परिभाषा एकच नाही. बऱ्याचदा ती अचूक असत नाही.
3 मराठी माध्यमात दर्जेदार पुस्तकांची कमतरता आहे.
4 आपली गुणवत्ता वाढविण्यास स्वतः प्राध्यापक काही प्रयत्न करतात की नाहीत याबद्दल शंका आहे.

अधिवेशनात निबंध वाचले गेले, त्यावर चर्चा झाली एवढ्यावरच हा विषय थांबवता येत नाही. व या बाबतीत नेटाने पाठपुरावा करण्याची गरज आहे.

मराठीतील दर्जेदार पुस्तकांची कमतरता घालविण्यास प्राध्यापकांनी एकत्र येऊन मराठीतून उत्तम ग्रंथ लिहावेत आणि महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मितीच्या साहाय्याने प्रकाशित करावेत अशी सूचना प्रा. बवले यांच्या पाहणीतून पुढे आली आहे. पुस्तके लिहून घेणे, ती तपासणे, प्रसिध्द करणे इ. हे काम मोठे जिकिरीचे, खर्चाचे व मानधन मिळवून देण्याचे आहे. यात स्वार्थ गुंतून राहतो व राजकारण सुरू होते. तो एक वेगळाच धंदा आहे. तेव्हा त्याचा इथे अधिक विचार करावयाची गरज नाही.

चौथ्या मुद्द्याबाबत प्रा. पुजारी आपल्या पाहणीवरून असे सांगतात की, त्यांना उत्तर पाठविलेल्या 12 पैकी तिघाकडे 25 पेक्षा अधिक ग्रंथ आहेत. इतरांचीही स्वतःची लायब्ररी आहे. परंतु त्यांच्याकडील ग्रंथ कोणत्या स्वरूपाचे आहेत, त्यात गाईडस् किती, इंग्रजी कोणती व किती याची माहिती मिळत नाही.

*गांधी चौक, धारवाड, 580 001

महाविद्यालयांची आपले ग्रंथालय वाढविण्याची ( महाविद्यालयाचीच का, विद्यापीठांची तीच गत आहे. ) इच्छा दिसत नाही. काटकसरीचा पहिला फटका ग्रंथालयाला पडतो. त्यामुळे प्राध्यापकांना अर्थशास्त्रात कोणती नवीन पुस्तके आली आहेत हे कळायला मार्ग नाही. ,

प्राध्यापकांना एक करणे शक्य आहे. वर्षातून एकदा किंवा दोनदा त्यांनी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटच्या ग्रंथालयास अवश्य भेट देत राहावे व नवनवीन पुस्तकांची ओळख करून घ्यावी. तिथे पाहिलेल्या, आवश्यक वाटलेल्या, आपल्या आवडीच्या विषयातील एखाद-दुसऱ्या इंग्रजी ग्रंथाची ( महाविद्यालयीन लायब्ररीत शक्य नसेल तर ) स्वतःच्या ग्रंथालयात भर घालावी. आपल्या विषयाचा व्यासंग राखणे व्रतप्राय आहे हे जाणून प्राध्यापकांना आपल्या गुणवत्तेत भर घालणे शक्य आहे. ( नव्या वेतनश्रेणीने ) असे मला वाटते.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सहकार्याने महाराष्ट्र सरकारने अर्थशास्त्र परिषद परिभाषेचा कोश तयार केला आहे. सर्व मराठी लेखकांनी हीच परिभाषा वापरली पाहिजे असा आग्रह विद्यापीठातील तज्ज्ञांनी धरायला हवा. त्याशिवाय अशा पुस्तकांना विद्यापीठी मान्यता दिली जाऊ नये. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील अर्थशास्त्र - प्रमुख हे परिषदेचे सभासद आहेत (आणि नसले तरी) या बाबतीत अडचण येऊ नये.

हे शक्य आहे की या कोशात सगळे प्रतिशब्द नसतील किंवा काही चुकीचे वाटत असतील तर अशा वेळी लेखकाने जर वेगळा शब्द वापरला तर त्यासाठी त्याने वेगळी सविस्तर तळटीप द्यायला हवी.

अध्यापनाच्या वेळी वर्गात प्राध्यापक उपयोग करीत असलेली भाषा व पुस्तकी भाषा वेगवेगळी असते असे आढळते व विद्यार्थ्यांचा गोंधळ उडतो तो टाळायचा स्वतः प्राध्यापकांनीच जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवा. ,

प्रा. आंबर्डेकर यांनी असे दाखविले आहे की पुणे विद्यापीठाचा विद्यार्थी बी. ए. 2 साठी शिवाजी विद्यापीठात आला तर त्याचे अंशलक्षी अर्थशास्त्र आधीच झालेले असले तरी त्याचाच पुनः त्याला अभ्यास करावा लागतो आणि समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या प्रश्नपत्रिकेचा अभ्यास न होताच तो अर्थशास्त्राचा पदवीधर बनू शकतो. अशी तफावत दूर होणे निकडीचे आहे.

अभ्यासक्रमातील तपशील राहू द्या पण बी. ए. च्या तीन वर्षातून अंशलक्षी व समग्रलक्षी भाग कोणकोणत्या वर्षातून शिकवावा एवढे तरी ढोबळपणे ठरविणे विद्यापीठातील अर्थशास्त्र प्रमुखांना शक्य व्हावे. म्हणजे विद्यार्थ्याला तोच अभ्यास पुनः करावा लागणार नाही व एका विषयाचा अभ्यास अजिबात राहून जावयाचा नाही.

सर्वत्र एकच मराठी परिभाषा वापरली जावी व अभ्यासक्रमात सुसूत्रता यावी यासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेने पुढाकार घ्यायला हवा असे मला नम्रपणे सुचवावेसे वाटते. तिने तशी चळवळ हाती घ्यावी.

यासाठी सर्व विद्यापीठातील अर्थशास्त्र प्रमुखांनी एकत्र यायला हवे. म्हणजे ( निदान ) प्रवासखर्चाचा प्रश्न आला. यावर मला असे सुचवावेसे वाटते की, या बाबतीत जर खरोखरच तळमळ असेल तर प्राध्यापक-प्रमुखांनी केवळ भत्त्याचा विचार न करता स्वखर्चाने एकत्र यावे, विचारविनिमय करावा, व निर्णय कार्यवाहीत आणावेत.

प्राध्यापकांचे पगार वाढलेले आहेत व त्यामानाने मराठीच्या पोटी एवढा खर्च करणे अशक्य ठरू नये किंवा मायबोलीसाठी तेवढा त्याग केला असे समजावे.

## (2) महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ आणि कर

सी. पं. खेर

प्रा. आगरकर यांनी सरकारी करामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाला ( म. रा. प. मं. ) तोटा सोसावा लागत आहे असे प्रतिपादिले आहे. ( अर्थसंवाद जाने-मार्च 1989 पृ. 53). परंतु त्यांचा हा विचार एकांगी वाटतो.

आपल्या लेखात प्रा. आगरकर यांनी भांडवली आय-व्ययाचा विचार केलेला नाही. त्यामुळे कदाचित हा एकेरीपणा आलेला असावा.

रा. प. मं. ला राज्यसरकार जेवढे भांडवल पुरवते त्याच्या एकतृतीयांश केंद्र सरकार देते. कर कमी केल्याने राज्यसरकारचा व म्हणून केंद्रसरकारचा भांडवलाचा हा ओघ कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा परिणाम नवीन बसेसची खरेदी कमी होण्यात, जुन्या बसेसची संख्या वाढण्यात व म्हणून मंडळाची कार्यक्षमता घटण्यात होऊ शकतो. ( अर्थात मंडळाकडे स्वतःच्याच भांडवलाचे प्रमाण जास्त आहे. 1982-83 साली ते 67.87 होते. )

मंडळाकडे 1985-86 अखेर 11756 बसेस होत्या. यात जुन्या व अपेक्षित आयुष्य पुऱ्या केलेल्या बसेस किती प्रमाणात आहेत हे प्रा. आगरकर यांनी पाहिलेले नाही. या मंडळाचे अहवाल सलगपणे काही वर्षांसाठी माझ्याकडे नाहीत त्यामुळे मीही ते सांगू शकत नाही.

1982-83 साली 1 लाखाहून अधिक किलोमीटर धावलेल्या बसेसच्या संख्येचे प्रमाण 12.55 % होते. एका बसचे आयुर्मान 10 वर्षे किंवा 4.80 लाख किलोमीटर असते असे म्हटले जाते. हे जर बरोबर मानले तर म. रा. प. मं. जवळ 1982-83 अखेर 38% बसेस आयुर्मान पुऱ्या केलेल्या होत्या. काहींच्या मते हे आयुर्मान 15 वर्षे म्हणजे 7.20 लाख किलोमीटर असते. त्यानुसार आयुर्मान पुऱ्या केलेल्या बसेसचे प्रमाण 12.55% एवढे येते.

तेव्हा सरकारला कर कमी करा असे न सांगता असे सांगायला हवे की आम्ही सालिना 100 कोटीहून अधिक कर भरतो तर नवीन बस खरेदीसाठी अधिक भांडवल पुरवा व आमची झीज वाढती राहू नये म्हणून रस्ते सुधारा व सुस्थितीत राखा, कर कमी करणे ( स्वायत्त मंडळाचा तेवढाच कर कमी करणे अन्याय्य ठरेल) हा त्यावर उपाय नाही.

खासगी वाहतुक संस्था नफा कमवितात याचे एक कारण असे आहे की, त्यांचा वेतन व भत्त्यावरील खर्च कमी असतो. सार्वजनिक संस्थांतून हे शक्य नसते. तरी पण दर दिनी दर नोकरामागे म. रा. प. मं. ची 27.3 कि. मि. इतकी कार्यक्षमता 1984-85 साली आढळली. तर कर्नाटक म. रा. प. मं. करिता हे प्रमाण 37.54 कि. मी. इतके होते. त्यामुळे नोकरवर्ग अधिक आहे का? योग्य कार्यक्षमता किती असावी, इत्यादी प्रश्नांचा म. रा. प. मं. ने विचार करायला हवा.

1 जाताजाता दोन गोष्टींचा उल्लेख करतो. सुविधा वाढविल्याने प्रवासी वाढतील हे अनुमान बरोबर नाही. कारण ग्रामीण भागातून वाहतुकीचे अन्य साधनच नाही. ( ट्रक व ट्रॅक्टर जमेस धरावयाचे नाही ) सुविधा हव्यातच ( त्यासाठी तर राष्ट्रीयीकरण झाले. शिवाय आम्ही फुकट प्रवास करीत नाही ). विशेषतः स्वच्छ प्रसाधनगृहांची सोय प्रत्येक स्थानकावर असायला हवी.

2 पत्रक क्र. 7 मध्ये काही छपाईच्या किंवा मुळात चुका असाव्यात बेरजा जमत नाहीत. राज्य प. मं. नी नफा मिळवायलाच हवा. त्यांनी झीज तुटीची तरतूद केल्यानंतर सरकारला निदान 3 टक्के लाभांश द्यावा असे आठव्या वित्त आयोगाने सांगितले आहे. त्यासाठी बसभाडे वाढवीत राहावे लागते. 1982 नंतर कधी हे दर सुधारले गेले नसतील तर ते आता वाढविणे अपरिहार्य आहे.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## तेरावे वार्षिक अधिवेशन

परिषदेचे तेरावे वार्षिक अधिवेशन 1989 च्या ऑक्टोबर / नोव्हेंबरमध्ये नागपूर येथे होणार आहे. डॉ. रविंद्र दोशी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, अध्यक्षस्थानी असतील.

अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत :-

(1) सार्वजनिक खर्चाचे सिध्दान्तन

(2) भारतातील दारिद्र्य निवारणाच्या योजनांचे मूल्यमापन

(3) महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय.

चौथा विषय तत्कालीन आर्थिक परिस्थितीशी संबंधित असेल व तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 100 शब्दांत त्याचा गोषवारा सादर करावयाचा आहे. **निबंधाच्या दोन प्रती पाठवाव्यात.**

निबंध मराठीतच असावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नांव व पत्ता मराठीतच देणे आवश्यक आहे. चर्चासत्रासाठी सादर करण्यात येणारे निबंध पूर्वी अन्यत्र कोठेही सादर केलेले नसावेत.

31 ऑगस्ट 1989 ही निबंध स्विकारण्याची अखेरची तारीख असून त्यानंतर पाठविलेला निबंध स्विकारला जाणार नाही.

निबंध लेखकांनी आपले निबंध डॉ. रविंद्र दोशी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 416 004 या पत्त्यावर पाठवावयाचे आहेत.

**व्यंकटेश पाटणकर**

कार्यवाह खजिनदार

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### परिषदेचे सभासद व हितचिंतक यांना आवाहन

'' अर्थसंवाद '' या नियतकालिकावरील व कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे व परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सभासदांकडून व परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या / अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत ठरविण्यात आले आहे. परिषदेच्या आजीव सभासदत्वाची एकरकमी वर्गणी आता रु. 400 करण्यात येत असल्यामुळे यापूर्वीच आजीव सदस्यत्व घेतलेल्या व्यक्ती आपण होऊन किमान रु. 150 इतकी देणगी या कायम निधीसाठी देतील अशी अपेक्षा आहे. 'अर्थसंवाद'चे वाचक, परिषदेचे साधारण सभासद व अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील व परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

या कायम निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्टस्, चेक्स, मनिऑर्डर्स इत्यादी '' **मराठी अर्थशास्त्र परिषद** '' या नावाने काढावेत व ते धुळे कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी '' अर्थसंवाद '' च्या अंकात दिली जातील.

**व्यं. सु. पाटणकर**
कार्यवाह - खजिनदार

## मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| नी. वि. सोवनी | : | **अर्थसिध्दांत, आणखी चिकित्सक निबंध*** (1977). पृष्ठे 226. किंमत 20 रुपये. |
| भो. वि. भाटवडेकर | : | **शिक्षणाचे अर्थशास्त्र** ( 1978 ) पृष्ठे 157. किंमत 20 रुपये. ( वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या , 381 क , शनिवार पेठ, पुणे 411030 ) |
| भा. ग. बापट | : | **आंतरराष्ट्रीय व्यापार : सिध्दांत आणि धोरण*** (1982 ), पृष्ठे 333, किंमत रु. 50 ( वितरक : कॉन्टिनेंटल प्रकाशन , विजयानगर कॉलनी, पुणे 411030 ) |
| नी. वि. सोवनी | : | **ग्राफा विचारसरणी : चार व्याख्याने**,* पृष्ठे 64, किंमत रु. 10, प्रकाशक : नी. वि. सोवनी, पुणे. |

* ही प्रकाशने म. अ. परिषदेच्या धुळे येथील कार्यलयाकडून मिळू शकतील.

# श्री सातपुडा तापी परिसर सहकारी साखर कारखाना लि.

## पुरुषोत्तमनगर, तालुका शहादा, जिल्हा धुळे

*** सहकार हा प्रगत समाजव्यवस्थेचा पाया आहे ***

आपल्या दैनंदिन जीवनात साखर अत्यावश्यक आहे. शुभ्र दाणेदार साखर निर्मितीसाठी हा कारखाना सहकारी पध्दतीने सेवारत आहे.

| वर्ष | ऊस गळीत मे. टन | साखर निर्मिती पोती |
|---|---|---|
| 1988-89 | 6,37,600 | 7,31,490 |

आमच्या कारखान्याची कार्यशक्ती ३५०० मे. टनावरून 5000 मे. टन गाळप क्षमता होणार आहे. सन 1989-90 या गळीत हंगामात एकूण अंदाजे 8,70,000 मे. टन गळीत करून 9,72,000 पोती साखर उत्पादनाचे उद्दिष्ट आहे.

आमच्या कारखान्याने महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ मर्यादित पुणे यांचेकडून पाच उपसा जलसिंचन योजना विकत घेतल्या असून त्यापैकी चार योजना कार्यान्वित आहेत. तसेच गोमाई नदीकाठी एक व तापी नदीकाठी 39 उपसा जलसिंचन योजना तयार करणेसाठी अंदाजे 60,000 एकर क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासनाने पाणी परवानगी दिलेली आहे. पैकी गोमाई नदीवरील एक ( 200 एकर ) व तापी नदीवरील एकवीस योजना ( 23,000 एकर ) कार्यान्वित झाल्या आहेत. उर्वरित योजनांची कामे चालू आहेत.

*** पेपर प्लॅन्ट ***

प्रतिदिनी 50 मे. टन लिहिण्याच्या व छपाईच्या कागद निर्मिती कारखान्यास परवानगी मिळाली असून लवकरच बांधकामास सुरुवात होईल.

*** डिस्टीलरी युनिट ***

**उत्पादनक्षमता** :- 45,000 लिटर मद्यार्क व मदिरा प्रतिदिनी उत्पादन चालू आहे. तसेच महुआ फुलापासून मद्य तयार करणारा हा महाराष्ट्रातील एकमेव कारखाना आहे. सातपुडा कारखान्याची देशी दारू '' महाराजा '' या नावाने प्रसिध्द आहे. विदेशी दारू तयार करण्यास परवानगी मिळाली असून विदेशी दारूच्या व्यापारी उत्पादनास सुरुवात झाली आहे.

20 कलमी कार्यक्रमाच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील अनेक योजनांना गती देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **आर. आर. हिरे** | **शंकर फुसरा जाधव** | **पी. के. पाटील (आमदार)** |
| कार्यकारी संचालक | व्हा. चेअरमन | चेअरमन |

**श्री सातपुडा तापी परिसर सहकारी साखर कारखाना लि., पुरुषोत्तमनगर,**

**तालुका : शहादा, : जिल्हा : धुळे.**

Registration No. R. N. 31918/77

# शेती, शेतकरी अन् जळगांवचा जैन-उद्योग-समूह..

जळगावच्या खानदेशी मातीत रुजलेला 'जैन-उद्योगसमूह' महाराष्ट्राला आता अपरिचित, नवखा राहिलेला नाही. गेल्या २५ वर्षांपासून मातीशी इमान राखून त्यांनी स्वतःला शेती, शेतकरी व शेतीनिष्ठ व्यवसायाला वाहून घेतलंय.

बी-बियाणं, खतं, जंतुनाशकं, ट्रॅक्टर्स, पंप, केळी (सुकी-कुडी) पी.व्ही.सी. पाईप्स आणि आता अभूतपूर्व अशा ठिबक-सिंचन संचानं व कमानं त्यानं आपली शेतीतली बांधिलकी यापूर्वीच सिद्ध केली आहे.

म्हणूनच काळाचं भान ठेवून अतिप्रगत तंत्रज्ञान या शेतीत, या मातीत कुणी रुजवावं असा प्रश्न उपस्थित झाला तर 'जैन उद्योगसमूहाचं' नाव सर्वप्रथम घेत रहातं.

पिढ्यान् पिढ्यांच्या इथल्या शेतीतला वस्तुनिष्ठ अनुभव त्यांच्या पाठीशी आहे ही झाली निव्वळ एकच बाजू. अन् पाश्चिमात्त्य देशात विकसित झालेलं अतिप्रगत तंत्रज्ञान या देशात, या मातीत, या माणसांत रुजविण्याची त्यांची जिद्द आहे, महत्त्वाकांक्षा आहे, तळमळ आहे, एवढंच नव्हे तर अशी स्वयंभारित जबाबदारीची जाणीवही आहे ती फक्त जैन उद्योगसमूहाकडे.

डॉ. रवीन्द्र ग. सबनीस यांनी 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या संस्थेकरिता हे त्रैमासिक महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, 915/2, शिवाजीनगर, पुणे 411 004, येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई 400 014 येथे प्रसिद्ध केले.